उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



नाशिक शहरावर पाणीसंकट.../८



'सियावर रामचंद्र की जय'चा जयघोष.../८

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८५ ■ अंक : २०८ ■ नाशिक, शनिवार, दि. २० एप्रिल २०२४ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

# राज्यात 54.85 टक्के मतदान

## देशात 59.71 टक्के मतदारांनी बजावला हक्क



1 लोकसभेच्या १०२ जागांपैकी २०१९ मध्ये भाजपने ४०, द्रमुकने २४ आणि काँग्रेसने १५ जागा जिंकल्या होत्या. इतरांना २३ जागा मिळाल्या होत्या. या टप्प्यात बहुतांश जागांसाठी या तीन पक्षांमध्ये लढत आहे.

२ पहिल्या टप्प्यात १,६२५ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. यामध्ये १,४९१ पुरुष आणि १३४ महिला उमेदवार आहेत. ८ केंद्रीय मंत्री, एक माजी मुख्यमंत्री आणि माजी राज्यपालही यावेळी रिंगणात आहेत.

३ दुसऱ्या टप्प्यातील मतदान २६ एप्रिल रोजी होणार आहे. एकूण ७ टप्प्यांत ५४३ जागांसाठी १ जून रोजी मतदान होणार आहे. सर्व जागांचे निकाल ४ जूनला लागणार आहेत.

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याची निवडणूक शुक्रवारी पार पडली. काही घटना वगळता सर्वत्र शांततेत मतदान झाले. २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील १०२ मतदारसंघांमध्ये मतदान पार पडले. यापैकी पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक तर बिहारमध्ये सर्वांत कमी मतदान नोंदविले गेले आहे. या मतदारसंघांमध्ये सकाळी ७ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत मतदान घेण्यात आले. सायंकाळी सहा वाजेपर्यंतचे मतदान टक्केवारी आली आहे. देशात ५९.७१ टक्के मतदान झाले तर महाराष्ट्रात पाच लोकसभा मतदारसंघात ५४.८५ टक्के मतदान झाले.

सर्वाधिक मतदान पश्चिम बंगालमध्ये झाले असून, ७७.५७ टक्के मतदान झाले. दुसरा क्रमांक त्रिपुरा राज्याचा असून, ७६.१० टक्के मतदान झाले आहे. मेघालय ६९.९१ टक्के, मध्य प्रदेश ६३.२५ टक्के, तामिळनाडू ६२.०८ टक्के, उत्तर प्रदेश ५७.५४ टक्के, बिहार ४६.३२ टक्के, उत्तराखंड ५३.५६ टक्के, जम्मू-कश्मीर ६५.०८ टक्के, राजस्थान ५०.२७ टक्के, छत्तीसगड ६३.४१ टक्के, आसाम ७०.७७ टक्के, पाँडिचेरी ७२.८४ टक्के, अरुणाचल प्रदेश ६४.०७ टक्के, नागालँड ५६.१८ टक्के, मिझोरम ५३.९६ टक्के, सिक्कीम ६८.०६ टक्के, मणिपूर ६८.६२ टक्के, /-...४

**पहिल्या टप्प्यातील ५ लोकसभा मतदारसंघनिहाय टक्केवारी**

▶ रामटेक ५२.३८ टक्के ▶ नागपूर ४७.९१ टक्के ▶ भंडारा-गोंदिया ५६.८७ टक्के ▶ गडचिरोली- चिमूर ६४.९५ टक्के ▶ चंद्रपूर ५५.११ टक्के

### अनेक दिग्गजांनी केले मतदान

नागपूरसह विदर्भातील बहुतांश ठिकाणी मतदानाला उत्तम प्रतिसाद मिळाला. अनेक दिग्गज नेतेमंडळींनीही मतदानाचा हक्क बजावला आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सकाळच्या सुमारास सहकुटुंब आपल्या मतदानाचा हक्क बजवला आहे. यावेळी बोलताना अधिकाधिक मतदारांनी मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. तर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील नागपूर येथील धरमपेठ येथे आपल्या मतदानाचा हक्क बजावला आहे. तर मतदान सुरू होताच सरसंघचालक मोहन भागवत यांनीदेखील मतदान केले. नागपूरच्या भाऊजी दप्तरी शाळेतील मतदान केंद्रावर भागवत यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.







### मणिपूरमध्ये मतदान केंद्रावर गोळीबार

गेल्या अनेक महिन्यांपासून जातीय हिंसाचाराने धुमसत असलेल्या मणिपूरमध्ये काल लोकसभेचे मतदान होत आहे. मणिपूरमधील लोकसभेच्या दोन जागांवर काल मतदान सुरू आहे. अशातच मतदानावेळी गोळीबार झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. तसेच ईव्हीएमचीही तोडफोड झाल्याचे सांगण्यात येत आहे. मणिपूरमधील मोइरांग भागातील थामनपोकपी येथील एका मतदान केंद्राजवळ समाजकंटकांच्या एका गटाने अनेक राऊंड गोळीबार केला. गोळीबारामुळे मतदानासाठी रांगेत उभे असलेल्या मतदारांमध्ये एकच खळबळ उडाली.

## बंगाल, मणिपूरमध्ये गालबोट!

### भाजप-तृणमूलचे कार्यकर्ते भिडले

**कूचबिहार :**

निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात काल बहुतांश ठिकाणी उत्साहात आणि शांततेत मतदानप्रक्रिया पार पडली असली तरी काही ठिकाणी मात्र हिंसाचाराचे गालबोट लागले.

पश्चिम बंगालमधील तीन मतदारसंघांमध्ये भाजप आणि तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये मारामारी झाल्याचे स्थानिकांनी सांगितले. मध्य प्रदेशातील छिंदवाडा येथेही भाजप व काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला. दोन्ही राज्यांमध्ये हिंसाचार करणाऱ्यांविरोधात गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

पश्चिम बंगालमध्ये कूचबिहार, अलिपूरदास आणि जलपाईगुडी या तीन /-...४

### नागालँडमध्ये ६ जिल्ह्यांत शून्य मतदान

नागालँडमधील ६ जिल्ह्यांमध्ये जवळपास ० टक्के मतदान झाले. हे जिल्हे आहेत- मोन, लाँगलेंग, तुएनसांग, नोक्लाक, शामटोर आणि किफिरे. ते सर्व पूर्व नागालँडमध्ये येतात. ईस्टर्न नागालँड पीपल्स ऑर्गनायझेशन या जिल्ह्यांसाठी स्वतंत्र प्रशासन आणि अधिक आर्थिक स्वातंत्र्याची मागणी करत आहे. या संघटनेने या जिल्ह्यांतील जनतेला निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले होते.



# छगन भुजबळांची अखेर माघार

## नाशिक लोकसभा लढविण्यास नकार

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक लोकसभा मतदारसंघ महायुतीमधील कोणत्या पक्षाला मिळणार? याचा तिढा गेल्या अनेक दिवसांपासून होता. शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांनी नाशिकवर आपला दावा ठोकला होता. मात्र, निवडणूक जवळ येत असूनही तिढा सुटत नाही हे पाहून छगन भुजबळ यांनी स्वतःहून आपण माघार घेत असल्याचे काल जाहीर केले. भुजबळ यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन मागच्या तीन आठवड्यांतील सर्व घटनाक्रम कथन केला. तसेच एका मतदारसंघामुळे महायुतीमध्ये तणाव निर्माण होऊ नये, प्रचारात विरोधकांना आघाडी मिळू नये, यासाठी मी हा निर्णय घेत आहे, असेही त्यांनी जाहीर केले. हे सांगत असताना छगन भुजबळ काहीसे भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.

उमेदवारीचा तिढा कधीपासून सुरू झाला, हे सांगताना भुजबळ यांनी होळीच्या दिवशी काय घडले याची माहिती दिली. ते म्हणाले, होळीच्या दिवशी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मला देवगिरी बंगल्यावर बोलावून घेतलं होतं. त्यावेळी खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेदेखील तिथे उपस्थित होते. त्यांनी मला दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याबरोबर बैठक झाली असल्याचे सांगितले. तसेच या बैठकीत नाशिकचा मतदारसंघ आपल्याला मिळाला असून, तुम्ही या ठिकाणी उमेदवारीची तयारी करा, असे आदेशच अजित पवार यांनी मला दिले. मात्र, या ठिकाणी समीर भुजबळ हे योग्य /-...४

### मोदी, शहांचे मानले आभार

नाशिक लोकसभेची उमेदवारी देऊ केल्याबद्दल छगन भुजबळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानले.

### उमेदवाराबाबत सस्पेन्स कायम

छगन भुजबळ यांनी उमेदवारीच्या स्पर्धेतून माघार घेतली असली तरी उमेदवार कोण? हे मात्र अजूनही जाहीर झालेले नाही. आज याबाबत घोषणा होण्याची शक्यता आहे. हेमंत गोडसे यांची उमेदवारी निश्चित असल्याचे बोलले जात आहे. मात्र, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांच्याही नावाची चर्चा आहे. उमेदवारी मिळावी म्हणून गोडसे यांनी एकनाथ शिंदे यांच्याकडे पाच ते सहा वेळा जाऊन फिल्डिंग लावली आहे. मध्यंतरी बोरस्तेंना अचानक मुंबईत बोलावून घेतले होते. त्यामुळे उमेदवार कोण, हा सस्पेन्स कायम आहे.

### चर्चा लांबल्यामुळे माघार

होळी होऊन आता तीन आठवडे झाले आहेत. उमेदवारी देणार हे स्पष्ट असताना पुन्हा एकदा चर्चा का सुरू झाल्या? हे कळायला मार्ग नाही. महाविकास आघाडीने त्यांचा उमेदवार जाहीर केला असून, ते प्रचाराच्या कामाला लागले आहेत. त्यामुळे महायुतीने नाशिकबाबत ताबडतोब निर्णय घ्यायला हवा होता. तो निर्णय का होऊ शकला नाही? याबाबत आता मला भाष्य करायचे नाही. मी नाशिकची संदिग्धता कायमची दूर करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळेच मी उमेदवारीतून माघार घेत आहे, असे छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले.

### महत्त्वाचे

#### आ. अमानतुल्ला खान यांना ईडीकडून अटक

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाचे ओखला येथील आमदार अमानतुल्ला खान यांना ईडीने अटक केली. वक्फ बोर्ड नियुक्ती घोटाळ्याप्रकरणी त्यांना पीएमएलए अंतर्गत अटक करण्यात आली. या घोटाळ्याप्रकरणी ईडीने त्यांची सुमारे ९ तास चौकशी केली. त्यानंतर ईडीने अमानतुल्ला खान यांना अटक केली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर काल आमदार अमानतुल्ला खान चौकशीसाठी ईडीसमोर हजर झाले होते. आम आदमी पक्षाचे नेते आणि आमदार अमानतुल्ला खान यांच्यावर दिल्ली वक्फ बोर्डाच्या अध्यक्षपदी ३२ जणांची बेकायदेशीरपणे भरती केल्याचा आरोप आहे. यासोबतच त्यांनी दिल्ली वक्फ बोर्डाच्या अनेक मालमत्ता बेकायदेशीरपणे भाड्याने दिल्यात. तसेच अमानतुल्ला यांनी दिल्ली वक्फ बोर्डाच्या निधीचा गैरवापर केला, असाही आरोप त्यांच्यावर आहे.

#### शहापूरमध्ये प्लास्टिकच्या कंपनीला भीषण आग

**मुंबई :** शहापूरमध्ये भीषण आगीची घटना घडली आहे. प्लास्टिकच्या कंपनीला भीषण आग लागली. शहापूर तालुक्यातील लाहे येथे ही घटना घडली. आगीमध्ये संपूर्ण कंपनी जळून खाक झाली. या आगीमुळे आसपासच्या परिसरमध्ये धुराचे लोट पसरले होते. अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून, आग विझवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, शहापूर तालुक्यातील लाहे येथे असलेल्या ऐश्वर्या प्रो. लिमिटेड कंपनीमध्ये भीषण आग लागली. साडेपाचच्या सुमारास या कंपनीला भीषण आग लागली.

#### स्कॉटलंडमध्ये दोन भारतीय विद्यार्थ्यांचा मृत्यू

**नवी दिल्ली :** अमेरिकेपाठोपाठ आता स्कॉटलंडमधून भारतीयांसाठी वाईट बातमी आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून अमेरिकेत सातत्याने भारतीय विद्यार्थी आणि भारतीय वंशाच्या लोकांच्या हत्या होत असतानाच स्कॉटलंडमधून दोन भारतीय विद्यार्थ्यांच्या मृत्यूची बातमी समोर आली आहे. दोन्ही विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. स्कॉटलंडमधील एका पर्यटनस्थळी दोघांचे मृतदेह सापडले आहेत. बुधवारी रात्री लिन ऑफ टम्मेल या धबधब्याजवळ दोघांचे मृतदेह सापडले. स्कॉटलंडच्या उत्तर-पश्चिम भागात गॅरी आणि टम्मेल नदीच्या संगमाजवळ हा धबधबा आहे. हे दोन्ही विद्यार्थी त्यांच्या चार मित्रांबरोबर फिरण्यासाठी या धबधब्याजवळ गेले होते.

#### चारधामसाठी चार्टर्ड हेलिकॉप्टर सेवा होणार सुरू

**उत्तराखंड :** उत्तराखंडमध्ये १० मेपासून सुरू होणाऱ्या चारधाम यात्रेचा उत्साह यंदाही मोठ्या प्रमाणात दिसून गेल्या चार दिवसांत १४ लाखांहून जास्त लोकांनी नोंदणी केली. गेल्या चार महिन्यांत ५५ लाख भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला आहे. त्यात पहिल्यांदाच चारधामसाठी चार्टर्ड हेलिकॉप्टर सेवा सुरू होणार आहे. त्यात चार लोक एका धामची यात्रा साडेतीन लाख रुपयांत करू शकतील. चारधामसाठी हेलिकॉप्टर घेतल्यास प्रती व्यक्ती १.९५ लाख एवढे भाडे मोजावे लागेल. भाड्यात ये-जा, मुक्काम, भोजनाचा समावेश आहे. हेलिकॉप्टरही तेथेच राहील. एका दिवसात परतीचे भाडे १.०५ लाख असणार आहे, अशी माहिती उत्तराखंड नागरी उड्डाण विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सी. रविशंकर यांनी दिली.

#### कडक सुरक्षेसह सलमान खान परदेशात रवाना

**मुंबई :** अभिनेता सलमान खानच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमधील घरावर रविवार, १४ एप्रिल रोजी पहाटे पाच वाजता दोन दुचाकीस्वारांनी गोळीबार केला. या बातमीने सर्वत्र गोंधळ पसरला होता. सध्या या घटनेबाबत पोलीस तपास सुरू असून, सलमानच्या घरावर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांना अटक करण्यात आली आहे. घरावरील गोळीबाराच्या बातमीनंतर सलमान नुकताच परदेशात रवाना झाला आहे.

# धनगर समाजाला 'एसटी'तून आरक्षण देण्यास नकार

## सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण याचिका फेटाळली

**नवी दिल्ली :**

महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यांपासून मराठा, ओबीसी समाजात आरक्षणाच्या मुद्द्यांवरून संघर्षाची ठिणगी पडली आहे. आंदोलने, मोर्चे, सभा, मेळावे, बैठका यांनी वातावरण ढवळून निघालं होतं. आरोप- प्रत्यारोपांच्या फैरी झाडत सरकारला आव्हानही दिले जात आहे. यामुळे शिंदे सरकारची डोकेदुखी चांगलीच वाढली आहे.



याचदरम्यान, धनगर समाजाकडूनदेखील अनुसूचित जाती प्रवर्गाचे आरक्षण मिळावे, यासाठी ठिकठिकाणी आंदोलन आणि मोर्चे काढत आक्रमक पवित्रा घेतला होता. पण आता सुप्रीम कोर्टाने धनगर समाजाच्या आरक्षणासंबंधीची याचिका फेटाळली आहे.

नंदुरबार जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष व आदिवासी हक्क संरक्षण समितीचे सचिव सुहास नाईक यांनी अनुसूचित जमातीमधून आरक्षण मिळावे यासाठी धनगर समाजाने दाखल केलेल्या याचिकेला आव्हान दिले होते. यावर शुक्रवारी (दि.१९) सुप्रीम कोर्टात /-...४



# काँग्रेसचे काम म्हणजे बारशाला गेला अन् बाराव्याला आला

## वर्धा येथील सभेत मोदींची टीका

**वर्धा :**

काँग्रेस आणि इंडिया आघाडी नेहमीच विकासविरोधी आणि शेतकरीविरोधी राहिली आहे. त्यामुळेच देशातील शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट झाली आहे. काँग्रेस आघाडीच्या कामकाजासाठी मराठीत एक म्हण आहे, बारशाला गेला आणि बाराव्याला आला... असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेस आणि इंडिया आघाडीवर बोचरा वार केला. यापूर्वी नागपूरच्या पहिल्या सभेतही मोदींनी मराठी म्हणीचा उल्लेख केला होता. त्यावेळी, पाण्यावर काठी मारल्यानंतर पाणी दुभंगत नाही, असे मोदींनी म्हटले होते. आता पुन्हा एकदा मराठी म्हणीतून काँग्रेसवर हल्लाबोल केला.

वर्धा आणि अमरावती जिल्ह्यातील उमेदवारांसाठी मोदींची काल वर्ध्यात सभा झाली. नेहमीप्रमाणे त्यांनी मराठीत भाषणाला सुरुवात केली. भाषणाच्या सुरुवातीलाच महाराष्ट्राच्या आणि विदर्भातील संतांचे गुणगान गायले. चैत्र एकादशीनिमित्ताने पंढरपूरच्या विठुरायाला वंदन करतो, असे मोदींनी म्हणत आपलं प्रेम आणि आशीर्वाद मोठ्या प्रमाणात आहेत. या सभेसाठी लोकांचा उत्साह आणि गर्दी पाहून मी भारावून गेलो, असे मोदींनी म्हटले. आपल्या देशात २०२४ पूर्वी नैराश्याचे वातावरण होते. वीज, पाणी, रस्त्यांच्या अनेक गावात समस्या होत्या. मात्र, गेल्या १० वर्षांत आपल्या सरकारने २५ कोटी भारतीयांना गरिबीतून बाहेर काढले. देशात ५० कोटींहून अधिक बँक खाते नव्याने उघडले आहेत. आता विकसित /-...४

# डीएसके यांच्या पुण्यातील कार्यालयावर ईडीची छापेमारी

**पुणे :**

येथील बांधकाम व्यावसायिक दीपक सखाराम कुलकर्णी (डीएसके) यांच्या पुण्यातील कार्यालयावर ईडीने छापेमारी केली. मुंबईतून आलेल्या ईडीच्या पथकाने शुक्रवारी (दि.१९) पहाटेपासूनच डी. एस. कुलकर्णी यांच्या जंगली महाराज रस्त्यावर असलेल्या कार्यालयाची झाडझडती घण्यास सुरुवात केली. उद्योजक डी. एस. कुलकर्णी यांच्यावर गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

पुण्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांमध्ये त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणात त्यांना अटक झाली होती. ५ वर्षांनंतर त्यांची जामिनावर सुटका झाली होती. मात्र, त्यांच्या अडचणी काही संपण्यास तयार नाहीत. आता ते ईडीच्या कचाट्यात सापडले आहेत.

बांधकाम व्यावसायिक दीपक सखाराम कुलकर्णी /-...४

# इस्त्रायलचा इराणवर हल्ला; क्षेपणास्त्र डागल्याचा दावा

**नवी दिल्ली :**

इराणने ड्रोण आणि क्षेपणास्त्रांच्या मदतीने केलेल्या हल्ल्यानंतर आता इस्त्राइलने इराणला प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे. काल इस्त्राइलने इराणवर क्षेपणास्त्रांच्या सहाय्याने मोठा हल्ला केल्याची बातमी समोर येत आहे. इस्त्रायलने इराणच्या अणुकेंद्रांना निशाणा बनवत क्षेपणास्त्रे डागली आहेत. तसेच इसाफहान शहरातील विमानतळावर स्फोटांचे आवाज ऐकू आल्याचा दावा इराणमधील माध्यमांनी केला आहे. इराणच्या दूतावासावर इस्त्रायलने केलेल्या एअरस्ट्राइकनंतर दोन्ही देशांमधील तणाव वाढल्याचे दिसत आहे. इराणने इस्त्रायलवर रविवारी हल्ले केले होते.

## महत्त्वाचे

### महिलेच्या बँक खात्यातील रकमेवर चोरट्यांचा डल्ला

**नाशिक : प्रतिनिधी**

ऑनलाईन फोन अॅप सुरू करून देण्याच्या बहाण्याने भामट्याने युझर आयडी आणि पासवर्डचा वापर करून महिलेच्या बँक खात्यातील रकमेवर डल्ला मारल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेत महिलेच्या बँक खात्यातून ९ हजार ५०० रुपये परस्पर काढण्यात आले असून, इंदिरानगर पोलीस ठाण्या गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उषा अशोक बोडके (रा. सुमन पेट्रोलपंपाजवळ राजीवनगर) यांनी फिर्याद दिली आहे. बोडके यांच्याशी गेल्या ३१ जानेवारी रोजी दिनेश वर्मा नामक इसमाने संपर्क साधला होता. यावेळी त्याने ऑनलाइन फोन अॅप सुरू करून देण्याचे आमिष दाखविल्याने बोडके यांनी बँकेची गोपनीय माहिती दिल्याने ही फसवणूक झाली. भामट्याने बँकेच्या युझर आयडी आणि पासवर्डचा वापर करून बँक खात्यातील रक्कम परस्पर काढून घेतली. तपास हवालदार जाधव करीत आहेत.

### वाहनातून चोरट्यांनी बॅग लांबवली

**नाशिक :** पार्क केलेल्या वाहनातून चोरट्यांनी बॅग लांबविल्याची घटना तपोवनात घडली. या बॅगेत सुमारे दीड लाखाचे दागिने होते. आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सरिता रामदास जाधव (रा. कल्याण) यांनी फिर्याद दिली आहे. जाधव कुटुंबीय बुधवारी (दि.१७) देवदर्शनासाठी शहरात आले होते. सायंकाळच्या सुमारास ते तपोवनात देवदर्शन करीत असतांना ही घटना घडली. स्वामी नारायण मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावर पार्क केलेल्या झायलो (एमएच ०४ जीई ६९८३) वाहनाचा दरवाजा उघडून चोरट्यांनी बॅगसह स्टीलची शेगडी चोरून नेली. या बॅगेत सुमारे १ लाख ४७ हजार ७०० रुपये किमतीचे सोन्याचांदीचे अलंकार होते. तपास हवालदार जाधव करीत आहेत.

### मारहाण करीत महिलेचा विनयभंग

**नाशिक :** महिलेच्या घरात घुसून एकाने मारहाण करीत विनयभंग केल्याची घटना सिडको भागात घडली. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मधुकर दराडे (रा. शिवशक्तीचौक, त्रिमूर्ती चौक) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. पीडितेच्या तक्रारीवरून गुरुवारी (दि.१८) ही घटना घडली. महिला घरात एकटी असताना संशयिताने घरात घुसून तिला शिवीगाळ व दमदाटी करीत मारहाण केली. अधिक तपास उपनिरीक्षक उंडे करीत आहेत.

### नाशिकरोड येथे जुगाऱ्यांवर कारवाई

**नाशिक :** नाशिकरोड येथील सोमाणी गार्डन भागात उघड्यावर जुगार खेळणाऱ्या चार जुगारींवर पोलिसांनी कारवाई केली. संशयितांच्या ताब्यातून रोकडसह जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले असून, नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशोक नामदेव गोडसे (रा. भारतीमठ, ना.रोड ), चंद्रभान दशरथ गांगुर्डे (रा. दे. कॅम्प), जितेंद्र जेठमल कोटेचा (रा. ना.रोड) व राधेश्याम कन्हैयालाल छाजेड (रा. लवटेचाळ) अशी संशयित जुगारींची नावे आहेत. सोमाणी गार्डन भागात काही तरुण जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार गुरुवारी (दि.१८) पोलिसांनी धाव घेत छापा टाकला असता संशयित किरण हॉटेल मागे तीन पत्ती जुगार खेळताना मिळून आले. संशयितांच्या ताब्यातून १ हजार ५०० रूपयांची रोकड व जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले असून, अंमलदार राजेंद्र चौधरी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास हवालदार शेख करीत आहेत.

### काका-पुतण्यास भावांची मारहाण

**नाशिक :** काका-पुतण्यास दोघा भावांनी बेदम मारहाण केल्याची घटना हिरावाडीत घडली. या घटनेत पुतण्याच्या बचावासाठी धावून गेलेल्या काकावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आल्याने ते जखमी झाले असून, पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजू रवी मोरे (४०) व नितीन रवी मोरे (४५, रा. जोशी कॉलनी, हिरावाडी) अशी काका-पुतण्यास मारहाण करणाऱ्या संशयितांची नावे आहेत. संजय प्रभाकर ससाणे (रा. खंडेराव मंदिराजवळ, जोशी कॉलनी, हिरावाडी) यांनी फिर्याद दिली आहे. खंडेराव मंदिराजवळ बुधवारी (दि.१७) रात्री ही घटना घडली. संशयितांनी ससाणे यांच्या पुतण्यास गाठून शिवीगाळ व दमदाटी करीत होते. यावेळी ससाणे आपल्या पुतण्याच्या मदतीला धावून गेले असता दोघा भावांनी काका-पुतण्यास बेदम मारहाण करीत ससाणे यांच्यावर धारदार शस्त्राने वार केला. या घटनेत ससाणे जखमी झाले असून, तपास हवालदार घुगे करीत आहेत.

# इंदिरानगरला ट्रकच्या मागील चाकाखाली आल्याने तरुणाचा मृत्यू

## अवजड वाहनाच्या वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर

**इंदिरानगर : वार्ताहर**

राजीवनगर वसाहत येथे ट्रकच्या मागील चाकाखाली आल्याने एका तरुणाचा मृत्यू झाला तर एक युवक गंभीर जखमी झाला आहे. यामुळे पुन्हा एकदा इंदिरानगर मार्गे होणाऱ्या अवजड वाहनाच्या वाहतुकीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार शुक्रवार ( दि. १९) रोजी रात्री लेखानगरकडून भरधाव वेगाने ट्रक (क्रमांक एमएच १६ क्यू ४२३७) कलानगरकडे जात होता. यावेळी दोन मित्र त्यांच्या मोटारसायकलने जात होते. ट्रक व मोटारसायकल यांच्यात अपघात होऊन समिहंत पत्की ( वय १४ वर्षे, रा. इंदिरानगर) हा युवक



मागील चाकाखाली आल्याने त्याचा मृत्यू झाला, तर एक युवक गंभीर जखमी झाला.

अपघात झाल्याचे कळताच आजूबाजूच्या लोकांनी गर्दी केली. रुग्णवाहिका बोलावून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत उशिरापर्यंत इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

इंदिरानगर मार्गे होणारी अवजड वाहनांची वाहतूक बंद करावी याबाबत अनेक वर्षांपासून मागणी आहे. सर्वपक्षीय कार्यकर्ते एकत्र येऊन कलानगर चौकात याबाबत आंदोलन छेडण्यात आले होते. वाहतूक बंद करावी याबाबत वेळोवेळी निवेदने देण्यात आली. मात्र, प्रशासनाकडून त्यास केराची टोपली दाखवली गेली. अजून किती अपघात होण्याची प्रशासन वाट पाहत आहे, असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

## दिंडोरी लोकसभेची जागा माकपला द्या

### दिंडोरी गावित समर्थकांचा मेळावा

**दिंडोरी : प्रतिनिधी**

दिंडोरी लोकसभेत विद्यमान खासदार डॉ. भारती पवार यांच्या विरोधात जनमत तयार झाले आहे. मतदारसंघातील जनतेने ठेवलेल्या विश्वासात त्या पात्र ठरल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्या विरोधात असंतोष आहे. त्यामुळे त्यांना टक्कर देईल असा उमेदवार महाविकास आघाडीकडून देणे अपेक्षित आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी पुन्हा एकदा विचार करून महाविकास आघाडीची जागा माकपला देत दिंडोरी लोकसभेची उमेदवारी मला जाहीर करावी, असे प्रतिपादन माजी आमदार जे. पी. गावित यांनी केले आहे. दिंडोरी येथील सीडफॉर्म येथे माजी आमदार जे. पी. गावित यांच्या समर्थकांचा मेळावा संपन्न झाला. त्याप्रसंगी गावित बोलत होते. यावेळी दिंडोरी लोकसभेची उमेदवारी जे. पी. गावित यांना दिले तर निश्चितच भाजपच्या उमेदवारांचा पराभव होऊ शकतो, असा विश्वास व्यक्त करत महाविकास आघाडीने दिंडोरी लोकसभेची जागा माकप पक्षाला देत जे. पी. गावित यांना उमेदवारी द्यावी, असा ठराव या सभेत करण्यात आला.



## चार दिवसांत ४९०० क्युबिक मीटर गाळाचा उपसा

**नाशिक : प्रतिनिधी**

समृद्ध नाशिक फाउंडेशनद्वारा जलसमृद्ध नाशिक अभियान २०२४ भारतीय जैन संघटना, नाशिक मानव सेवा फाउंडेशन, आर्ट ऑफ लिव्हिंग अंतर्गत काल शुक्रवार दि. १९ रोजी गंगावऱ्हे गावालगत गंगापूर धरणातून ३ पोकलेन मशीनच्या सहाय्याने १०३ हायवा ट्रक व ५ ट्रॅक्टर सुपीक माती / गाळ काढण्यात आला व तो परिसरातील शेतकऱ्यांनी वाहून नेला. अशा रीतीने जवळपास १२५० क्युबिक मीटर गाळाचा उपसा झाल्याने १२ लाख ५० हजार लिटर पाणी क्षमता वाढण्यास मदत झाली आहे.

गेल्या ४ दिवसांत ४९०० क्युबिक मीटर गाळाचा उपसा करण्यात आला असून, जवळपास ४८६५००० लिटर पाणी क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. गंगापूर धरणात मोठ्या प्रमाणावर गाळ असल्याने अधिक काम होण्याची आवश्यकता आहे, त्या दृष्टिकोनातून गंगावऱ्हेबरोबरच गंगापूर धरण परिसरातील पिंपळगाव गरुडेश्वर व शिवणगाव येथे यंत्राद्वारे गाळ काढण्याच्या कामाचा लवकरच शुभारंभ होत आहे. त्याकरिता परिसरातील शेतकऱ्यांनी पुढे येऊन गाळ / सुपीक माती वाहून नेण्याची तयारी दर्शविल्यास अधिक मोठ्या प्रमाणावर काम करता येईल व त्यायोगे गंगापूर धरणातील पाणीक्षमता वाढविण्यास मदत होईल व भविष्यातील पाणीसंकटावर मात करता येईल, असा निर्धार समृद्ध नाशिक फाउंडेशनने केला आहे.

## अंध:कारातून बाहेर पडण्यासाठी ज्ञानाचा प्रकाश आवश्यक : काळे

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**

विज्ञानवादी जगात जगत असताना अंधःकारतून बाहेर पडण्यासाठी ज्ञानाचा प्रकाश आवश्यक असतो व त्यासाठी आई, वडील, गुरुजन व पुस्तके हेच खरे मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन रिपाइं उत्तर महाराष्ट्र नेते विश्वनाथ काळे यांनी केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ज्ञानमंदिर येथे ज्ञानमंदिर व सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार काल, आज आणि उद्या या विषयावर आयोजित चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानावरून काळे बोलत होते. त्यांनी आजच्या युवा पिढीने डॉ. आंबेडकर यांचा संघर्षाचा अभ्यास करून जीवनात वाटचाल करणे गरजेचे आहे.

गुलामगिरीतून माणसाला बाहेर काढून त्याला माणसाप्रमाणे जगण्याचे अधिकार ज्या संविधानाने दिले ते संविधान प्रत्येक घरोघरी ग्रंथ म्हणून पूजन करणे गरजेचे आहे. वाचाल तर वाचाल ही संकल्पना दृढ करा, बाबासाहेबांना डोक्यावर नव्हे तर डोक्यात घ्या, जगाच्या या महामानवाला कोणा एका जाती-धर्माचे न बांधता संपूर्ण मानव जातीचे उद्धारक असे संबोधने गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी उपाध्यक्ष सचिन ठाकरे यांनी जयंती उत्सवाच्या खर्चातून १० टक्के रक्कम बाजूला काढून गरजू विद्यार्थ्यांच्या पुस्तकांसाठी खर्च करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

तसेच सतीश मेवाणी, क्रांती सार्वजनिक वाचनालय अध्यक्ष सुधाकर गोडसे यांचीही समयोचित भाषणे झाली. मंचावर संस्थेचे माजी सरपंच युवराज गोडसे, नीता गोडसे, वैशाली चौधरी, पल्लवी कुलकर्णी विजय कुकरेजा जीवन गायकवाड आदी पाहुणे उपस्थित होते. याप्रसंगी भीमराव धिवरे, संजय भालेराव, सिद्धार्थ पगारे, गौतम पगारे, आर. डी.जाधव, महेंद्र सोनवणे, सुरेश निकम, रवींद्र भदाणे,अशोक साळवे, पदमाकर दोंदे, पंडित साळवे, दीपक काळे, अविनाश काळे, कुंदन दोंदे, सिद्धांत दोंदे, गौतम गजरे, बंटी आडके अरुण निकम संतोष भडांगे गिरीश मोरे, राजाभाऊ वाघमारे आदींसह नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन गौतम भालेराव यांनी केले.

## नरेश कारडा यांची जामिनासाठी उच्च न्यायालयात धाव

**नाशिक : प्रतिनिधी**

बिल्डर नरेश कारडा याच्यावर गुन्हे असलेल्या फसवणुकीच्या प्रकरणांचा सखोल तपास उपनगर व आर्थिक गुन्हे शाखेने पुन्हा सुरू केला आहे. नाशिक जिल्हा न्यायालयानेही कारडा याचा जामीन अर्ज फेटाळल्यानंतर तो उच्च न्यायालयात अपील करण्याच्या तयारीत असून, सध्या पसार आहे. अर्ज दाखल केलाच तर उच्च न्यायालय त्याचा जामीन फेटाळेल की अटकेचे आदेश देईल, यावर सध्या सर्वांचे लक्ष आहे. कारण, कारडाच्या गुन्ह्यांची जंत्री पाहिली तर आतापर्यंत त्याच्याविरोधात १५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे निष्पन्न होत आहे.

कारडा याच्यासह इतर संशयितांविरुद्ध नोव्हेंबर २०२३ पासून आतापर्यंत मुंबई नाका व देवळाली कॅम्प पोलिसांत प्रत्येकी एक, उपनगरमध्ये चार व नाशिकरोडमध्ये दोन गुन्हे नोंद आहेत. आर्थिक गुन्हे शाखेत नागरिकांनी दाखल केलेल्या तक्रार अर्जांची चौकशी करून त्यानुसार गुन्हे नोंद होत आहे. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके रवाना केली आहेत. तांत्रिक तपासाच्या माध्यमातून त्यांना पकडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. याआधीच कारडा समूहाच्या कार्यालयातून 'हार्डडिस्क' व महत्त्वाची कागदपत्रे जप्त केल्यामुळे रखडलेल्या प्रकल्पांसह इतर तपास सुरू आहे. पोलिसांनी कागदपत्रांची तपासणी करून कारडा याच्या रखडलेल्या बांधकाम प्रकल्पांचा तपास सुरू केला आहे. अनेक प्रकरणांत काही कागदपत्रेही बनावट असल्याने फिर्यादींनी पैसे परत मागितले. त्यावर संशयितांनी टाळाटाळ केल्याने फिर्याद नोंदविण्यात आल्या आहेत.

## संशयितांनी केली सोळा लाखांची बॅग लंपास

**पंचवटी : वार्ताहर**

नाशिक शहरामध्ये घरफोडी, दुचाकी चोरी, सोनसाखळी चोरीच्या घटना घडतच आहे. यातच बुधवार (दि. १७ ) रोजी आरटीओ ऑफिसच्या उत्तरेकडील भिंती समोरील वजन काटा येथे रात्री पावणेआठ ते साडेआठ वाजेच्या दरम्यान एका व्यापाऱ्याची सोळा लाखांची रोकड असलेली बॅग लंपास केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, पवन मोहनलाल लोढा (वय ४२, रा. शिव समर्थ नगर, किशोर सूर्यवंशी मार्ग) हे आपल्या कुटुंबासह राहतात. लोढा यांचे शरदचंद्रजी पवार मार्केट यार्डात तेल, साखर, तूप यांचा व्यवसाय आहे. त्यांचे आदिनाथ ट्रेडिंग कंपनी म्हणून दुकान आहे आणि त्यांच्यासमवेत त्यांचे नातेवाईक दिलीप छाजेड देखील काम करतात. नित्यनियमाने कामकाज उरकून व्यवसायात प्राप्त झालेली रक्कम घेऊन पावणेआठ ते साडेआठ वाजेच्या दरम्यान लोढा यांचे नातेवाईक दिलीप छाजेड (वय ६०) हे ॲक्टिव्हाहून ते लोढा यांच्या घरी जात होते.

त्यावेळी आरटीओ ऑफिसच्या उत्तरेकडील भिंतीसमोरील वजनकाटा येथे दुचाकीहून आलेल्या संशयितांनी त्यांच्या ॲक्टिव्हा गाडीला आडवी मारली आणि अचानक डोक्यात फटका मारला. त्यावेळी दिलीप छाजेड यांना झांज आली. त्याचाच फायदा उचलत संशयिताने छाजेड यांच्याकडील बॅग बळजबरीने हिसकावून घेत पोबारा केला. याप्रकरणी म्हसरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## तडीपार गुंडाच्या मुसक्या आवळल्या

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा न्यायालयाच्या आवारात वावरणाऱ्या तडीपार गुंडाच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या. सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अब्दूल लतीफ यानीस कोकणी (४६, रा. राजमहल बंगला,कोकणीपुरा) असे संशयिताचे नाव आहे. कोकणी याच्या गुन्हेगारी कारवायांमुळे त्याच्याविरूध्द पोलीसांनी हद्दपारीची कारवाई केली आहे. शहर आणि जिह्यातून त्यास दीड वर्षासाठी तडिपार केलेले असतांनाही त्याचा वावर शहरातच असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. गुरुवारी (दि.१८) तो जिल्हा न्यायालयात मिळून आला असून, याप्रकरणी अंमलदार नंदिनी जगताप यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस दप्तरी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस नाईक थेटे करीत आहेत.


## आनंद नागरी पतसंस्थेस २ कोटींचा नफा : धाडीवाल

**नाशिकरोड : वार्ताहर**

येथील आर्टिलरी सेंटर रोडवर १९८७ साली स्थापन झालेल्या आनंद नागरी सहकारी पतसंस्थेने सातत्याने आपल्या आर्थिक उलाढालीचा व उत्कर्षाचा आलेख उंचावत नेला आहे. संपलेल्या आर्थिक वर्षात सर्व तरतुदी करून निव्वळ नफा २ कोटी ८ लाख रुपये झाला आहे. वसुलीही ९६ टक्के तर थकबाकी ४ टक्क्यांवर आणली आहे. एनपीए मात्र शून्य टक्के असल्याची माहिती चेअरमन महेंद्र धाडीवाल यांनी दिली.

अधिक माहिती देताना व्हा. चेअरमन मिलिंद चोपडा म्हणाले, संस्थेचे २६८१ सभासद असून, १ कोटी ६५ लाख भाग भांडवल तर ठेवी ५१ कोटी आहेत. गुंतवणूकही ३२ कोटी रुपये केली आहे. तर ३४ कोटी रुपये सुरक्षित व तारणी कर्ज वितरण केले आहे. संस्थेचे खेळते भागभांडवल ६८ कोटी रु. आहे. संस्थेची कुठलीही शाखा नसताना संस्थेने ८५ कोटी





४० लाखांचा व्यवसाय केला आहे, असेही ते म्हणाले. संस्था आर्थिक कामकाजाबरोबरच विविध धार्मिक सामाजिक व सांस्कृतिक कार्यात नेहमीच अग्रेसर राहते. येथील अनुराधा चौकात संस्थेने नाशिक मनपाच्या सौजन्याने अद्ययावत असे आनंद सर्कल वाहतूक बेट उभारले आहे. अयोध्येत झालेल्या राम मंदिर प्रतिष्ठान सोहळ्याचे औचित्य साधत संस्थेने या सर्कल येथे आनंद सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळी सभासदांसह अनेक ठेवीदार व नागरिकांनी या आनंद सोहळ्यात भाग घेतला होता. कर्जदार व ग्राहकांसाठी ठाणे जनता सहकारी बँक यांच्यामार्फत आरटीजीएस व एनईएफटीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच लॉकर्सची सुविधाही सर्वांसाठी आहे. संस्थेच्या प्रगतीत संचालक मंडळ, तज्ज्ञ संचालक, व्यवस्थापक, कर्मचारी वर्ग तसेच सभासद, ठेवीदार, कर्जदार ग्राहक व हितचिंतक या सर्वांचे योगदान असल्याचेही धाडीवाल, चोपडा यांनी आवर्जुन सांगितले. याप्रसंगी संचालक सर्वश्री अजित संकलेचा, प्रकाश कोठारी, डॉ. राजेंद्र मंडलेचा, चांदमल कोचर, नंदलाल जैन, सतीश धाडीवाल, नामदेव आहिरे, संचालिका सौ. प्रतिभा चोरडिया, इंदिरा वर्मा, शीतल शहा, तज्ज्ञ संचालक विधिज्ञ शैलेश साबद्रा, सनदी लेखापाल कमलेश छाजेड, रमणलाल धाडीवाल, उमेश चोपडा, व्यवस्थापक दिलीप वर्मा आदी उपस्थित होते. संस्थेच्या ३८ व्या वर्धापन दिनानिमित्त सभासद, ठेवीदार, कर्जदार यांचेसाठी वैभव मांगले व निर्मिती सावंत यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या संध्याछाया या नाटकाचे आयोजन केले असल्याचेही धाडीवाल, चोपडा म्हणाले.

## जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीची विशेष मोहीम

**नाशिक : प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंतीचे ऑचित्य साधून, सामाजिक न्याय व वशेष सहाय्य विभागाअंतर्गत समता पंधरवडा कालावधी (दि. १० एप्रिल ते २५ एप्रिल, २०२४) या कालावधीत जात प्रमाणपत्र पडताळणीची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

सदर माहिमेअंतर्गत राज्यातील सन २०२४ या वर्षी इयत्ता १२ वी विज्ञान शाखेतील सीईटी दिलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी तसेच सेवा व निवडणूक प्रकरणांसाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नाशिक कार्यालयात जात प्रमाणपत्र पडताळणीचे प्रकरणे त्रुटी पूर्ततेअभावी अर्जदार स्तरावर प्रलंबित आहेत. अर्जदारांनी नोंदणी केलेल्या ई-मेलवर उउतखड-ख।। प्रणालीव्दारे कळविण्यात आल्या आहेत. तरी सुध्दा अर्जदारांनी त्रुटींची पूर्तता केलेली नाही. त्यामुळे त्यांची प्रकरणे त्रुटीपूर्ततेअभावी प्रलंबित आहे. अशा प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी दिनांक २२ एप्रिल २०२४ ते २३ एप्रिल २०२४ या कालावधीत जात प्रमाणपत्र पडताळणीची विशेष मोहीम या विशेष मोहिमेअंतर्गत अर्जदारांनी त्यांना ई-मेलवर कळविण्यात आलेल्या त्रुटीसंह व मूळ कागदपत्रांसह समिती कार्यालयाच्या नागरी सुविधा केंद्रात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ०४.०० या वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. अर्जदारांकडून वरील कालावधीत त्रुटी पूर्तता न केल्यास त्यांच्या प्रकरणांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. जिल्हा जात प्रमाणपत्र समिती नाशिक यांच्या वतीने सन २०२४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १२ वी विज्ञान शाखेतील १००१२ वैध करण्यात आलेली आहेत. तसेच एप्रिल २०२४ महिन्यात ७७२ प्रकरणांवर वैध निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

## संत रचनांमुळे जीवनाकडे बघण्याचा व्यापक दृष्टिकोन : डॉ. राधा मंगेशकर

**नाशिक : प्रतिनिधी**

घरातील संगीत, वाचन यांचे वातावरण वडील पं. हृदयनाथ मंगेशकर यांचे वाचनाचे संस्कार आणि संगीताचे बाळकडू यामुळे जीवनाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन मिळत गेला. सोबत तत्त्वज्ञानाचा अभ्यास, प्राचीन हिंदीचा अभ्यास, कवी दधीच, कबीर, सूरदास, मीराबाई यांच्या रचना जीवनाचे सत्य सांगतात. त्यामुळे एक दृष्टी मिळाली. काळाला परावर्तित करण्याचे सामर्थ्य संतपरंपरेत आहे. त्यामुळे 'कहे मीरा सूर कबीरा' या पुस्तकाचे लेखन झाले. संगीताच्या माध्यमातून अध्यात्म परंपरा लोकांपर्यंत पोहोचू शकते हे संतांनी जाणले आणि लोकांनी भावभक्तीची त्याला जोड दिली. तो ईश्वरापर्यंत




पोहोचण्याचा मार्ग आहे ही जाणीव झाली. त्यामुळे ही परंपरा आजही टिकून आहे. त्यातून संगीत परंपरा निर्माण झाल्या, असे प्रतिपादन डॉ. राधा मंगेशकर यांनी केले.

विश्वास को-ऑप. बँक लि. बाबाज थिएटर्स नाशिक, विश्वास ज्ञानप्रबोधिनी अॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट नाशिक, रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा जलालपूर यांच्या संयुक्त विद्यमाने राधा मंगेशकर यांची मुलाखत अपर्णा क्षेमकल्याणी यांनी घेतली. कुसुमाग्रज स्मारक येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. विशेष सहकार्य जय गुरुदेव फाउंडेशन यांनी केले. कबीर हा दार्शनिक कवी होते. त्यांनी जगाला जीवन जगण्याची दृष्टी दिली, असेही राधा मंगेशकर म्हणाल्या. यावेळी राधा यांनी देशातील संतपरंपरा, चळवळ, समाजप्रबोधन, शिष्यपरंपरा याविषयी भाष्य केले.

कार्यक्रमाचे स्वागत प्रास्ताविक डॉ. हरी कुलकर्णी यांनी केले. जय गुरुदेव फाउंडेशनच्या योगिता पाटील यांनी राधा मंगेशकर, अपर्णा क्षेमकल्याणी यांचा सत्कार केला. लोकेश शेवडे यांचा सत्कार कैलास पाटील यांनी केला. प्रशांत जुन्नरे यांनी संयोजन केले.

## महत्त्वाचे

### मडकीजांब येथे प्राणप्रतिष्ठा



**दिंडोरी : प्रतिनिधी**

दिंडोरी तालुक्यातील मडकीजांब येथे श्री सिद्धेश्वर महादेव मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला असून, यानिमित्त उद्या २१ एप्रिल रोजी हभप विवेक महाराज केदार यांचा जाहीर कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तीन दिवस चालणाऱ्या या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात प्रथमदिवशी भगवान श्री शंकरांच्या नूतन शिवलिंग पिंडीची गावातून मिरवणूक व शोभायात्रा काढण्यात आली. यात ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नूतन शिवलिंगाच्या मूर्तीचे पूजन करून स्वागत केले. गुरू उमेश मुळे यांच्या व इतर ब्राह्मणवृंदांच्या हस्ते मूर्तीचे विधिवत पूजन करून प्राणप्रतिष्ठा सोहळा होत आहे. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास व कीर्तनास पंचक्रोशीतील भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मडकीजांब ग्रामस्थांनी व सिद्धेश्वर महादेव मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा नियोजन समितीने केले.

### विंचूरला श्रीराम नवमी उत्साहात

**विंचूर : प्रतिनिधी**

श्री रामनवमीनिमित्त येथील श्री प्रभू राम मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच सुशोभीकरण करण्यात आले होते. तर दुपारी १२ वा. रामजन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. महिला भजनी मंडळाने कीर्तन तसेच विविध भक्तिगीत गाऊन कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित केला. यावेळी रामभक्तांना पंजिरीचा प्रसाद वाटप करण्यात आला. सायंकाळी सजविलेल्या रथातून प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. नागरिकांच्या वतीने शोभायात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी रांगोळी काढण्यात आली तसेच फुलांचा वर्षाव करण्यात आला. शोभायात्रेमध्ये फटाक्यांची आकर्षक आतषबाजी करण्यात आली होती.

## निधन वार्ता

### जिजाबाई जुन्नरे

**लाखलगाव : वार्ताहर**



पाथर्डी येथील जिजाबाई गंगाधर जुन्नरे (६४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पाथर्डी येथील छायाचित्रकार ज्ञानेश्वर व नीलेश जुन्नरे यांच्या त्या मातोश्री होत.

### शेवंताबाई म्हस्के

**नाशिकरोड : वार्ताहर**



कोटमगाव येथील शेवंताबाई दगूजी म्हस्के (९५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कोटमगावचे शेतकरी चंद्रभान म्हस्के, बाबूराव म्हस्के, कारभारी म्हस्के यांच्या त्या मातोश्री होत.

### सुनील शिंदे

**नाशिक :**



नांदूर खुर्द येथील रहिवासी सुनील शिंदे यांचे चिरंजीव कल्पेश सुनील शिंदे यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, काका, काकू, बहीण, चुलतभावंडे असा परिवार आहे

### सुधाकर जगताप

**येवला : प्रतिनिधी**



येथील नगरपालिकेचे माजी सेवानिवृत्त कर्मचारी सुधाकर रामदास जगताप (६०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, मुलगा, भाऊ असा परिवार आहे.

# पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांची पातळी घटली

## इगतपुरीकरांनी पाणी जपून वापरावे : पंकज गोसावी

**इगतपुरी : प्रतिनिधी**

इगतपुरी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या भावली धरणामध्ये अवघा १२ टक्केच तर तळेगाव धरणात २५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. तसेच नगरपरिषद तलावातदेखील पाणीसाठा घटला आहे. तळेगाव धरणातून येणारी परिस्थिती लक्षात घेता हॉटेल, संस्था, कंपन्या यांच्यासह इगतपुरी शहरवासीयांसाठी होणाऱ्या पाणीपुरवठ्यात सरसकट २५ टक्के पाणी कपात करण्याचा निर्णय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने घेतला असल्याचे अभियंता मोहन सांगळे यांनी सांगितले आहे.

तर इगतपुरी नगर परिषदेचा पाणीपुरवठा करणारा सांडवा आटला असून, तलावातील पाणीही संपण्याच्या मार्गावर आहे. पावसाळा सुरू व्हायला अजून दोन महिन्यांचा अवधी शिल्लक असून, नगर परिषद प्रशासनही येणाऱ्या काळात पाणीटंचाई भासू नये यासाठी पाण्याचे योग्य नियोजन करत असून, येणाऱ्या काळात पाणीटंचाई जाणवू नये म्हणून इगतपुरी नगर परिषद हद्दीतील नागरिकांनीही पाण्याचा योग्य पद्धतीने जपून वापर करावा, असे आवाहन इगतपुरी नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज गोसावी यांनी इगतपुरीकरांना केले आहे.



**इगतपुरी नगर परिषद तलावात घटलेले पाणी. ( छाया : ओंकार गवांदे)**



## विजयनगर तालुका चांदवड येथे द्राक्ष उत्पादकाची दोन लाखांची फसवणूक

**सोग्रस : वार्ताहर**

चांदवड तालुक्यातील विजयनगर येथील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्याची दोन लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तीन परप्रांतीय व्यापाऱ्यांविरुद्ध वडनेरभैरव (ता. चांदवड) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विजयनगर (ता. चांदवड) येथील द्राक्ष उत्पादक शेतकरी अभिमान केदू काळे यांनी वडनेरभैरव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तारीख २ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत व्यापारी लोकेंद्र सिंह, दिवान सिंह, सुनील सिंह (तिघेही राहणार फत्तेपूर, सिक्री हसनपुरा, आग्रा, हल्ली राहणार खेडगाव, ता. दिंडोरी) यांनी शेतकरी काळे यांच्या शेत गट नंबर १७४ मधील द्राक्षबागेतून प्रतिकिलो ३१ रुपये दराने एकूण चार लाख सोळा हजार रुपये किमतीच्या ११६ क्विंटल द्राक्षमालाची खरेदी केली. त्यातील दोन लाख १६ हजार रुपये दिले. मात्र, उर्वरित दोन लाख रुपये न देता फसवणूक केली. याबाबत पोलिसांनी तिघा व्यापाऱ्यांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.



## दर्शन अकॅडमी देवळाली पब्लिक स्कूलतर्फे सरबत सेवाकार्य

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**

दर्शन अकॅडमी देवळाली पब्लिक स्कूल या शाळेतर्फे नाशिकरोड पंचक्रोशीतील जयभवानी रोड परिसरात सरबत वाटप करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका उर्मिला शर्मा, शाळेचे शिक्षकवृंद व विद्यार्थी यांनी उत्स्फूर्तपणे सेवाकार्य पार पाडण्याची जबाबदारी घेतली. सरबत वाटप करून नागरिकांना तृप्त केले.

एका हाताने केलेली मदत दुसऱ्या हाताला कळू नये, या विचाराने दर्शना अकॅडमी देवळाली पब्लिक स्कूल ही शाळा अनेक ठिकाणी मदत करत असते. या शाळेने केलेले सत्कार्य हे तुम्हा आम्हापर्यंत प्रत्येक तोंडी माहीत होतच असते.

त्याचप्रमाणे अनेक छोट्या गावात पाण्याचा टँकर लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य व मोकळ्या जागी झाडे लावणे, रस्त्यावरील झाडांना पाणी घालणे तसेच गरजू लोकांना रोटी बँकद्वारा या शाळेचे विद्यार्थी ठिकठिकाणी दिसून येतात. यावरून दिसून येते की, केलेले कुठलेही कार्य लपत नसते, उलट ते उजळून निघते.

## करिअरमध्ये वाचनालयाचे स्थान महत्त्वाचे : प्रा. जाधव

**निफाड शहर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनात मोबाइलला दूर ठेवून पुस्तकांना जवळ करावे तरच जीवनात अपेक्षित यश मिळेल, असे प्रतिपादन कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयाचे नवनिर्वाचित प्राचार्य डॉ. सुरेश जाधव यांनी केले. निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयातील मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी श्री माणकेश्वर वाचनालयास शैक्षणिक भेट दिली. त्याप्रसंगी ते बोलत होते. प्रास्ताविकात वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार यांनी वाचनालयाची माहिती दिली. वाचनालयाचे संचालक प्रा. महेश बनकर यांनी मनोगत व्यक्त केले. वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, प्राचार्य डॉ. सुरेश जाधव, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख अभय वडघुले, डॉ. सुनीता उफाडे, बाळासाहेब कापसे, दत्तात्रय उगावकर, महेश बनकर, नितीन बनसोडे, विद्या बंद्रे, अनिता इस्ते उपस्थित होते. आभार बाळासाहेब कापसे यांनी मानले.

## सायकलिंग स्पर्धेत योगेशला सुवर्णपदक

**नाशिक : प्रतिनिधी**

ताहाराबाद येथील मविप्र संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, ताहाराबाद विद्यालयातील इयत्ता अकरावीचा विद्यार्थी कु. योगेश नामदेव सोनवणे याने राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेत सुवर्णपदक मिळवून मविप्र संस्थेचे तसेच ताहाराबाद विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले.

नुकतीच हरियाणा राज्यातील पंचकुला या ठिकाणी राष्ट्रीय माउंटन बाइक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा पार पडली. सदर स्पर्धेत ताहाराबाद विद्यालयातील विद्यार्थी योगेश सोनवणे याने सहभाग नोंदविला होता. त्यात सबज्युनिअर गटात योगेशने ५१ मिनिटे व ४१ सेकंद या विक्रमी वेळेत सदर स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत त्याने तीन सुवर्णपदके जिंकून मविप्र संस्थेचे, विद्यालयाचे तसेच नाशिक जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले. मागील काही महिन्यांत पार पडलेल्या मविप्र मॅरेथॉन स्पर्धेतदेखील त्याने सहावा क्रमांक पटकावला होता. सदर स्पर्धेत उज्ज्वल यश प्राप्त केल्यामुळे योगेशला आता पुढील काही दिवसांत हरियाणा राज्यात पार पडणाऱ्या सायकलिंग इंडिया कॅम्पमध्ये सहभाग घेता येणार आहे. त्यानंतर मलेशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेत त्याला लहान गटातून भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त होणार आहे.

योगेश हा ग्रामीण भागातून तसेच गरीब कुटुंबातून प्रसिद्धीस आलेला युवा सायकलपटू आहे. भारतातील ग्रामीण भागातील तरुणांमध्ये किती गुणवत्ता आहे याचे उदाहरण योगेशने सगळ्यांना दिले. सर्व स्तरातून योगेशचे अभिनंदन होत आहे. मविप्र संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी मविप्र संस्थेचे बागलाण तालुका संचालक डॉ. प्रसाद सोनवणे, महिला संचालिका शालनताई सोनवणे तसेच ज्युनिअर कॉलेज शालेय समितीचे अध्यक्ष विलासबापू निकम, श्री. गांगुर्डे सर यांच्यासह प्रत्यक्ष ताहाराबाद विद्यालयात जाऊन योगेश सोनवणे याचा सत्कार केला. यावेळी ॲड. नितीन ठाकरे यांनी योगेशला भावी काळात सायकलिंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्यास सक्षम होण्यासाठी सहा लाखांची उत्कृष्ट सायकल विकत घेण्यासाठी जो खर्च लागेल त्याचा अर्धा खर्च मविप्र संस्था करेल, असे आश्वासन देऊन योगेशला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




## पिंपळगाव जलाल येथे डॉ. आंबेडकर जयंती

**येवला : प्रतिनिधी**

तालुक्यातील पिंपळगाव जलाल येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३वी जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी सामाजिक कार्यकर्ते जयप्रकाश वाघ, साहित्यिक प्रशांत वाघ यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत भगवान गौतम बुद्ध, महात्मा फुले, माता रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष तसेच सदस्य प्रदीप धिवर, ज्ञानेश्वर वाघ, विक्रम केदारे, फकिरा वाघ, पप्पू वाघ, प्रतीक वाघ, रोहन वाघ, रोहन धिवर, फिटर अनिल वाघ, सचिन वाघ, समीर वाघ, संदीप धिवर, शांताराम गुंजाळ, प्रवीण पठारे, सिद्धार्थ वाघ, सनी धिवर, रवींद्र वाघ, राजेंद्र वाघ, दीपाली धिवर, भागीनाथ वाघ, संदेश वाघ, प्रकाश वाघ, सुरेखा वाघ, सौ रंजना वाघ, अंजना वाघ, सविता धिवर, स्वाती खंडीझोड, आदेश वाघ, नितीन वाघ, विशाल वाघ, महेंद्र वाघ, अजय वाघ, उदय वाघ, अनिल वाघ, सार्थक वाघ, जयप्रकाश वाघ, आकाश जाधव, गोरख वाघ, दिवाकर वाघ, सुमित वाघ, मयूर सोनवणे, आकाश जाधव, राहुल वाघ, महेश वाघ, पोपटराव वाघ, उमेश वाघ, सुनील वाघ, गोरख वाघ, विशाल धिवर, ज्ञानेश्वर धिवर, वैभव धिवर, अमोल धिवर, ईश्वर धिवर, राहुल धिवर, संतोष धिवर, संदीप धिवर, कमल धिवर, तसेच संजय वाघ, सचिव राजेश वाघ, सदस्य प्रशांत वाघ, अंजनाबाई वाघ, जयश्री वाघ, नीता वाघ, तेजस वाघ, भाग्यश्री बनसोडे, सपना वाघ आदींनी विशेष परिश्रम घेतले.



## ग्लोबल व्हिजनच्या विद्यार्थ्यांनी अनुभवली रात्रीची शाळा

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरातील ग्लोबल व्हिजन स्कूलच्या विद्यार्थ्यांचा नाईट कॅम्पचे (दि. १२ व १५ रोजी) आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, विद्यार्थ्यांनी आकाश निरीक्षण करावेत, कुटुंबातील व्यक्तींविना शाळेतील वर्गमित्रांसोबत रात्रीचे अनुभव अनुभवावेत या दृष्टीने शाळेतील विद्यार्थ्यांचे नाईट कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते.

. या कॅम्पमध्ये शाळेतील शंभरपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. (दि. १२ रोजी) सायंकाळी सहभागी विद्यार्थ्यांची येणाऱ्या आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिक मतदारांनी आपले अमूल्य मतदान करावेत यासाठी मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी आकाश निरीक्षण केले, तसेच विद्यार्थ्यांनी त्यांच्यामधील कलागुण सादर करताना त्यांनी स्वतः लिहिलेल्या कविता सादर केल्या तसेच विद्यार्थ्यांनी रॅप साँग देखील सादर केले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या घराबाहेर आई- वडिलांविना रात्रभर राहण्याचा अनुभव घेतला.

विद्यार्थ्यांना सकाळी पांडवलेणी येथे नेण्यात आले होते आणि तेथे विद्यार्थ्यांनी परिसराची स्वच्छता केली. ट्रेकिंग केले. झुंबा व व्यायाम केला. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून प्रत्येक ॲक्टिव्हिटीमध्ये सहभागी होऊन आनंदाची शिदोरी घेऊन हे विद्यार्थी परतले. त्यांचा हा अविस्मरणीय क्षण नेहमीच आठवणींचा राहील. यासाठी शाळेच्या संचालिका विजयालक्ष्मी मणेरीकर, सचिव शशांक मणेरीकर यांचे मार्गदर्शन लाभले.



# गुटख्याची वाहतूक करणारे वाहन पकडले

## ६ लाख ६४ हजार ५३० रुपयांचा गुटखा पकडला

**दिंडोरी : प्रतिनिधी**

वारंवार कारवाया करूनही गुटखा तस्करी गुजरात राज्यातून सुरूच असून, आलिशान कारमधून वाहतूक होत असलेला ६ लाख ६४ हजार ५३० रुपयांचा गुटखा व इनोव्हा कार असा एकूण १४ लाख ६४ हजार ५३० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला असून, एकास अटक करण्यात आली आहे.

सविस्तर वृत्त असे की, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अवैध व्यवसायाचे समूळ उच्चाटन करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने यांनी दिले. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक राजू सुर्वे यांना गुजरात राज्यातून गुटख्याची वाहतूक पेठमार्गे होणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्या माहितीची खातरजमा करण्यासाठी पेठ -गुजरात मार्गावर रासेगाव फाटा परिसरात पोलिस निरीक्षक राजू सुर्वे, गणेश शिंदे, नाना शिरोळे, किशोर खराटे या पथकाने सापळा लावला असता यावेळी ०१ - ७२०८ या क्रमांकाची इनोव्हा कार या ठिकाणी आली.



संशयास्पद वाटल्याने कार थांबविली व झडती घेतली असता महाराष्ट्रात प्रतिबंधित सुगंधित तंबाखू व गुटखा असा ६ लाख ६४ हजार ५३० रुपयांचा ऐवज व इनोव्हा कार असा एकूण १४ लाख ६४ हजारांचा ऐवज पोलिसांनी जप्त केला. अवैध गुटख्याची वाहतूक करणारा संशयित आसिफ शफिक पठाण, रा. वडाळा गाव, नाशिक यास अटक करण्यात आली. साठवणूक विक्री व वितरण तसेच वाहतूक यासाठी प्रतिबंध असातानाही खुलेआम गुटख्याची तस्करी कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, असा प्रश्न निर्माण झाला असून, दिंडोरी पोलिस ठाण्यात पठाण या तस्कराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यास गजाआड करण्यात आले आहे.

# वेतन पथक अधीक्षक पाटील यांचे लेखी आश्वासन

## बारागावपिंप्री येथील शिक्षकांचे उपोषण तूर्तास मागे

**नाशिक : प्रतिनिधी**

साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ नाशिकरोड या संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बारागावपिंप्री (ता. सिन्नर) या शाळेच्या ज्युनिअर कॉलेज विभागाचे चार शिक्षक दीपाली तांबे, जयश्री धुमने, सुरेश जाधव, गणेश लोहकरे यांनी सोमवार दिनांक १५ पासून अधीक्षक माध्यमिक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय नाशिक येथे शालार्थ वेतन प्रणालीमध्ये नावे समाविष्ट करण्यासाठी आमरण उपोषणाला सुरुवात केली होती.

उपोषणाच्या चौथ्या दिवशी काल गुरुवार दिनांक १८ रोजी सायंकाळी साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रवीण जोशी तसेच नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव एस.बी. देशमुख,शिक्षक प्रदीप सांगळे, डॉ. अनिल माळी, ज्युनिअर कॉलेज शिक्षक संघटनेचे पदाधिकारी प्रा. संजय शिंदे तसेच जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना पदाधिकारी यांनी पुढाकार घेऊन नितीन पाटील, अधीक्षक माध्यमिक वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक कार्यालय नाशिक यांच्याशी सकारात्मक चर्चा करून प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा केला.




एस. बी. देशमुख व नितीन पाटील यांनी मोबाइल फोनद्वारे नाशिक विभागाचे शिक्षण उपसंचालक भाऊसाहेब चव्हाण आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रवीण पाटील यांच्याशी चर्चा करून निर्णय घेण्यात आला. शिक्षण उपसंचालक भाऊसाहेब चव्हाण यांनी आठ दिवसांत योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मोबाईल फोनद्वारे देऊन नितीन पाटील यांना लेखी आदेश देण्याची सूचना देण्यात आली. त्यानुसार नितीन पाटील यांनी उपोषणकर्त्यांना लेखी आश्वासन देत उपोषण मागे घेण्याची विनंती करण्यात आली. शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेला शब्द पाळावा, अशी विनंती मुख्याध्यापक संघ व संस्थेच्या वतीने तसेच विविध शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना यांच्या वतीने करण्यात आली. अधीक्षक यांच्या लेखी आश्वासनानंतर तूर्तास उपोषण मागे घेण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला आहे. आठ दिवसांत योग्य तो निर्णय घेण्यात येऊन संस्थेच्या सर्व शाखांचे कर्मचारी यांचे थकीत पुरवणी बिले आणि प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी उचित कार्यवाही करण्यात यावी, अन्यथा आठ दिवसांनंतर पुन्हा मुख्याध्यापक संघ व संस्थेचे पदाधिकारी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आमरण उपोषणाला सुरुवात करतील, असा इशारा देशमुख यांनी दिला.

अधीक्षक यांच्या हस्ते लिंबू सरबत देऊन उपोषण सोडले. याप्रसंगी प्राचार्य अशोक बागूल, मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी सेवानिवृत्त प्राचार्य भागीनाथ घोटेकर, सिन्नर तालुक्यातील मुख्याध्यापक संघटनेचे पदाधिकारी,शिक्षक सेना संघटनेचे पदाधिकारी प्राचार्य संदीप पांडे आणि संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# पांढुर्ली उपबाजार आवारात कांदा शेतमाल लिलावाचा शुभारंभ

**सिन्नर : प्रतिनिधी**

कृषि उत्पन्न बाजार समिती, सिन्नरचे पांढुर्ली उपबाजार आवारात कांदा शेतमाल लिलावाचा शुभारंभ बाजार समितीचे सभापती शशिकांत गणपत गाडे यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी उपसभापती सौ. सिंधुताई केशव कोकाटे, संचालक अनिल शेळके, प्रकाश तुपे उपस्थित होते.



पांढुर्ली पंचक्रोशितील शेतकरी बांधवांनी आपला कांदा शेतमाल गोणी मध्ये भरुन लिलावासाठी दुपारी ठिक ३.३० वाजेच्या आत पांढुर्ली उपबाजार आवारात आणावा कांदा शेतमालाचे लिलाव हे प्रचलित पध्दतीने दर सप्ताहाचे सोमवार, बुधवार, शुक्रवार या तीन दिवशी होणार आहे.

सदर दिवशी कांदा खेरेदीदार व्यापारी नंदकुमार जाधव, अभिजित सोनवणे, दिलीप सोनवणे, सुजय सोनवणे, गणेश चौधरी, संदिप वराडे, देवेंद्र जाधव ह्या व्यापाऱ्यांनी कांदा शेतमालाचे लिलावात भाग घेऊन कांदा शेतमाल खरेदी केला. शेतमाल विक्रीसाठी विलास हारक, हिरामन मंडलीक, नवनाथ आव्हाड, राजु गवळी, उत्तम चव्हाणके, सुदाम वाजे, किरण पवार, संजय तुपे, ज्ञानेश्वर हगवणे, सोमनाथ केदार, संजय पवार ह्या शेतकरी बांधवांनी आपला कांदा शेतमाल विक्रीसाठी आणला पांढुली बाजार आवारात अंदाजे १४०० गोण्यांची आवक होऊन शेतकरी ज्ञानेश्वर हगवणे, रा. घोरवड यांच्या ३१ गोण्यांच्या कांदा शेतमालास रू.१५११/- इतका भाव मिळाला. सदर कांदा खरेदी ही शेतकरी ट्रेडर्स ह्या खरेदीदार व्यापाऱ्याने खरेदी केला. याप्रसंगी रमेश सकट, कैलास वाजे, पुंडलीक गायकवाड, मुकूंदराव वाजे, रतन वाजे, विष्णुपंत वाजे, निवृत्ती चव्हाणके आदी उपस्थित होते.

# बागलाण तालुक्यातील भूमिपुत्रांचे केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश

**सटाणा : प्रतिनिधी**

जीवनात आलेल्या अपयशाने खचून न जाता आपले ध्येय साध्य करण्यासाठी जिद्दीने लढले तर निश्चित यश मिळते. हे सिद्ध केले आहे, सागर भामरे व अमित देवरे या दोघा बागलाण तालुक्याच्या भूमिपुत्रांनी. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात आले असताना अपयशाला न जुमानता जिद्दीच्या जोरावर वनोली (ता. बागलाण) येथील सागर भामरे याने तिसऱ्या प्रयत्नात यश मिळविले. तर निताणे (ता.बागलाण) येथील अमित देवरे याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होत पोलिस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली आहे.

> अपयशाने खचून न जाता जिद्द ठेवणे हे यशाचे द्योतक आहे, यश हे मिळतच असते. हे सागर आणि अमित यांनी सिद्ध केले. त्यांनी मिळवलेल्या यशामुळे बागलाणचे नाव देशपातळीवर उंचावले असून, तालुक्याच्या शिरपेचात मानाचा अजून एक तुरा रोवला गेला आहे.
>
> **– दीपिका चव्हाण, सदस्या, महाराष्ट्र राज्य महिला आयोग**

बागलाणच्या माजी आमदार, राज्य महिला आयोगाच्या सदस्या दीपिका चव्हाण व माजी आमदार संजय चव्हाण यांनी आज बागलाणवासीयांतर्फे सागर व अमित या दोघांना शाबासकीची थाप दिली आणि त्यांचा गौरवही केला. सागर शालेय जीवनापासून अभ्यासात हुशार होता. अभियांत्रिकी शिक्षण घेताना पुण्यातील 'व्हीआयटी'मधून ई ॲण्ड टीसी शाखेतून पदवी शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्याला नामांकित टाटा कंपनीत नोकरीची संधी चालून आली; पण प्रशासकीय सेवेत जाऊन समाजसेवा करावी अशी त्याची इच्छा होती. यातूनच त्याने जिद्दीने अभ्यास केला आणि यूपीएससीत यशाचा झेंडा रोवला. त्याचे वडील संजय भामरे शेतकरी, तर आजोबा पंडितराव भामरे हे 'मविप्र' संस्थेत शिक्षक होते. सन २०१९ पासून स्पर्धा परीक्षांची तयारी करताना पहिल्या प्रयत्नात त्याला 'यूपीएससी'त अवघे सात गुण कमी मिळाल्याने त्यांची निवड झाली नव्हती. पुढे डिफेन्सच्या परीक्षेत त्याने यश मिळविले; परंतु वैद्यकीय चाचणीत तांत्रिक कारणामुळे अपयश आले. अशा परिस्थितीत उमेद न हरता त्याने यूपीएससी परीक्षा दिली अन् यशही मिळविले. त्याच्या आई रेखा भामरे या गृहिणी असून, बंधू चेतन भामरे खासगी क्षेत्रात नोकरी करीत आहेत.

निताणे येथील अमित देवरे याने सुद्धा जिद्द, चिकाटी व आत्मविश्वासाच्या बळावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होत पोलिस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली. त्याचे प्राथमिक शिक्षण निताणे जिल्हा परिषद शाळेत तर माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण सटाणा शहरात झाले. सध्या तो संगमनेर येथे कृषि सहाय्यकपदावर कार्यरत असून पोलिस उपनिरीक्षक बनायचे ही त्याची जिद्द होती. अमितचे वडील निवृत्त ग्रामविकास अधिकारी तर आई गृहिणी आहे. त्यांच्या सत्काराप्रसंगी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष केशव मांडवडे, पंचायत समितीचे माजी सभापती वसंतराव भामरे, पोपट चव्हाण, विलास सोनवणे, रेखा भामरे, अमृत खैरनार, भाऊसाहेब भामरे, शांताराम भामरे, गौरव बिरारी, मुकुंद आव्हाड, चेतन भामरे, शुभम गीते आदि उपस्थित होते.



पान नं. १ वरून

## देशात ५९.७१ टक्के मतदारांनी बजावला हक्क

अंदमान निकोबार ५६.८७%, लक्षद्वीप ५९.०२%, महाराष्ट्र ५४.८५% एवढे मतदान झाले आहे.सर्वात कमी मतदान हे बिहारमध्ये झालेले आहे. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात जास्त मतदान झाले तर सत्ताधाऱ्यांविरोधात मत गेल्याचे जाणकार सांगतात. २०१४ पेक्षा २०१९ मध्ये जास्त मतदान झाले होते. परंतु भाजपाचे सरकार पुन्हा आले होते. तर २००९ पेक्षा २०१४ मध्ये जास्त मतदान झाले होते. तेव्हा सत्तांतर झाले होते. यामुळे हे कमी झालेले मतदान कोणाच्या फायद्याचे हे ४ जुलैलाच समजणार आहे.

**मतदान कमी झाल्याने उमेदवारांमध्ये धाकधूक**

नागपूर, चंद्रपूरसह पूर्व विदर्भातल्या ५ जागांवर आज मतदान पार पडलं. पण मतदानाची टक्केवारी फक्त ५५ टक्के इतकी राहिली. त्यामुळं कमी मतदानाचा फटका कोणाला बसेल, यावरुन आता उमेदवारांमध्ये धाकधूक असेल. पूर्व विदर्भातल्या ५ जागांसह देशातल्या एकूण १०२ जागांवर आज मतदान पार पडलं. महाराष्ट्रात जवळपास ५ जागांवर ५५.२९ टक्के मतदान झालंय. सर्वात कमी मतदान नागपुरात झालंय. ४९.०७% मतदानाची नागपुरात नोंद झालीये. चंद्रपुरात ५५.११%, रामटेकमध्ये ५२.३८% , भंडारा-गोंदियामध्ये ५६.८७%, आणि गडचिरोली-चिमूरमध्ये ६५.९७% मतदान झाले.

**कोणामध्ये थेट लढत**

नागपूरमध्ये नितीन गडकरी विरोधात विकास ठाकरे , चंद्रपूरमध्यें भाजपचे मंत्री सुधीर मुनगंटीवारांची लढत, काँग्रेसच्या प्रतिभा धानोरकरांशी आहे. मुनगंटीवारांसाठी चंद्रपूरची जागा प्रतिष्ठेची आहे. रामटेकमध्येही मतदान पार पडलं. इथं शिंदेंच्या शिवसेनेचे राजू पारवे आणि काँग्रेसच्या श्यामकुमार बर्वेमध्ये मुख्य फाईट आहे. भंडारा गोंदियात भाजपचे विद्यमान खासदार सुनील मेंढे आणि काँग्रेसच्या प्रशांत पडोळेमध्ये सामना आहे. इथं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंचीही प्रतिष्ठा पणाला लागली आहे. भंडारा हा नाना पटोलेंचा गृहजिल्हा आहे. पूर्व विदर्भातली ५ वी जागा म्हणजे, गडचिरोली चिमूर. इथं भाजपचे विद्यमान खासदार अशोक नेते आणि काँग्रेसचे नामदेव किरसान आमने-सामने आहेत.

## बंगाल, मणिपूरमध्ये गालबोट!

मतदारसंघात हिंसाचार झाला. तृणमूल काँग्रेसने भाजपविरोधात ८०, तर भाजपने तृणमूल काँग्रेसविरोधात ३९ तक्रारी केल्या. हिंसाचार, मतदारांवर दबाव निर्माण करणे, निवडणूक अधिकाऱ्यांना दमदाटी असे आरोप दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांवर केले.केंद्रीय पोलिस दलातील जवान भाजपच्या कार्यकर्त्यांना मदत करत असल्याचा आरोपही तृणमूलच्या नेत्यांनी केला. भाजपने मात्र हा आरोप फेटाळून लावताना, तृणमूलला पराभव स्पष्ट दिसत असल्यानेच असे आरोप केले जात असल्याचा दावा केला. दोन्ही गटांत मारामारी झाल्याचा आणि काही जण जखमी झाल्याचा दावा केला जात असला तरी निवडणूक अधिकाऱ्यांनी मात्र हिंसाचार झाला नसल्याचे स्पष्ट केले. छिंदवाडामध्ये काँग्रेसचे नेते कमलनाथ यांचे पुत्र नकुलनाथ हे रिंगणात आहेत. या मतदारसंघातही भाजप आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये मारामारी झाल्याचे वृत्त आहे.

**मतदानासाठी ३ किमीचा डोंगर केला पार**

बस्तर लोकसभा मतदारसंघातील गुटूरास भागातील ग्रामस्थ ३ किमी चालत, टेकड्या पार करून मिरीवाडा येथे मतदानासाठी पोहोचले. मतदानाने गावात विकास होणार असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. गावापर्यंत पाणी आणि रस्त्याच्या सुविधा पोहोचतील. बिहारच्या नवादा येथे एकही मतदार बूथवर पोहोचला नाही.

**उर्वशी रौतेलाने उत्तराखंडमधील कोटद्वार येथे मतदान केले**

चित्रपट अभिनेत्री उर्वशी रौतेला हिने उत्तराखंडमधील कोटद्वार येथील बूथवर पोहोचून मतदान केले. येथे तिचे वडिलोपार्जित घर आहे. उर्वशीने सीतापूर येथील शासकीय प्राथमिक शाळेच्या बूथवर मतदान केले. मतदान करण्यासाठी ती मुंबईहून येथे आली होती.

**लंडनहून मतदानासाठी आली अनुपपूरची श्रद्धा**

शहडोल लोकसभा मतदारसंघातील अनुपपूर येथे राहणारी श्रद्धा बियाणी मतदान करण्यासाठी लंडनहून आली होती. श्रद्धाने प्रभाग क्रमांक १२ मध्ये मतदान केले. श्रद्धा लंडन विद्यापीठात आर्किटेक्चरचे शिक्षण घेत आहे. श्रद्धा म्हणाली की, परदेशात शिकणाऱ्या मुलांना तेथूनच मतदान करण्याची सुविधा मिळायला हवी.

## धनगर समाजाला आरक्षण देण्यास नकार

सुनावणी पार पडली.या सुनावणीवेळी मुंबई उच्च न्यायालयातील निकाल कायम ठेवत सर्वोच्च न्यायालयाने धनगर आरक्षणाची याचिका फेटाळून लावली आहे.धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गासोबत नोकरी आणि शिक्षणात आरक्षण द्या, अशी मागणी करत चार विविध याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. या याचिकांवर मुंबई हायकोर्टात फेब्रुवारी महिन्यात सुनावणी पार पडली होती. हायकोर्टाने राज्यातील एस. टी.आरक्षणापासून प्रवर्गातून आरक्षण देण्यास स्पष्ट नकार दर्शवला होता. तोच निकाल आता सुप्रीम कोर्टाने कायम ठेवताना संबंधित याचिका फेटाळली आहे.मुंबई उच्च न्यायालयात धनगर समाजाच्या आरक्षणाच्या मागणीला आव्हान देत सुहास नाईक यांनी याचिका दाखल केली होती. त्यावर निर्णय देत न्यायालयाने धनगर समाजाची याचिका फेटाळली होती. या निर्णयासंदर्भात समाजाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

## काँग्रेसचे काम म्हणजे बारशाला

भारत आणि विकसित महाराष्ट्राचे स्वप्न दूर नाही,असे मोदींनी म्हटले. मोदी जो गॅरंटी देतो, त्यासाठी दिवसरात्र खपायला मी तयार आहे. भाजपने आपल्या जाहीरनाम्यात म्हटले आहे की, पुढील ५ वर्षात ३ कोटी घरं बनवणार. नळाद्वारे प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचणार आहे. आपल्या कुटुंबातील वृद्ध, आई-वडिल यांच्यावरील उपचार खर्चासाठी ५ लाख रुपयांपर्यंतचा खर्च शासन करणार आहे. तसेच, ज्याप्रमाणे नळातून पाणी येते, तशाच रितीने पाईपमधून गॅस येणार आहे. देशातील प्रत्येक कोपऱ्यात वंदे भारतप्रमाणे रेल्वे धावतील. भारताने चंद्रयान पाहिले, आता गगनयानही पाहणार आहे, असे आश्वासन मोदींनी दिले.

**सर्वांना सोबत घेत मोदींचा प्रवास**

सर्व समाजाला सोबत घेऊन मोदींचा प्रवास सुरू आहे. त्यामुळे पुन्हा एकदा मोदींना पंतप्रधान करण्याचे काम करायचे आहे. त्यासाठी आता आपल्या सर्वांचं अबकी बार चारसो पारचा नारा हा सत्यात उतरावयाचा आहे. त्यासाठी रामदास तडस आणि नवनीत राणा यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करून आणायचे आहे. असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलताना केले.

## डीएसके कार्यालयावर ईडीची छापेमारी

(डीएसके) यांच्या जप्त केलेल्या मालमत्तेचा लिलाव करुन लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असे आदेश उच्च न्यायालयाने विशेष न्यायालयाला दिले आहेत. लिलावामधील योग्य मालमत्तेची यादी उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयाने तीन आठवड्यात तयार करावी, असेही उच्च न्यायालयाने सांगितले आहे.डीएसके यांच्या १९५ स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आल्या होत्या. या मालमत्तांचा लवकरात लवकर लिलाव करुन ३५ हजार गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळावे यासाठी याचिका दाखल करण्यात आली. जप्त केलेल्या १९५ स्थावर मालमत्तांचा लिलाव करण्यास परवानगी द्यावी, असा अर्ज मावळ-मुळशीचे उपविभागीय दंडाधिकारी सुरेंद्र नवले यांनी येथील विशेष न्यायालयात केला.

## छगन भुजबळांची अखेर माघार

उमेदवार आहेत, असेही मी अजित पवारांना सांगितल्याचे छगन भुजबळ म्हणाले. समीर भुजबळ यांचा पर्याय आपण अमित शाह यांच्यासमोर ठेवला होता. मात्र अमित शाह यांनी तुम्हीच (छगन भुजबळ) याठिकाणाहून लढावे, असा सल्ला दिल्याचा निरोप अजित पवारांनी मला दिला. तसेच याठिकाणी शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान खासदार असून हा मतदारसंघ त्यांच्या वाट्यातला आहे, अशीही आठवण छगन भुजबळ यांनी करून दिली. मात्र आम्ही शिवसेनेची समजूत घालू, असा शब्द अमित शाह यांनी आम्हाला दिला असल्याचे अजित पवार मला म्हणाले, असेही छगन भुजबळ यांनी सांगितले. छगन भुजबळ पुढे म्हणाले की, मला तर विश्वासच बसत नव्हता. म्हणून मी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन करून याबाबत विचारले. तर त्यांनीही अमित शाहांचा निरोप असून तुम्हाला निवडणूक लढवावी लागेल, असे सांगितले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनाही विचारले तर त्यांनीही हेच सांगितले.

## जाहीर निवेदन

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, **कै. दत्तात्रय पुरुषोत्तम गोऱ्हे** रा. रविकिरण अपार्टमेंट, ब्रह्मगिरी हौ.सोसायटी, जेलरोड, ना.रोड, ता.जि.नाशिक येथील रहिवासी असून **कै.दत्तात्रय पुरुषोत्तम गोऱ्हे** हे **दि. ३०/०८/२०१९** रोजी नाशिकरोड येथे मयत झाले आहेत. त्याचे पश्चात त्यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

| अ.नं. | वारसांची नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | श्री. संजय दत्तात्रय गोऱ्हे | ६१ | मुलगा |
| २ | श्री. प्रवीण दत्तात्रय गोऱ्हे | ५७ | मुलगा |
| ३ | राजश्री हेमंत पैठणे | ५५ | मुलगी |

हे वारस असून या व्यतिरिक्त इतर अन्य कोणीही वारस नाहीत. तरी, कुणास काही हरकत असल्यास त्यांनी **मा. तहसिलदार सो., नाशिक** यांचेकडे ७ दिवसांच्या आत लेखी खुलासा करावा. अन्यथा **मा. तहसीलदार सो., नाशिक** यांचेकडून वारसाला वारस प्रमानपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदर प्रमाणपत्र हे शासकीय कामासाठी देण्यात येणार आहे.

**तहसिलदार, नाशिक**

## जाहीर नोटीस

**तमाम जनतेस विशेषतः सौ. पुजा बाळू पवार, रा. द्वारा श्रीमती गंगुवाई शांताराम** धुळे, रा. बाजारपट्टी, दुर्गामाता मंदिर देवळा, ता.देवळा, जि.नासिक हिस सदरचे जाहीर फारकत नोटीसीने कळविण्यात येते की- तुझा व माझा विवाह सन २०१६ मध्ये सुमारे ९ वर्षापूर्वी मौजे देवळा, ता. देवळा, जि.नाशिक येथे जातीरिवाजानुसार व रुढीनुसार आदिवासी समाजाचे चालीरितीनुसार झालेला आहे. सदर लग्नसंबंधातून आपल्याला काहीएक अपत्य झालेले नाही. तु माझ्याकडे जायखेडा येथे नांदण्यास आली तथे माझे एकत्र कुटुंबात आई, भाऊ असे राहत होतो. तु सुरुवातीला ४-५ महिने व-यापैकी राहिली त्यानंतर मात्र तु कुरापत काढुन घरात सर्वांनी भांडणतंटा करत असे व वेगळे राहण्यावरुन भांडणतंटा करीत असे. त्यानंतर मी तुला बरेच समजाऊन सांगितले परंतु तु काहीएक न ऐकता देवळा येथे तुझ्या माहेरी राहण्याचा हट्ट करु लागली त्याबाबत मी समजून सांगितले परंतु तु ऐकले नाही म्हणून मी तुझे हट्टापायी देवळा येथे तुझ्या माहेरी राहण्यास आलो तेथे तू माझ्याबरोबर देवळा येथे नांदत असतांना माझ्या भावाचे मुलांचे जावळांचे कार्यक्रमासाठी तु न येता माझ्याशी भांडणतंटा केला व माझ्याबरोबर जायखेडा येथे कार्यक्रमास न येता माझ्याशी भांडणतंटा करुन मला देवळा येथून हाकलून लावले. तरी देखील मी जायखेडा येथील कार्यक्रम संपल्यानंतर मी देवळा येथे आलो असता तु व तुझ्या बहिण मेहुणे व तुमची आई यांनी माझेशी भांडणतंटा व माझ्याकडे फारकतीची मागणी करुन मला हाकलून दिले त्यानंतर मी तुला नांदविण्यासाठी बरेच प्रयत्न केलेत परंतु तु माझ्याकडे जायखेडा येथे नांदण्यास आली नाही व मला तुझे माहेरी देवळा येथे तुझ्याबरोबर संसार करण्यास राहु दिले नाही यावरुन तुला माझ्याबरोबर संसार करण्याची इच्छा नाही हे स्पष्ट होते आहे. तरी देखील तु माझ्याकडे नांद ण्यास यावे म्हणून मी तुला वकीलांमार्फत नांदण्यास येणेकामी **दिनांक १८/०३/२०२४** रोजी नोटीस पाठविली सदरची नोटीस तुम्ही स्विकारुनही नांदण्यास आली नाही व उलट माझ्याकडे फारकतीची मागणी करीत आहे. तरीही मी तुला नांदविण्याचे बरेच प्रयत्न केलेत परंतु तुम्ही कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना नांदण्यास येण्यास स्पष्टपणे नकार दिला यावरुन तुला माझ्याकडे संसार करावयाचा नाही असे स्पष्ट होते. सबब तुम्हांस सदरचे जाहीर फारकत नोटीसीने कळविण्यात येते की- सदरची जाहीर फारकत नोटीस प्रसिध्द झालेपासून ४ दिवसाचे आत तु माझ्याकडे नांदण्यास निघुन यावे. आपण असे वागण्यास कसूर केला तर हिच जातीरिवाजा रुढीनुसार जाहीर फारकत समजण्यात यावी व मग जो तो दुसरा घरोबा करण्यास मोकळा राहील. ज्याने त्याने मनाप्रमाणे दुसरा घरोबा करावा. कळावे, ही जाहीर फारकत नोटीस. सटाणा दिनांक-१९/०४/२०२४

**बाळू महेंद्र पवार, रा. जायखेडा, ता. बागलाण, जि.नासिक**

**नोटीस आमचेमार्फत प्रसिध्दीस रवाना**

**ॲड. श्री.शोनकुमार व्ही. देवरे**

**सटाणा कोर्ट (नाशिक)**

## जाहीर नोटीस

**बागलाण येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात**

क्र. अभिलेख/मृत्यू नोंद आदेश/एसआर/८४/२०२४

**श्री/श्रीमती. पंडीत मोतीराम खैरणार** रा. कोटबेल ता. बागलाण **अर्जदार**

**विरुध्द**

**ग्रामसेवक कोटबेल** ता. बागलाण जि. नाशिक **सामनेवाला**

अर्ज-जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूची नोंद होणेबाबत. याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूची नोंद होणे कामी, अर्जदार यांनी त्यांचे वडील **कै. मोतीराम केदा खैरणार** यांचा मृत्यू दाखला मिळणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार त्यांचे वडील **कै. मोतीराम केदा खैरणार** हे **दिनांक २३/०३/२००६** रोजी **मौजे कोटबेल** ता. बागलाण जि.नाशिक येथे मयत झालेले आहेत. ग्रामसेवक, कोटबेल ता. बागलाण जि.नाशिक यांचेकडेस अर्जदार यांनी त्यांचे वडील **कै. मोतीराम केदा खैरणार** यांच्या मृत्यूची नोंद झालेबाबत चौकशी/तपास केला असता सदर नोंद आढळून येत नाही असे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे अर्जदार यांनी सामनेवाले विरुध्द प्रस्तुतचा अर्ज तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, बागलाण यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. त्याअर्थी याव्दारे फर्मविण्यात येते की, सदर किरकोळ फौजदारी अर्जाविरुद्ध कोणाचीही काही हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून **तीस** दिवसांच्या आत किंवा **दिनांक २२/०५/२०२४** रोजी सकाळी ११.०० वाजेपावेतो मे. तहसिलदार बागलाण, ता. बागलाण, जि. नाशिक येथे स्वतः अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत आपली हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची काहीएक हरकत नाही असे समजुन उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी घेऊन मृत्युची नोंद घेणे बाबतचा आदेश पारीत करण्यात येईल.

आज **दिनांक १६/०४/२०२४** रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

(शिक्का)

**तहसिलदार**

**तथा कार्यकारी दंडाधिकारी बागलाण**

## जाहीर नोटीस

उपरोक्त जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, **श्री. खंडू शिवराम आंधळे** यांचा **दिनांक ०४/०६/१९७१** रोजी **पाचोरे बु.** ता. निफाड येथे जन्म झाला आहे. जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय पाचोरे बु. ता. निफाड येथे ग्रामपंचायम रेकॉर्डला झालेली नाही. ग्रामसेवक पाचोरे बु. यांनी **दिनांक ०४/०३/२०२४** रोजी तसा दाखला दिला आहे.

याबाबत कोणाचे कामी म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर ३० दिवसांचे आत अगर **दिनांक २२/०४/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता** तहसिल कार्यालय निफाड येथे सुनावणी अयोजित केली आहे. सदर अर्जाबाबत कोणाची हरकत असल्यास इकडेस तक्रार/हरकत दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचे हरकत/तक्रार प्राप्त न झाल्यास प्रकरणात उपलब्ध कागदपत्राचे अनुषंगाने निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**

**(विशाल नाईकवाडे)**

**तहसिलदार, निफाड**

## जाहीर निवेदन

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, **श्री. सुधाकर रामभाऊ इंगळे**, रा. हिरावाडी पंचवटी, लक्ष्मीकृपा रो हाऊस नं १/२, सरस्वतीनगर, नाशिक महाराष्ट्र ४२२००३ येथील रहिवाशी असून **श्री. सुधाकर रामभाऊ इंगळे** हे दि. ०२/०८/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्याचे पश्चात त्यांना खालीलप्रमाणे कायदेशीर वारस आहेत.

| अ.नं. | वारसांची नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | सुनंदा सुधाकर इंगळे | ६४ | पत्नी |
| २ | पंकज सुधार इंगळे | ४४ | मुलगा |
| ३ | सुजीत सुधाकर इंगळे | ४३ | मुलगा |
| ४ | मनोज सुधाकर इंगळे | ४१ | मुलगा |

हे कायदेशीर वारस असून या व्यतिरिक्त इतर अन्य कोणीही वारस नाहीत. तरी, कुणास काही हरकत असल्यास त्यांनी **मा. तहसिलदार सो., नाशिक** यांचेकडे ७ दिवसांच्या आत लेखी खुलासा करावा. अन्यथा **मा. तहसीलदार सो., नाशिक** यांचेकडून वारसाला वारस प्रमानपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदर प्रमाणपत्र हे शासकीय कामासाठी देण्यात येणार आहे.

**तहसिलदार, नाशिक**

## जाहीर नोटीस

उपरोक्त जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, **श्रीमती अरुणा मोतीराम नागरे** यांचा **दिनांक ०२/०७/१९८१** रोजी **पाचोरे बु.** ता. निफाड येथे जन्म झाला आहे. जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय पाचोरे बु. ता. निफाड येथे ग्रामपंचायम रेकॉर्डला झालेली नाही. ग्रामसेवक पाचोरे बु. यांनी **दिनांक ०४/०३/२०२४** रोजी तसा दाखला दिला आहे.

याबाबत कोणाचे कामी म्हणणे/हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर ३० दिवसांचे आत अगर **दिनांक २२/०४/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता** तहसिल कार्यालय निफाड येथे सुनावणी अयोजित केली आहे. सदर अर्जाबाबत कोणाची हरकत असल्यास इकडेस तक्रार/हरकत दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचे हरकत/तक्रार प्राप्त न झाल्यास प्रकरणात उपलब्ध कागदपत्राचे अनुषंगाने निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**

**(विशाल नाईकवाडे)**

**तहसिलदार, निफाड**

**श्रीमान सुगनमलजी सुराणा व्यापारी सहकारी पतसंस्था मर्यादित, देवळा**

धनसुगंध, सटाणा रोड, ता. देवळा जि.नाशिक फोन नं. (०२५९२)२२८२६३

## कर्जाकरिता गहाण घेणेच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस या गहान घेणेचे मिळकतीचे संबंधाने कळविण्यात येते की,

**१) मौजे रामेश्वर**, ता.देवळा जि.नाशिक येथील गट नं. २०२ क्षेत्र ० हे २३ आर आकार ०.३५ रु. यांसी चर्तुः सिमाः पूर्वेस-गट नं. २०३ व २००, पश्चिमेस- गट नं. २०४, २०५ व २०७, दक्षिणेस-गट नं.२०७ व २०१, उत्तरेस-गट नं. २०३.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही **श्री. चंद्रकांत मोतीलाल पगार**, रा. रामेश्वर ता. देवळा जि.नाशिक यांचे मालकी व कब्जे वहिवाटीतील अशी मिळकत आहे.

२) कर्जदाराचे नांव ; श्री. चंद्रकांत मोतीलाल पगार रा. रामेश्वर ता. देवळा जि.नाशिक

३) सहकर्जदाराचे नांव : श्री. देविदास चंद्रकांत पगार

४) नोटीसीचा उद्देश : टायटल व्हेरिफिकेशन

५) वरील कर्जदार यांनी श्रीमान सुगनमलजी सुराणा व्यापारी सहकारी पतसंस्था मर्या., देवळा मुख्य शाखा- देवळा यांचेकडून वर नमुद केलेली कर्जदार यांनी कलम १ मधील मिळकत गहाण/तारण देवून कर्जाची मागणी केली आहे.

६) वर कलम १ मध्ये वर्णन केलेली कर्जदार यांची मिळकत पुर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे असे सांगून कर्ज मागणी केलेली आहे. वरील मिळकतींवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्कम, अधिकारी साठेखत, करारनामा, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, वारसहक्क, मनाई हुकूम, कोर्ट जप्ती वगैरे स्वरूपाचा काही हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **सात (०७)** दिवसांच्या आत आमच्या खालील पत्यावर व संस्थेच्या कार्यालयात संबंधित कागदपत्रे व साक्षी पुराव्यानिशी समक्ष येवून लेखी हरकत नोंदवावी.

मुदतीनंतर व परस्पर वर्तमानपत्रात हरकत प्रसिद्ध केल्यास ती विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून गहाण / तारण घेतली जाईल व कर्जदाराचे मागणीनुसार कर्ज वितरण केले जाईल. त्यानंतर कोणाचेही काही ऐकुण घेतले जाणार नाही. करिता जाहिर नोटीस असे.

**स्थळ : सटाणा, दिनांक : १९/०४/२०२४** **श्री. महेश दिनकर जोशी, व्यवस्थापक**

**आमचे मार्फत प्रसिद्ध**

**ॲड. के. पी. भदाणे**

**दिवाणी न्यायालयासमोर, सटाणा ता. बागलाण जि. नाशिक**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**नोटीस देणार-संतोष विश्राम धाकराव, रा.मु.पो.ता. दिंडोरी जि.नाशिक**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी नगर पंचायत दिंडोरी हद्दीतील सिटी **सर्व्हे नं. ११५५, यांसी क्षेत्र १०४.०० चौ.मी.** त्याचा नगरपंचायत **अ.नं. २७७२, मिळकत नं. २७४४, मधील २१ बाय ३१** या मापावर विटा, सिमेंट मध्ये बांधकाम असलेले व छप्पर सिमेंट पत्रा असलेली घर मिळकत, या नोटीसीचा विषय आहे.

**संतोष विश्राम धाकराव** यांनी प्रस्तुत मिळकत ही **विश्राम शंकर धाकराव** यांचेकडून बक्षिसपत्र **दस्त क्र.५०१४/२०२२** अन्वये घेतलेली असून, त्यानुसार त्यांना मालकी हक्क हितसंबंध प्राप्त झालेले आहेत. **संतोष विश्राम धाकराव** यांनी उपरोक्त मिळकती त्यांचे नावाची मालकी हक्कास सदरील नोंद होणेकामी बक्षिसपत्र **दस्त क्र.५०१४/२०२२** चा दस्त नगरपंचायत दिंडोरी यांचेकडे सादर केलेला असून, सदर मिळकतीस संतोष विश्राम धाकराव यांचे नांव दाखल होणेकामी कोणाची काहीएक हरकत अगर तक्रार असल्यास, त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ (सात)** दिवसांचे आत आमचे नमुद पत्त्यावर आवश्यक त्या कागदपत्रानिशी हरकत नोंदवावी. येणेप्रमाणे मुदतीत कोणाचीही कोणतेही प्रकारे हरकत अगर तक्रार प्राप्त न झाल्यास, **संतोष विश्राम धाकराव** यांचे नांव बक्षीसपत्र दस्त **क्र.५०१४/२०२२** अन्वये वर नमूद मिळकतीचे वर्णनात उल्लेख केलेल्या मिळकतीचे रेकॉर्ड ऑफ राईट्स सदरी नगरपंचायत दिंडोरी यांचे दप्तरी घेणेसंबंधीची पुढील कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. कळावे, ही जाहीर नोटीस.

**दिंडोरी : तारीखः १९/०४/२०२४.**

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**ॲड. श्रीराम गिरीषराव सुर्वे**

**ॲडव्होकेट, दिंडोरी न्यायालय दिंडोरी,**

**ता. दिंडोरी जि.नाशिक. मो.नं. ९६५७९६५००४**



# गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

गरजू महिला/जोडपे घर कामासाठी हवे आहे. २ जणांच्या फॅमिलीच्या सर्व कामासाठी. स्वयंपाक व घर स्वच्छता यायला हवी. राहण्यासाठी घराबाहेर स्वतंत्र रूम आहे. लोकेशन- गंगापूर रोड. **संपर्कः क्षीरसागर- ९८५००५५७७५**

---

नाशिकरोड परिसरात इ.९ वी व १० वी सेमी इंग्रजीसाठी गणित, इंग्रजी व विज्ञान विषयाचे घरगुती पार्टटाईम शिक्षक पाहिजेत. संपर्क मो.९९६०३५०००५

---

होलसेल मेडिकल एजन्सीसाठी किमान १० वी पास मुली पाहिजेत. वयोमर्यादा १८ ते ३५ भेटा. महादेव एजन्सीज, गोळे कॉम्प्लेक्स, गोळे कॉलनी, नाशिक.

---

नाशिक शहराजवळ असलेल्या फार्म हाऊसवर बंगला साफसफाई व स्वयंपाकासाठी विवाहित निर्व्यसनी जोडपे पाहिजे. राहण्याची सोय. **संपर्क- सकाळी १० ते ५. मो.नं.९०४९०-३४९९९**

### विकणे आहे

इच्छामणी नगर, जेलरोड येथील चार मजली इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील २ बीएचके फ्लॅट त्वरित विकणे आहे, २४ तास पाणी, लिफ्ट, पार्किंग सुविधेसह. **संपर्क -९७७३४५६०१४, ७२०८२०३०९०**

### विकत देणे/घेणे

शेतजमीन चार एकर वर्ग -१ ची नाशिक जिल्ह्यात विकत हवी आहे. पाणी, डांबरी रोड, वीज आवश्यक, अपेक्षा १८ लाख एकरी. जागा मालक संपर्क करा- **मो.नं. ७७४५०२०६६९**

### विकत देणे/घेणे

हफ्त्यावर नाशिक महानगरपालिके लागून ५.७५ हजारात टायटल क्लिअर प्लॉट घ्या... तेही ९,१२ आणि १५ मी. रोडला आपला प्लॉट चॉईस करण्यासाठी आताच कॉल करा. **संपर्क-९५६१३८२७७७**

### पाहिजेत

डॉ.आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह व शिक्षण मंडळ येवला संचलित. डॉ.आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह, येवला स्वयंपाकी पदासाठी संपर्क साधा: **मो.९०९६१८९३०९ अधिक्षक**

### नावात बदल

माझे जुने नाव मुसर्रतबानो इम्रान खान पठाण असे होते आता माझे नवीन नाव **मुसर्रतबानो रऊफ पठाण** असे झाले आहे.**आधार क्रमांक ४२७१ ७९५१ ७०१६ नुसार**

### ज्योतिष

गायत्री ज्योतिष- जन्म कुंडली, कुंडली मिलान, कुंडलीवरून भविष्य कथन, खासगी त्रासावर उपाय. **संपर्क-** ज्योतिषाचार्य, कमलेश शास्त्री, इंद्रकुंड, नाशिक. ९१५६१७८९६९

### पाहिजेत

कारसाठी अनुभवी, निर्व्यसनी - नासिकरोड रहिवासी ड्रायव्हर पाहिजे. **अर्जासह भेटा-** कागज पॅकेजिंग प्रा. लि. ३ रा मजला, स्टार झोन मॉल, पासपोर्ट ऑफिसच्यावर, नासिकरोड.

### कर्जविषयक

होम लोन-कॅश सॅलरी असेल, आई.टी.रिटर्न नसेल, कुठलीही अडचण असेल तरीही सिडको, म्हाडा, नाशिकमधील कुठलेही घर घेण्यासाठी, घेतलेल्या घरावर शासकीय/प्रायव्हेट बँकेचे होम लोन करून मिळेल.

**संपर्क- ७०५८६५१९३९, ७२४९२७५९४४, ७०२८८४१९३९, ८४८२९५०७०८**

पत्ता-होम लोन एक्सपर्ट- देविका कन्सल्टन्सी, पवननगर, सिडको, नाशिक.

### नशा मुक्ती

नको कॅन्सरला आमंत्रण देऊ... दारु...अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी. **डॉ.पालवे-** (9552619752) व्यसन+ टेन्शन + भिती + चिंता+ नैराश्य + हस्तकंप+ निद्रानाश... **(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर डॉ.पालवे-नशामुक्ती...)**

## महत्त्वाचे

### काडीपेटी न दिल्याने तरुणावर गोळीबार

**पुणे :** शहरात गोळीबारांचे सत्र कायम आहे. नऱ्हे भागातील भूमकर चौकात मध्यरात्री एका तरुणावर पिस्तुलातून गोळीबार करण्यात आल्याची घटना घडली. पुण्यात दोन दिवसांत गोळीबाराच्या तीन घटना घडल्या आहेत. एका बांधकाम व्यवसायिकावर दुचाकीवरून आलेल्या दोघांनी जंगली महाराज रस्त्यावर पिस्तूल रोखून गोळीबाराचा प्रयत्न केल्याची घटना मंगळवारी घडली होती. त्यानंतर हडपसरमधील शेवाळवाडी परिसरात बुधवारी व्यवसायिक स्पर्धेतून एका निवृत्त लष्करी जवानाने एकावर पिस्तुलातून गोळ्या झाडल्या.सिंहगड पोलीस ठाण्याच्या हद्दीत भूमकर चौक परिसरात गुरुवारी पहाटे अडीच वाजताच्या सुमारास एका तरुणावर गोळ्या झाडण्यात आल्या. गणेश गायकवड (रा. वारजे) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. काडीपेटी मागितल्याच्या कारणातून गोळीबार झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. मुंबईत अभिनेता सलमान खानच्या घराजवळ झालेल्या गोळीबाराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी शहरातील गुन्हेगारांची झाडाझडती घेतली होती. त्यानंतर शहरात गोळीबाराच्या तीन घटना घडल्याने खळबळ उडाली आहे.

### बांधकाम पर्यवेक्षकाचा चाकूने भोसकून खून; इमारतीवरून फेकून दिले

**पुणे :** कोंढवा भागात एका बांधकाम पर्यवेक्षकाचा चाकूने भोसकून खून करण्यात आल्याची घटना घडली. बांधकाम पर्यवेक्षकाला इमारतीवरून फेकून देण्यात आले. याप्रकरणी रात्री उशिरा कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पंकज कुमारमोती कश्यप (वय ३५, रा. कृष्णानगर, महंमदवाडी, हडपसर) असे खून झालेल्या पर्यवेक्षकाचे नाव आहे. कोंढवा भागातील स्टर्लिंग सोसायटीच्या फेज सहा परिसरात एकजण मृतावस्थेत पडल्याची माहिती एका नागरिकाने पोलीस नियंत्रण कक्षाला दिली. या घटनेची माहिती मिळताच कोंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. पोलिसांनी ओळख पटविली. तेव्हा पंकज बांधकाम पर्यवेक्षक असल्याचे समजले. त्याच्यावर चाकूने वार करण्यात आल्याचे उघडकीस आले. पंकज याच्या खुनामागचे कारण समजू शकले नाही. पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

### शिवसेने(उबाठा)चे संजय देशमुखांवर खोटी माहिती दिल्याचा आरोप

**यवतमाळ :** वाशिम लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी शिवसेना उबाठाचे उमेदवार संजय देशमुख यांनी उमेदवारी दाखल करताना निवडणूक आयोगास शपथपत्रात खोटी माहिती सादर केली, असा आरोप येथील राजेश विजय भगत यांनी यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला. संजय देशमुख यांची उमेदवारी रद्द करावी, अशी मागणी करणारी निवडणूक रिट याचिका (क्र.डब्युरपीएसटी/८०२९/२०२४) मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल केल्याचे भगत यांनी यावेळी सांगितले. उमेदवार संजय उत्तमराव देशमुख यांनी निवडणूक आयोगास खोटे शपथपत्र सादर करून त्यात त्यांच्यावर पुसद अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक दिग्रस शाखेचे कर्ज आहे. या कर्जाचा बोजा सातबारावर नोंद असताना त्यांनी उमेदवारी दाखल करताना शपथपत्रात तो नमूद केला नाही, असा आरोप भगत यांनी केला.

### चोरीचे मोबाइल विकणाऱ्याला अटक

**मुंबई:** रेल्वे प्रवासादरम्यान प्रवाशांचे मोबाइल चोरून त्यांची विक्री करणाऱ्या एका सराईत आरोपीला कुर्ला लोहमार्ग पोलिसांनी अटक केली. या आरोपीच्या ताब्यातून पोलिसांनी काही मोबाइल हस्तगत केले असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. कुर्ला कसाईवाडा परिसरात एक इसम चोरलेले काही मोबाइल विकण्यासाठी येणार असल्याची माहिती कुर्ला लोहमार्ग पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी या परिसरात बुधवारी सायंकाळी सापळा रचला. आरोपी घटनास्थळी येताच पोलिसांनी त्याला झडप घालून ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याला कुर्ला लोहमार्ग पोलीस ठाण्यात आणून झडती घेतली असता, त्याच्याजवळ काही मोबाइल सापडले. गर्दीच्या वेळी हा आरोपी रेल्वे प्रवाशांचे मोबाइल चोरत होता. त्यानंतर ते मोबाइल तो एका व्यक्तीला विकत होता. या आरोपीविरोधात विविध लोहमार्ग पोलीस ठाण्यात चोरीचे अनेक गुन्हे दाखल असून यामध्ये आणखी काही आरोपींचा समावेश असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### मुलाकडून वडिलांचा निर्घृण खून

**छत्रपती संभाजीनगर :** अभियंता असलेल्या मुलाकडून वडिलांचा गळा दाबून व स्क्रू ड्रायव्हर भोसकून खून करून आईचाही गळा दाबण्याचा प्रयत्न केल्याची घटना मंगळवारी सकाळी सातारा परिसरातील दीपनगरमधील एका स्कूलजवळच्या घरात घडली. विशेष म्हणजे खून करणारा रोहित श्रीकृष्ण पाटील (वय ३०) याने चोरट्यांच्या हल्ल्यात वडिलांचा मृत्यू झाला असून आपल्याही मारण्याचा डाव होता, असा बनाव रचला होता. मात्र पोलिसांना संशय आल्याने त्याला विश्वासात घेऊन विचारले असता रोहितने खुनाची कबुली दिल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप गुरमे यांनी दिली. श्रीकृष्ण वामनराव पाटील (वय ६२, रा. डिलक्स पार्क) असे मृताचे नाव आहे. रोहित लोकांकडून पैसे घेऊन शेअर मार्केटमध्ये गुंतवायचा आणि आलेला नफा टक्केवारीत घ्यायचा. मात्र शेअर मार्केटमधील चढ-उतारामुळे तो ३० लाख रुपये हरला. लोकांनी त्याच्याकडे पैशांचा तगादा लावला होता. त्यासाठी तोही वडिलांना पैसे मागत होता, अशी माहिती त्यानेच पोलिसांना दिली.

### शिवसागर जलाशयात बोट बुडाली

**सातारा:** कोयना धरण शिवसागर जलाशयामध्ये स्पीड बोट बुडाल्याची घटना घडली. शिवसागर जलाशयात वादळी वाऱ्यामुळे स्पीड बोट बुडाली. या बोटीतून ३ जण प्रवास करत होते. यामधील एक जण जलाशयामध्ये बुडाला. तर दोघे जण पोहत जलाशयाबाहेर आले. एकाचा शोध सुरू आहे. जावळी गावच्या स्मशानभूमी समोरील जलाशयाच्या पात्रामध्ये ही घटना घडली.मिळालेल्या माहितीनुसार, कोयना धरण शिवसागर जलाशयाच्या नदीपात्रात स्पीड बोट बुडाली. जोरदार वादळी वाऱ्यामुळे ही घटना घडली. तापोळाकडून बामणोलीच्या दिशेने ही स्पीड बोट चालली होती. ही स्पीड बोट तेटली गावानजीकच्या स्मशानभूमी समोरील नदीपात्रात आली त्यावेळी जोरात वादळ सुरू झाले. या वादळामुळे स्पीड बोट पलटी होऊन जलाशयात बुडाली. स्पीड बोटवर ३ जण असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. तिघांपैकी दोघे जण पोहत जलाशयाबाहेर आले. पण एक जण बोटीसोबत बुडाला. या व्यक्तीचा शोध घेण्याचा काम युद्धपातळीवर सुरू आहे. ही स्पीड बोट पुलांचा सर्वे करणाऱ्यांची असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. स्पीड बोटवरून जात असताना ही घटना घडली. सध्या पुलांच्या कामावरील कर्मचाऱ्यांकडून शोध मोहीम सुरू करण्यात आली आहे.

### पोलिसांच्या सतर्कतेमुळे गॅसगळती टळली

**लोणीकंद -** केसनंद रोडवरील बाबा पेट्रोल पंपावर ट्रक आणि गॅस टँकरची धडक झाली. या अपघातात टँकरमधील गॅस गळती सुरू झाली होती. लोणीकंद पोलीसांनी व वाहतूक पोलीस यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन खबरदारीसाठी रस्ता बंद केला. गॅस कंपनीच्या अधिकाऱ्यांना पाचारण करून गॅस गळती बंद केली, त्यामुळे मोठा अनर्थ टळला. ही घटना सकाळी आठ वाजता घडली होती. जवळपास तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर गळती थांबवण्यात यश आलं आहे. लोणीकंदचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास करे यांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणीकंद - केसनंद रोडवरील बाबा पेट्रोल पंपावर ट्रक आणि गॅस टँकरची धडक झाली. या धडकेने गॅस टँकरमधील गॅसची गळती सुरू झाली. पोलीसांना कळताच त्यांनी तात्काळ दोन्ही कडील रस्ता बंद करून आजूबाजूच्या गावातील लोकांना अलर्ट केलं. गॅस ज्वलनशील असल्याने दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. तात्काळ गॅस कंपनीच्या अधिकाऱ्यांनाही बोलविण्यात आलं. त्यांनीही घटनास्थळी धाव घेत उपाययोजना करून गळती थांबविली व तेथून टँकर हलविला. सुमारे तीन तास ही सर्व घटना सुरू होती. साडे अकरानंतर सर्व सुरळीत झाले.

# शहापुरात महायुतीची वज्रमूठ, एकदिलाने कार्य करण्याचा निर्धार

**शहापूर : प्रतिनिधी**

भिवंडी लोकसभा मतदारसंघातील शहापूर तालुक्यात महायुतीची वज्रमूठ झाली असून, निवडणुकीच्या प्रचारात एकदिलाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री व महायुतीचे उमेदवार कपिल पाटील व शिवसेनेचे उपनेते प्रकाश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी सायंकाळी झालेल्या मेळाव्यात शहापूर विधानसभा मतदारसंघातून एक लाख मतांचे ध्येय ठरविण्यात आले. या मेळाव्यानंतर महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे.




भिवंडी लोकसभा मतदारसंघातील शहापूर तालुक्यातील महायुतीच्या कार्यकर्त्यांचा भव्य मेळावा शहापूर शहरात उत्साहात पार पडला. या मेळाव्याला मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. महायुतीचे उमेदवार कपिल पाटील, शिवसेनेचे उपनेते प्रकाश पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार दौलत दरोडा, भाजपाचे ज्येष्ठ नेते व भिवंडी लोकसभा प्रभारी जगन्नाथ पाटील, कुणबी सेनेचे प्रमुख विश्वनाथ पाटील, शिवसेनेचे ग्रामीण जिल्हाप्रमुख मारुती धिर्डे, किसन भांडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस किसन तारमळे, कल्पना तारमाळे, संजय पाटील, भाजपाचे जिल्हाध्यक्ष मधुकर मोहपे, रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय गायकवाड, प्रदेश उपाध्यक्ष विनोद थोरात, तालुकाध्यक्ष जयवंत थोरात, मनसेचे जिल्हा अध्यक्ष शैलेंद्र बिडवी, भाजपाचे शहापूर विधानसभा निवडणूक प्रमुख अशोक इरनक, तालुकाप्रमुख भास्कर जाधव, जिल्हा सरचिटणीस सुभाष हरड, महिला मोर्चा प्रमुख शीतल तोंडलीकर, प्रकाश वेखंडे, राजेश तिवरे, नंदकुमार मोगरे आदी उपस्थित होते.

खासदारकीच्या पहिल्याच टर्ममध्ये अनेक वर्षांपासून रखडलेला वासिंद रेल्वे मार्गावरील उड्डाणपूल व बदलापूर होम प्लॅटफॉर्मचे काम पूर्ण झाले. तर आसनगाव येथे होम प्लॅटफॉर्मचे काम सुरू आहे. भिवंडी मतदारसंघात अनेक कामे सुरू असून, कामांबाबत प्रश्न विचारणाऱ्या विरोधकांना कार्यकर्त्यांनी उत्तरे द्यावीत, असे आवाहन कपिल पाटील यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी प्रत्येक शिवसैनिकाने झटावे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शहापूर तालुक्यासह मतदारसंघातील प्रत्येक शिवसैनिक कार्य करेल, असे आवाहन शिवसेनेचे उपनेते प्रकाश पाटील यांनी केले.

**ई-लिलाव सूचना**

इच्छुक खरेदीदारांकडून ई-लिलावाचे अर्ज मागविण्यात येत आहे. ''जे आहे, जेथे आहे'' या तत्त्वावर तसेच **प्रतिकिलो प्रमाणे** अपघातामुळे खराब झालेले व त्यातून उरलेले **''अपघातात नुकसानग्रस्त कच्चा माल (LLDPE पावडर)'' मे.अ‍ॅस्ट्रल लि.यांच्या मालकीची. तपासणीसाठी उपलब्ध अ‍ॅस्ट्रल लि. गट क्रमांक १२७/१२८ औरंगाबाद वीज निर्मिती केंद्र क्र.३ च्या मागे, पांगरा गाव, मु.पो. चितेगाव, ता. पैठण, जि.औरंगाबाद.**

तपासणी व बयाणा रक्कम भरण्याची अंतिम मुदत- २४/०४/२०२४, ई-लिलाव दिनांक- २६/०४/२०२४ रोजी, ई - लिलाव अर्जासाठी

**संपर्क- श्री. हरप्रित सिंग, मो.+९१-८१७८६२४९९४**

Bid2win Private Limited
(लिलाव करणार)
अधिक तपशिलासाठी : www.bid2win.in

### विदर्भात उष्णतेची लाट

**पुणे :** आद्रतायुक्त उष्ण वाऱ्यामुळे विदर्भ पुन्हा तापला आहे. यंदाच्या उन्हाळ्यातील आजवरच्या सर्वोच्च तापमानाची नोंद शुक्रवारी अकोल्यात झाली. अकोल्याचे कमाल तापमान ४४ अंश सेल्सिअवर गेले होते. गुरुवारच्या तुलनेत शुक्रवारी विदर्भात सरासरी दोन, तर राज्याच्या अन्य भागांत सरासरी १.५ अंशांनी तापमान वाढले आहे.

## काँग्रेस नगरसेवकाच्या मुलीची भोसकून हत्या

**बेळगाव:**

कर्नाटकमध्ये धक्कादायक घटना समोर आली आहे. हुबळी-धारवाड नगरपालिकेतील काँग्रेस नगरसेवकाच्या २१ वर्षीय मुलीची तिच्यात वर्गातील मुलानं चाकूने भोसकून निर्घृण हत्या केली. ती शिकत असलेल्या कॉलेजच्या परिसरातच गुरूवारी ही थरकाप उडवणारी घटना घडली.



नेहा हिरेमठ असे हत्या झालेल्या २१ वर्षीय तरुणीचे नाव आहे. हुबळी-धारवाड पालिकेचे नगरसेवक निरंजन हिरेमठ यांची ती मुलगी होती, अशी माहिती पोलिसांनी दिली. तर फय्याज असं आरोपी तरूणाचं नाव आहे. बेळगाव जिल्ह्यातील सवदत्ती येथे तो राहतो. कॉलेजच्या परिसरात त्यानं नेहावर चाकूने वार केले. ही घटना तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली. तिच्यावर क्रूरपणे वार केल्यानंतर आरोपी तेथून पसार झाला. फय्याजच्या कृत्यामागील नेमकं कारण अद्याप कळू शकलेलं नाही, असंही पोलिसांकडून सांगण्यात आलं.

केएलई टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीत एमसीएच्या पहिल्या वर्गात नेहा शिकत होती. याच कॉलेजच्या परिसरात तिची हत्या करण्यात आली. तिचा मृतदेह केम्पेगौडा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स हॉस्पिटलमध्ये नेण्यात आला. या घटनेप्रकरणी गुन्हा नोंदवला असून, तपास सुरू केला आहे, असी माहिती पोलीस अधिकाऱ्यानं दिली.

पोलिसांच्या माहितीनुसार, नेहाचा मारेकरी फय्याज हा एका सरकारी शाळेतील शिक्षकाचा मुलगा आहे. सहा महिन्यांपूर्वी परीक्षेत नापास झाला म्हणून त्यानं कॉलेजला जाणं बंद केलं होतं. तो गुरुवारी कॉलेजला गेला होता. त्याच्याकडे चाकू होता. त्याच चाकूने त्याने नेहावर क्रूरपणे वार केले. घटनेनंतर काही स्थानिकांच्या मदतीने त्याला पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. सध्या तो पोलीस कोठडीत आहे.

## सीमेन्स वर्कर्स युनियनचा हीरक महोत्सव साजरा

**मुंबई :**

सीमेन्स वर्कर्स युनियनच्या हीरक महोत्सवाच्या निमित्ताने सर्वांना निष्ठेने, विश्वासाने आणि प्रगतीकडे वाटचालीच्या शुभेच्छा देऊन कामगार संघटनेत नव्या संकल्पना घेऊनच सातत्याने पुढे जाण्याचा ध्यास घेत आपण प्रगती करून दाखवली आहे. आणि त्यामुळेच साठ वर्षांनंतर देखील आपली संघटना तरुण आहे असे प्रतिपादन युनियनचे सचिव गिरीश आष्टेकर यांनी केले.

मुलुंड मुंबई येथील कालिदास कला मंदिरात सीमेन्स वर्कर्स युनियनच्या हीरक महोत्सव कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सीमेन्स कंपनीचे सीईओ सुनील माथूर,एच.आर.हेड, शिल्पा काबरा माहेश्वरी, एन.टी.यू. आयचे जनरल सेक्रेटरी गौतम मोदी, युनियनचेअध्यक्ष महेश सावंत-पटेलआदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी आष्टेकर यांनी युनियनचा ६० वर्षाचा आढावा सादर करतांना म्हणाले की,भविष्यात वेतन करार होतीलच पण आता पुढे जात असताना इंडस्ट्री ४.० आणि डिजिटलायझेशन,मर्जर-डिमर्जरअशीअनेकआव्हाने आहेत. सर्वांच्या सहकार्याने, विश्वासाने



आणि व्यवस्थापनाच्या सहकार्याने यावरआपण मातकरु शकतो असा विश्वास व्यक्त केला. त्या माध्यमातूनच आपली प्रगती देखील साधत तुमच्या सर्वांच्या साथीने आपण आता ७५ व्या वर्षाकडे वाटचाल करणार आहोत असे सागितले. या प्रसंगी कंपनीचे सीईओ माथुर यांनीसीमेन्स कंपनीचा ग्राहकसर्वप्रथम असून आपल्या क्षेत्रातील जागतिक पातळीवर वाढणारी स्पर्धा त्यासाठी असलेली तयारी आणि आपल्या सर्वांचे सामर्थ्य या त्रीसूत्रीवर काम केले तरच सीमेन्स जगभरातील कंपन्यांपेक्षा दोन पावलं पुढे राहील.

कंपनीच्या १६० वर्षांच्या कालावधीत पिढ्यानपिढ्या हा वारसा सुरूआहे.ग्राहक आणि भविष्यातील स्पर्धेवर लक्ष ठेवले आणि सर्वांना सोबत घेतले तर कुणीही आपल्या प्रगतीला रोखू शकत नाही. इलेक्ट्रिकल आणिऑटोमेशन उत्पादन करणारीआपली एकमेव कंपनी आहे.त्या मुळेच जगातल्या सर्वोत्तम दहा डिजिटलाईज्ड कंपन्या मध्ये आपला समावेश होतो. हे टिकवण्यासाठीआपली विचार प्रणाली मात्र बदलावी लागेल.भारत व जगाच्या प्रगतीचा वेग बघता आपल्याला सर्वांच्या पुढे राहणे गरजेचेआहे.त्यात उशीर करून चालणार नाही. पंधरा ते वीस वर्षानंतर भारतीयअर्थव्यवस्था अर्थ समजून घेत व्यक्तीश: स्वत:साठी आणि नंतर कंपनीसाठीआपण काय फायदा करू शकतो याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे.भविष्यात प्रगती करायची असेल तर सातत्याने या ज्ञानात भर टाकली पाहिजे.उत्पादनाची गुणवत्ता किंमत आणि विश्वासार्हता जेथे असेल तेथे ग्राहक जातो हे समजून घेतले पाहिजे.विश्वभरातील कंपनी भारतात येऊ इच्छितात.त्यांच्या स्पर्धे ला तोंड द्यायचे आहे म्हणूनच ज्ञान वाढवणे गरजेचे आहे. नवे तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे.स्पर्धेसंबंधित प्रगती करायची असेल तर हे करावे लागेल आणि एकत्रितपणे हे आपण करू शकतो हे सर्वांना माहीत आहे. त्याच दिशेने सीमेन्स व्यवस्थापन व कामगार संघटना जात आहेतअसे मत या वेळी त्यांनी व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते युनियनच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. दरम्यान कळवा,नाशिक, गोवा. औरंगाबाद येथे हीरक महोत्सव निमित्ताने झालेल्या विविध स्पधेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरव करून समानचिन्ह प्रदान करण्यात आले.तसेच सातत्याने मॅरेथॉनधावणारे म्हणून नाशिक यूनियनचे विभाग सचिव अशोक घुगे, उपाध्यक्ष मनोज बोडके, याना व महाराष्ट्रात गिर्यारोहक रेसक्यू टिमचे कार्य करणारे नाशिक युनिट चे दयानंद कोळी याच्या कार्याची विशेष दखल घेऊन माथूर यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले.

## भाषण सुरू असतानाच शरद पवारांच्या दिशेने फेकली वस्तू

**बारामती :**

लोकसभा मतदारसंघातून शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचाराचा नारळ शरद पवार यांच्या हस्ते फोडण्यात आला. मात्र, शरद पवार यांचे भाषण सुरू असतानाच या सभेतून एक वस्तू शरद पवार यांच्या दिशेने फेकण्यात आली. ही वस्तू शरद पवार यांच्या पाठीमागे उभ्या असलेल्या बॉडीगार्डने कॅच केली. मात्र, त्यावेळी त्याच्या चेहऱ्यावर असलेला संताप आणि रागाचे हावभाव पाहून सर्वांनाच ती वस्तू काय? याचे आश्चर्य वाटत होते. त्यामुळे याविषयी महाराष्ट्रातील राजकारणात चांगलीच चर्चा रंगली होती. शरद पवार यांचे भाषण सर्व वृत्तवाहिन्यांवर लाइव्ह सुरू असतानाच हा प्रकार घडल्यामुळे याबाबत जास्त चर्चा रंगली होती.

शरद पवार यांचे भाषण सुरू असताना अचानक उपस्थितांकडून काहीतरी वस्तू त्यांच्या दिशेने फेकण्यात आली. ही वस्तू बॉडीगार्डने कॅच पकडली. त्यानंतर त्या बॉडीगार्डच्या चेहऱ्यावरील असलेले संतापाचे भाव महाराष्ट्र सर्वांनीच पाहिले. त्यामुळे या विषयीची चर्चा रंगली होती. मात्र ही वस्तू इतर काही नसून लीपर माईक त्यांच्या दिशेने फेकण्यात आला होता. त्यामुळे हा कोणताच अनुचित प्रकार नसून केवळ शरद पवार यांना भाषणासाठी माईक देण्यासाठी तो फेकण्यात आला होता. मात्र, ही पद्धत चुकीची असल्याने त्याविषयी राज्यात चांगलीच चर्चा रंगली.

कन्हेरी हे गाव शरद पवार यांचे मूळ गाव मानले जाते. या गावातील मारुती मंदिरात प्रचाराचा नारळ वाढवल्यानंतरच शरद पवार असो किंवा सुप्रिया सुळे प्रत्येक निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात करतात. त्यामुळे या कन्हेरी गावातच शरद पवार यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. प्रचाराचे नारळ फोडल्यानंतर शरद पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या वेळी कन्हेरी गावा संदर्भातील अनेक आठवणी शरद पवार यांनी उपस्थितांना सांगितल्या. सुप्रिया सुळे यांचा जन्म आणि त्यांचे लग्न देखील या गावातच झाले असल्याची माहिती शरद पवार यांनी या वेळी दिली. उपस्थित असलेल्या नागरिकांची नावे सांगत शरद पवार यांनी या गावाशी असलेला आपल्या घनिष्ठ संबंध पुन्हा एकदा दाखवून दिला.

## बीबीए, बीएमएस, बीसीए प्रवेश परीक्षेच्या नोंदणीसाठी मुदतवाढ

**पुणे :**

व्यवस्थापनशास्त्र पदवी (बीबीए, बीएमएस), संगणक उपयोजन (बीसीए) पदवी अभ्यासक्रमांच्या समाईक प्रवेश परीक्षेसाठी (सीईटी) ४८ हजार १८२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. मात्र या परीक्षेच्या नोंदणीसाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्षाने घेतला आहे.

एमबीए, एमसीए या व्यावसायिक पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या धर्तीवर बीसीए, बीबीए, बीएमएस हे पदवी अभ्यासक्रम आपल्या अखत्यारित घेण्याचा निर्णय अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) घेतला. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची सीईटी राज्य सीईटी सेलकडून घेण्यात येते. त्याच धर्तीवर बीसीए, बीबीए, बीएमएस या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीही प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेतील गुणांच्या आधारे विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया होणार आहे. त्यानुसार बीबीए, बीसीए, बीएमएस अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या सीईटीची नोंदणी सुरू करण्यात आली. या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी अनिवार्य आहे. मात्र राज्यात पहिल्यांदाच होणाऱ्या या परीक्षेबाबत अद्याप फारशी जागृती नसल्याने नोंदणीसाठी मुदतवाढ देण्याची गरज शिक्षण क्षेत्रातून व्यक्त करण्यात आली होती.राज्य सीईटी सेलचे आयुक्त महेंद्र वारभुवन यांनी दिलेल्या माहितीनुसार बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रम प्रवेश सीईटीसाठी ४८ हजार १८२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. मात्र, नोंदणीसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता विद्यार्थ्यांना ३० एप्रिलपर्यंत अर्ज करता येणार आहे. तसेच एमबीए, एमसीए एकात्मिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठीची ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रम, मबीए, एमसीए एकात्मिक अभ्यासक्रम सीईटी २७ ते २९ मे या कालावधीत होणार आहे.

## मतदान केंद्रात आढळला सीआरपीएफ जवानाचा मृतदेह

**माथाभंगा :**

लोकसभा निवडणुकांच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. आज पहिल्या टप्प्यातील १९ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदान होणार आहे. अशातच पश्चिम बंगालमधून एक मोठी घटना समोर आली असून, मतदान केंद्रामध्ये सीआरपीएफ जवानाचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, पश्चिम बंगालमधील माथाभंगा येथे निवडणूक ड्युटीवर असलेल्या सीआरपीएफ जवानाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. सीआरपीएफ जवान हा बाथरूममध्ये पडला होता, त्यामुळे त्याच्या डोक्याला दुखापत झाली होती. त्यानंतर त्याला रुग्णालयात नेण्यात आले, तेथे त्याचा मृत्यू झाला.

ही घटना काल रात्री घडल्याचे सांगण्यात येत आहे. माथाभंगा येथील मतदान केंद्राच्या बाथरूममध्ये हा सीआरपीएफ जवान बेशुद्धावस्थेत आढळून आला. लोकांनी पाहिल्यावर शिपायाला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या जवानाच्या डोक्याला दुखापत झाल्याचे रुग्णालयातील सूत्रांचे म्हणणे आहे. पहिल्या टप्प्यात २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील १०२ जागांवर मतदान होत आहे. पहिल्या टप्प्यात पश्चिम बंगालमधील कूचबिहार, अलीपुरद्वार आणि जलपाईगुडी या तीन जागांवरही मतदान होत आहे.

## साखर उद्योगाला आर्थिक स्थैर्य प्राप्त होण्यासाठी सातत्य ठेवणे आवश्यक : आ. काळे

**वावी : वार्ताहर**

आंतरराष्ट्रीय स्तरावर साखरेचे दर चांगले असतानाही २०२३-२४ च्या गळीत हंगामात ऊस उत्पादन कमी राहील या अंदाजावर केंद्र शासनाने साखर निर्यातीला परवानगी दिली नाही. त्यामुळे चांगले दर असतांना देखील साखर निर्यात होवू शकली नाही. गाळप हंगाम सुरु झाल्यानंतर एक महिन्यातच केंद्र शासनाने बी. हेवी ज्युस पासूनच्या इथेनॉल निर्मितीला बंदी घालत फक्त सी. हेवी पासूनच इथेनॉल निर्मितीचे आदेश काढल्यामुळे साखरेचे उत्पादन वाढले व परिणामी साखरेचे दर कमी होवून साखर उद्योगाचे थोडे फार जुळणारे आर्थिक गणित पुन्हा बिघडले आहे. त्यामुळे साखर उद्योगाला आर्थिक स्थैर्य प्राप्त होण्यासाठी केंद्र शासनाने साखर धोरणांमध्ये सातत्य ठेवणे आवश्यक असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी सांगितले.

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या २०२३/२४ च्या ६९ व्या विक्रमी गळीत हंगामाचा सांगता समारंभ कारखान्याचे मार्गदर्शक व ज्येष्ठ संचालक माजी आमदार अशोकराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार (दि.१९) रोजी कारखान्याचे उपाध्यक्ष डॉ. मच्छिंद्र बर्डे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. चित्राताई बर्डे यांच्या शुभहस्ते श्री सत्यनारायण महापूजा करण्यात येवून संपन्न झाला. याप्रसंगी आ.आशुतोष काळे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, २०२३-२४ च्या गाळप हंगामाचा सर्वच



कारखान्यांचा ऊस उपलब्धतेचा अंदाज चुकल्यामुळे अपेक्षापेक्षा दीड ते दोन महिने गाळप हंगाम उशीरा बंद झाला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कारखान्याचे दोन टप्प्यामध्ये आधुनिकीकरण व विस्तारीकरण करण्यात आले असून कारखान्याची गाळप क्षमता प्रतिदिन ६००० मे.टन एवढी झाली आहे.

दोन्ही टप्प्याचे काम वेळेत व यशस्वी पूर्ण करुन चालू गाळप हंगाम २०२३-२४ हा संपूर्ण नवीन मशिनरीवर घेतांना कारखान्याच्या १६७ दिवसांच्या गाळप हंगामात एकूण ८,४५,७३४ मे.टन ऊस गाळप करून आजपर्यंतचे उच्चांकी गाळप करुन साखर उताराही समाधानकारक असल्याचे त्यांनी सांगितले.

दिवसेंदिवस ऊस तोडणी कामगार मिळणे अवघड होत चालले आहे. त्यामुळे ऊस तोड यंत्राद्वारे तोडणी सोईची होईल अशा पध्दतीने ऊस उत्पादक सभासद शेतक-यांनी ऊस लागवड करणे काळाची गरज आहे. गळीत हंगामाच्या सुरुवातीस पक्व ऊसाची गरज असल्यामुळे आडसाली ऊस लागवड केल्यास हि गरज पूर्ण होवून कारखान्याला सुरुवातीला बाहेर गेटकेन करीता जावे लागणार नाही.

टप्प्याटप्प्याने आडसाली, पूर्वहंगामी, सुरु या ऊस लागवडी व्ही.एस.आय., पुणे यांच्या सल्ल्याने केल्यास कारखान्यास पक्व ऊसाचा पुरवठा होऊन ऊस उत्पादन व साखर उत्पादन वाढीस मदत होईल व शेतकी विभागास ऊस तोडणीचे योग्य नियोजन करणे शक्य होईल. पुढील हंगामात प्रतिदिन ६००० मे. टनापेक्षा जास्त गाळप करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार आहे. कर्मवीर शंकरराव काळे साहेब यांनी लावलेल्या या वटवृक्षाचे सर्वांच्या सहकार्याने नव्यारुपात बहरावा यासाठी प्रयत्न करून बाजारात आपल्या साखरेचा ब्रॅण्ड तयार करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी व्हा.चेअरमन डॉ. मच्छिंद्र बर्डे, संचालक सुधाकर रोहोम, दिलीपराव बोरनारे, राजेंद्र घुमरे, सचिन चांदगुडे, सूर्यभान कोळपे, श्रीराम राजेभोसले, राहुल रोहमारे, प्रवीण शिंदे, शंकरराव चव्हाण, अनिल कदम, अशोक मवाळ, सुनील मांजरे, मनोज जगझाप, वसंतराव आभाळे, दिनार कुदळे, सुरेश जाधव, विष्णू शिंदे,श्रावण आसने,गंगाधर औताडे, जिनिंग प्रेसींगचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार,गोदावरी खोरे केन ट्रान्सपोर्ट कंपनीचे कार्यकारी संचालक दौलतराव मोरे, गौतम केनचे एक्झिक्युटिव्ह संचालक सुभाष गवळी,गौतम बँकेचे माजी चेअरमन बाबासाहेब कोते, ज्येष्ठ कार्यकर्ते बाबुराव कोल्हे, सिकंदर पटेल, वसंतराव वैराळ, देवराम दवंगे, दिलीपराव शिंदे, कारखान्याचे प्रभारी कार्यकारी संचालक सुनिल कोल्हे,आसवणीचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, सेक्रेटरी बाबा सय्यद, असि. सेक्रेटरी संतोष शिरसाठ तसेच सर्व सलग्न संस्थांचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्तविक प्रभारी कार्यकारी संचालक सुनिल कोल्हे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी संचालक अरुण चंद्रे यांनी केले तर आभार संचालक सचिन चांदगुडे यांनी मानले.

## महत्त्वाचे

### तनुजा मुळे यांना पीएच.डी.

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक येथील के.टी.एच.एम.



महाविद्यालयाच्या मराठी संशोधन केंद्रातील संशोधक विद्यार्थिनी तनुजा सुरेश मुळे (मानकर) यांना नुकतीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली. त्यांच्या संशोधनाचा विषय आहे 'अच्युत गोडबोले यांचे साहित्य : एक अभ्यास.' व्ही. एन. नाईक विद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. पौर्णिमा बोडके यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. तसेच केंद्र समन्वयक डॉ. सुरेश जाधव व डॉ. दिलीप पवार यांनीदेखील मोलाचे मार्गदर्शन केले. डॉ. तनुजा मुळे या सध्या अशोका युनिव्हर्सल स्कूल नाशिक येथील माध्यमिक विभागात शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.

### दात्याणे येथील डॉ. नितीन मोगल यांचे अपघाती निधन

**दिक्षी : प्रतिनिधी**

गेल्या तीन दिवसांपूर्वी मोटारसायकलला कारने धडक दिल्याने झालेल्या अपघातात गंभीर



जखमी झालेले डॉ. नितीन मोगल यांच्यावर नाशिकच्या एका खासगी रुग्णालयात औषधोचार सुरू असताना शुक्रवारी सकाळी त्यांचे निधन झाले. अनेक वर्षांपासून दात्याणे गावात वैद्यकीय क्षेत्रात निःस्वार्थपणे सेवा करणारे तसेच कोरोनासारख्या महामारीत अहोरात्र ग्रामीण भागातील रुग्णांची सेवा करणाऱ्या गोरगरिबांना अंत्यत अल्प दरात वैद्यकीय सेवा करणारे मूळचे शिंगवे येथील डॉ. नितीन यशवंतराव मोगल यांच्या मोटारसायकलला दिनांक १६ रोजी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास ओझर-सुकेणा रस्त्यावरील ओझर शिवारातील जाधव वस्तीजवळ अल्टोकारने धडक दिल्याने झालेल्या अपघातात ते गंभीर जखमी झाले असता त्यांना नाशिकच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, परंतु तेथे त्यांच्यावर औषधोचार सुरू असताना काल दिनांक १९ एप्रिल रोजी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास त्यांचे निधन झाले. डॉ. मोगल यांच्या निधनाने पंचक्रोशीतील दिक्षी, दात्याणे, जिव्हाळे, थेरगाव या गावामध्ये शोककळा पसरली आहे. डॉ. नितीन मोगल यांना झालेल्या अपघातात त्यांच्या मेंदूस जबर मार लागला होता. त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या निधनानंतर मोगल कुटुंबीयांकडून सामाजिक भावना जोपासत डॉ. मोगल यांचे अवयवदान करण्यात आले.

# बेपत्ता मुकुंद सारडांचा मृतदेह इगतपुरीत

## विष पिऊन आत्महत्या केल्याचे निष्पन्न



**इगतपुरी : प्रतिनिधी**

सिन्नर येथील बेपत्ता असलेले व्यापारी पुरुषोत्तम सारडा यांचा मृतदेह इगतपुरी शहर हद्दीतील महामार्गालगत असलेल्या फॉग सिटीच्या मागील बाजूस आडळून आला आहे.

सारडा हे शुक्रवार दि. १२ एप्रिल रोजी घरून दुकानात चाललो आहे, असे सांगून गेले होते. मात्र, ते दुकानात गेलेच नाही. तसेच दुसऱ्या दिवशी शनिवारी चार वाजेपर्यंत घरी पोहचलेच नाही. त्यांच्या घरच्यांनी नातेवाइकांकडे व परिसरात विचारपूस केली असता ते कोठेही आढळून आले नाही.

याबाबत घरच्यांनी सिन्नर पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती. गुरुवार दि. १८ रोजी पोलिसांना इगतपुरीजवळ कथरूवंगन येथील रहिवासी इसमाने अनोळखी इसमाचा मृतदेह दिसल्याची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता सदर व्यक्तीचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आला.

पोलिसांनी जागेवर पंचनामा करून वैद्यकीय अधिकाऱ्याला पाचारण करीत जागेवरच शवविच्छेदन केले. सदर इसमाने कर्जबाजारीपणाला कंटाळून विष पिऊन आत्महत्या केल्याचे वैद्यकीय तपासात निष्पन्न झाले. तपासाअंती हा मृतदेह बेपत्ता असलेल्या मुकुंद सारडा यांचा असल्याचे निष्पन्न झाले आहे.

नातेवाइकांना बोलावून पोलिसांनी शव त्यांच्या ताब्यात दिले. याबाबत अधिक तपास पोलीस निरीक्षक राहुल तसरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप शिंदे, सहायक उपनिरीक्षक गणेश परदेशी, पोलीस हवालदार राहुल साळवे, गोपनीय पोलीस नीलेश देवराज, निवृत्ती निरवळ, प्रदीप घेगडमल, राहुल सहाणे करीत आहेत.

# म. फुले, डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त नेत्ररोग शिबिर

**नाशिक : प्रतिनिधी**

राजीवनगरमध्ये मोफत महिला रोग, नेत्ररोग व दंतरोग तपासणी शिबिर झाले. महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त राजीवनगर वसाहतीमध्ये जीवक डेंटल क्लिनिक आणि प्लांट सेंटर सुजय नेत्रसेवा व नामको हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये विशेषतः महिला व ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेतला. याप्रसंगी महिलांच्या स्तनांचे कॅन्सर व गर्भाशयाचे कॅन्सर यासाठी लागणारे व इतर तपासण्या नामको चॅरिटेबल हॉस्पिटल यांच्यामार्फत करण्यात आल्या.

सदर शिबिरांमध्ये ८० शिबिरार्थींनी शिबिराचा लाभ घेतला. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी सुजय नेत्रसेवाचे डॉ. नानासाहेब खरे, जीवक डेंटल क्लिनिकचे डॉ. विशाल जाधव, डॉ. कल्याणी गर्दे व नामको हॉस्पिटलचे सर्व टीम यांचे सहकार्य लाभले.





शिबिराच्या नियोजनासाठी राजीवनगरमध्ये जयंती समितीचे अध्यक्ष गणेश तुपसुंदर, सतीश सहजराव, रावसाहेब मकासारे, राजेश भोसले, सुभाष मुंडे, अशोक पवार, गौतम सहजराव, कैलास जाधव, रामकिसन बदरगे, मधुकर गायकवाड, महादेव लोखंडे, सिद्धार्थबाले धबाले, ॲड. शरद जाधव, किरण लोखंडे, पवन बदरगे आदींचे सहकार्य लाभले. सदर शिबिराप्रसंगी शिवसेनेचे विभागप्रमुख सागर देशमुख उपस्थित होते. या शिबिरात रुग्णांना मोफत उपचार करण्यात आले असून, पुढील शस्त्रक्रिया देखील माफक दरात करून देण्यात येणार असल्याचे डॉ. विशाल जाधव व डॉ. नाना खरे यांनी सांगितले.



# चांदवडला तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन

**मंगरूळ : वार्ताहर**

गणेश फुलसुंदर उपशिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नाशिक आणि उदय देवरे, उपशिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नाशिक यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. १८ एप्रिल के. बी. आबड होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज येथे बागलाण, चांदवड आणि देवळा तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या २५० मुख्याध्यापकांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

यप्रसंगी गणेश फुलसुंदर यांनी पुढील सूचना देत उपस्थित मुख्याध्यापकांना मार्गदर्शन केले. १ मे या निकालाच्या दिवशी विद्यालयात आजी-आजोबा मेळावा, माता पालक मेळावा आयोजित करण्यात यावा. तसेच विद्यालयातील मुख्याध्यापकांनी सेल्फी उपक्रम राबवून मतदान जनजागृती करावी. लग्नसमारंभ, वाढदिवस यांसारख्या सामाजिक कार्यक्रमांमध्ये मतदान जनजागृतीसाठी विशेष प्रयत्न करण्यात यावे. उपशिक्षणाधिकारी उदय देवरे यांनी १८ एप्रिल ते २० मेपर्यंत घ्यावयाचे विविध उपक्रम आणि मुख्याध्यापक ग्रुपवर येणाऱ्या मतदान जनजागृतीविषयक माहितीचे संदेश वर्गशिक्षकांमार्फत पालकांपर्यंत पोहोचवावे तसेच आपल्या आस्थापनेतील सर्व कर्मचाऱ्यांनी मतदान केले असल्याची नोंद घेऊन त्याचा देखील दस्त तयार करावा. त्याचप्रमाणे विद्यालयामध्ये घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती जिल्हा परिषदेच्या ईमेल आयडीवर पाठवावी आणि त्याचा देखील संग्रह शालेय दप्तरी ठेवावा. हे सर्व उपक्रम सध्या विद्यार्थी शाळेत नसतानादेखील शिक्षकांनी राबवायचे आहेत, अशा सूचना देत उपस्थित मुख्याध्यापकांना मार्गदर्शन केले.

नाशिक जिल्ह्यात मतदानाचा टक्का वाढावा या अनुषंगाने आयोजित केलेल्या बागलाण, चांदवड, देवळा तालुक्यातील मुख्याध्यापकांच्या सहविचार सभेसाठी रामचंद्र बोडके, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती चांदवड, वसंतराव खैरनार, विस्तार अधिकारी (शिक्षण) पंचायत समिती यांनी देखील उपस्थित मुख्याध्यापकांना मतदान केंद्रावर अद्ययावत करायच्या सोयीसुविधा याविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य शिवदास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले. संस्थेच्या मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. अजय दहाड आणि सहकाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# राजीवनगरमध्ये भीम जयंती उत्साहात साजरी

**नाशिक : प्रतिनिधी**

राजीवनगरमध्ये महात्मा फुले जयंती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. ११ तारखेला सर्वरोगनिदान शिबिर तसेच राजेश भोसले यांच्या सहकार्याने सायंकाळी प्रबोधनपर भीमगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

तसेच १४ एप्रिल रोजी ॲड. भारत बुकाने यांचा प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन राजगृह बुद्धविहार या ठिकाणी करण्यात आले होते. यप्रसंगी बुकाने यांनी तरुणांना शिक्षणासाठी कुठली वयाची अट नसते तसेच कितीही कठीण प्रसंग आयुष्यात आला तरी त्यावरती मात करून आपण बाबासाहेबांनी सांगितलेल्या पद्धतीने शेवटच्या क्षणापर्यंत शिक्षणाची कास सोडू नये, असे आवाहन केले. यप्रसंगी महिलांनी भारत बुकाने यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत बाबासाहेबांचे स्वप्न साकार करण्यासाठी आम्ही आमच्या मुलांना शिक्षणाचा प्रवाहातून बाहेर पडू देणार नाही अशी ग्वाही दिली. तसेच राजीवनगर जयंती कमिटीचे अध्यक्ष गणेश तुपसुंदर यांनी भारत बुकाने यांचा सत्कार केला.

यप्रसंगी कविता कर्डक व भुजबळ ताई यांनीसुद्धा बाबासाहेबांच्या स्वप्नातील भारत घडवण्यासाठी महिलांनीसुद्धा शिक्षित व स्वावलंबी होणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. यप्रसंगी रावसाहेब मकासरे यांनी कविता कर्डक व भुजबळताई यांचे स्वागत केले. तसेच डॉ. विशाल जाधव यांनी आभार मानले.

सायंकाळी पाच वाजता डीजे व संगीताच्या तालावर ती परिसरातील सर्व पुरुष, महिला व बालक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. बाबासाहेबांच्या विविध गीतांवरती तरुणांनी मनसोक्त आनंद लुटला व रात्री दहा वाजता कुठलाही अनुचित प्रकार न घडता शांततेत सदर जयंती पार पडली. यप्रसंगी इंदिरानगर पोलीस ठाण्याचे सर्व पोलीस कर्मचारी व पत्रकार तसेच जयंती कमिटीमधील राजेश भोसले, कल्याण खरात, चतुर्भुज ढोले, सुभाष उंडे, सुभाष हिवाळे, पिनू साळवे, पदाधिकारी यांनी नियोजनासाठी मोलाचे सहकार्य केले.





# महावितरण देवळा उपविभागाचा गौरव

**खामखेडा : प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष २०२३-२४ विद्युत थकबाकी वसुली, कार्यक्षमता वाढ व उत्कृष्ट ग्राहक सेवा याबाबतीत महावितरण देवळा उपविभागाने नाशिक परिमंडळात सर्वोत्तम कामगिरी केली. त्याप्रीत्यर्थ देवळा येथे आयोजित/कर्मचारी गुणगौरव कार्यक्रमास अधिकारी व कर्मचारी यांचा सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

महावितरण मालेगाव मंडळ अधीक्षक अभियंता जगदीश इंगळे यांनी देवळा उपविभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी सूक्ष्म नियोजन करून मार्चअखेर थकबाकी ३.५ लाख इतकी आणली. तांत्रिक सुधारणा, उत्कृष्ट ग्राहक सेवा मालेगाव मंडळमधील प्रथम नामांकन प्राप्त दहिवड उपकेंद्र व महावितरणचे इतर मापदंड याबाबतीत देवळा उपविभागातील अधिकारी व कर्मचारी यांची कामगिरी सर्वोत्तम असून, सर्व कौतुकास पात्र आहेत, असे सांगितले. सदर कार्यक्रमास कळवण विभागाचे कार्यकारी अभियंता युवराज पाटील यांनी आपल्या मनोगतात देवळा उपविभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी ठरवून दिलेली उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी विभागीय कार्यालयास फारसे सांगावे लागत नाही. त्यांचे सांघिक कार्य उत्कृष्ट असल्याचे आवर्जून सांगितले. तसेच गेल्या ३ वर्षांपासून घरगुती, वाणिज्य, औद्योगिक व इतर थकबाकीसोबत महावितरण कर्मचारी व ग्रामपंचायत प्रशासन यांच्याशी योग्य सुसंवाद साधून ग्रामपंचायत पाणीपुरवठा विद्युत थकबाकी वसुलीमध्ये देवळा उपविभागातील एकूण ७६ विद्युत कनेक्शनपैकी ५५ पाणीपुरवठा विद्युत कनेक्शन थकबाकी निरंक केली असून, उपविभाग थकबाकी फक्त ८ लाख रुपयांपर्यंत आणली आहे. हे सर्व यश उपविभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे आहे, असे सांगितले. त्यामुळे प्रातिनिधिक स्वरूपात विठेवाडी ग्रामसेवक उतम बी. खैरनार यांचा साचलेली थकबाकी योग्य सहकार्यामुळे निरंक करण्यात आली. त्यामुळे त्यांना ही सन्मानित करण्यात आले.

या गुणगौरव सोहळ्याचे प्रास्ताविक उपकार्यकारी अभियंता बंकट सुरवसे यांनी केले. सदर प्रास्ताविकात सुरवसे यांनी महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या निर्देशानुसार व नाशिक परिमंडळ मुख्य अभियंता दीपक कुमठेकर, अधीक्षक अभियंता जगदीश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांच्या मापदंडानुसार उत्कृष्ट ग्राहक सेवा देण्यासाठी देवळा उपविभागातील अधिकारी/कर्मचारी सतत प्रयत्नशील राहत असल्यामुळे सर्व वर्गवारी थकबाकी कमी करण्यात यश आल्याचे सांगितले. सदर कार्यक्रमास अतिरिक्त कार्यकारी अभियंता छगन थैल, उपकार्यकारी अभियंता चव्हाण कळवण विभाग, उपव्यवस्थापक लेखा स्वाती शिंदे-देवरे, अविनाश डमरे, सहाय्यक अभियंता जितेंद्र देवरे, घनश्याम कुंभार, कैलास शिवदे, कल्याणी भोये-अहिरे, गौरव पगार, सहाय्यक लेखापाल अमित मत्सागर आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते तसेच कंत्राटदार बापू बच्छाव, गिरीश आहेर, दत्तात्रय जाधव, स्वप्नील शिरसाठ उपस्थित होते.

### कोटमगावला दत्त महाराज मंदिर प्राणप्रतिष्ठा

**लासलगाव : वार्ताहर**

कोटमगाव येथे श्री गुरुदेव दत्त महाराज मंदिर प्राणप्रतिष्ठानिमित्ताने तीन दिवसीय कार्यक्रम आयोजिला असून, वैकुंठवासी परमपूज्य नानाजी महाराज वडनेरे, वैकुंठवासी हभप भागवत बाबा शिंदे, वैकुंठवासी हभप भाऊराव अण्णा शिरसाट यांच्या कृपाशीर्वादाने दि. १९ ते २१ या रोजी कार्यक्रम आयोजन केले आहे. कार्यक्रम खालीलप्रमाणे दिनांक १९ सकाळी सात वाजता दत्त महाराज मूर्ती मिरवणूक, ८ ते११ होम हवन व नंतर ३/६ होमहवन व सात ते आठ हरिपाठ, आठ ते नऊ श्री धर्माचार्य हभप निवृत्ती महाराज रायते यांचे प्रवचन होईल व त्यानंतर नऊ ते ११ भजनाचा कार्यक्रम होईल. याप्रमाणे वीस तारखेला कार्यक्रमाची अशीच रूपरेषा असेल व दिनांक २१ रोजी सकाळी सहा ते दहा होमहवन व नंतर मूर्ती पूजा व मूर्ती प्राणप्रतिष्ठा महामंडलेश्वर एक हजार आठ परमपूज्य शिवगिरी महाराज व विमलगिरी महाराज यांच्या हस्ते व साधुसंतांच्या उपस्थितीत होईल व त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल, अशी माहिती हभप बाळासाहेब महाराज शिरसाट, जिल्हाध्यक्ष भारतीय वारकरी मंडळ नाशिक जिल्हा यांनी दिली आहे.

# सुवर्णकार महिला मंडळातर्फे रामरक्षा पठण, बक्षीस वितरण

**नाशिक : वार्ताहर**

अहिर सुवर्णकार समाजातर्फे श्रीराम मंदिर चावडी चौक येथे श्री राम नवमीनिमित्त सामूहिक रामरक्षा पठणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला मंडळाच्या अध्यक्षा मीनाक्षी सचिन जाधव यांनी केले. सदर कार्यक्रम घेण्यामागचा उद्देश म्हणजे समाज एकत्र बांधून ठेवणे, समाजात एकी निर्माण करणे हा आहे.

कार्यक्रमासाठी अहिर सुवर्णकार समाजातील महिलावर्गासोबत इतरही महिलांनी सहभाग घेतला होता. महिला मंडळातर्फे संत नरहरी महाराज आरती व श्रीराम नवमीनिमित्त रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या असून, त्यामध्ये बऱ्याच समाज भगिनींनी सहभाग घेतला होता.

त्यामध्ये आरती स्पर्धेत सायली जाधव, कल्पना जाधव, दर्शना अहिरराव, रेणू जाधव, प्रियांका विसपुते तसेच रांगोळी स्पर्धेत जान्हवी जाधव, प्रीती जाधव, पूनम वाघ, जोत्स्ना जाधव, सायली जाधव, तनिष्का जाधव विजय मिळवला व महिला मंडळातर्फे त्यांना बक्षिसे देण्यात आली.

त्याचप्रमाणे समाजातील कर्तृत्ववान कन्या जान्हवी वानखेडे, नूपुर जाधव यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थितांमधून दोन लकी ड्रॉ काढण्यात आले असून, रेखा जाधव, अनिता जाधव लकी विनर्स ठरल्या.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी पूजा दंडगव्हाळ, प्रीती जाधव, पूजा घोडके, योगिता वाघ, गायत्री जाधव, सुनंदा जाधव, कल्पना जाधव, अंजली जाधव, शारदा जाधव, पुष्पा जाधव यांनी तसेच कार्यकारिणी महिला मंडळ व सहकार्यकारिणी महिला मंडळ यांनी अथक परिश्रम घेतले.

सुवर्णकार समाजाचे अध्यक्ष विलास दंडगव्हाळ व राजेंद्र थोरात, कैलास जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले. पाठाचे वाचन रूपाली जाधव, उज्ज्वला जाधव, सायली जाधव, पूजा घोडके यांनी केले. कार्यक्रमासाठी समाजातील भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आभार उपाध्यक्षा उज्ज्वला प्रशांत जाधव यांनी केले तर सूत्रसंचालन रूपाली जाधव यांनी केले.



# एन्झोकेम विद्यालयात महामानव डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**येवला : प्रतिनिधी**

येथील सेनापती तात्या टोपे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन्झोकेम विद्यालयात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३३व्या जयंतीनिमित्ताने अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे प्राचार्य दत्तकुमार उटवाळे यांच्या हस्ते बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सुरेश जोरी यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच उच्च माध्यमिक विभागाच्या स्वाती सानप यांनी आपल्या मनोगतातून बाबासाहेबांचे बालपण, उच्च शिक्षण, १९३५ ची धर्मांतर घोषणा, १९५६ ला घेतलेली बौद्ध धर्माची दीक्षा यांची विस्तृत माहिती दिली.

प्राचार्य दत्तकुमार उटवाळे यांनी मनोगतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून जगायला शिकवले हे सांगतानाच बाबासाहेबांनी सांगितलेली



**येवला : शहरातील एन्झोकेम विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्ताने त्यांना अभिवादन करताना शिक्षक. (छाया : विलास पगारे)**

आरक्षणाची गरज व सामाजिक संरचना स्पष्ट केली. कार्यक्रमाचे नियोजन उत्सवप्रमुख सुहासिनी शिंदे व शाळेच्या पदाधिकाऱ्यांनी केले. सूत्रसंचालन सुरेखा गिरासे यांनी केले तर आभार शीतल शिंदे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यालयाचे उपप्राचार्य कैलास धनवटे, उच्च माध्यमिक विभागप्रमुख कैलास पाटील, उत्तम पुंड, कैलास चौधरी, रमेश माळी, प्रकाश सोनवणे, सतीश विसपुते व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जिद्द, चिकाटी ठेवल्यास यश नक्कीच मिळते : पाटील

**दिंडोरी : प्रतिनिधी**

जिद्द व चिकाटी असली की, यश मिळते. मला माझ्या आई-वडिलांकडून शिकण्याची प्रेरणा मिळाली. आत्मविश्वास, अपार कष्टाची तयारी, कुटुंबाची साथ आणि स्वयंअध्ययनातून हे यश मिळाले. ग्रामीण भागातील मुलांनी कोणताही न्यूनगंड न बाळगता प्रामाणिक प्रयत्न करावेत. वेळेचा सदुपयोग करावा, असे प्रतिपादन आयएएस विनय सुनील पाटील यांनी केले.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत विनय सुनील पाटील यांनी देशात १२२ वा क्रमांक मिळविल्याबद्दल निळवंडी गावच्या वतीने सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी



सत्काराला उत्तर देताना विनय पाटील बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी के. टी. एच. एम. महाविद्यालयाचे उपशिक्षक दौलत पताडे होते. व्यासपीठावर सुभाष पाटील, माजी पंचायत समिती उपसभापती कैलास पाटील, सरपंच मनीषा चारोस्कर, उपसरपंच भाऊसाहेब पाटील, राजेंद्र गांगुर्डे, रामदास पाटील, पोलीसपाटील अंबादास पाटील, प्रभाकर पाटील, विष्णू पाटील, वामन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. विनय पाटील पुढे म्हणाले की, २०१८ साली यूपीएससी उत्तीर्ण झालेले आयपीएस यतिश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मी २०२० पासून यूपीएससीची तयारी केली आणि तिसऱ्या प्रयत्नात मला यश मिळाले. प्रयत्नात सातत्य ठेवल्यास यश नक्कीच मिळते, हे यातून सिद्ध झाले, असे ते म्हणाले.

यावेळी शिक्षक विश्वजित भामरे, विषाखा देवरे, रामदास पाटील, गणेश हिरे, संतोष पाटील, सुनील पाटील, राजेंद्र गांगुर्डे, दौलत पताडे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी ग्रामपंचायत, जय कानिफनाथ पाणी वापर संस्था, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जनता विद्यालय व निळवंडी गावच्या वतीने विनय पाटील यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

## आखाडा



### सुप्रिया सुळेंनी सुनेत्रा पवारांकडून घेतले ५५ लाखांचे कर्ज

**पुणे :** बारामती लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या उमेदवार विद्यामान खासदार सुप्रिया सुळे यांनी त्यांचे भाचे पार्थ, वहिनी 'बारामती'तील महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्याकडून ५५ लाख रुपयांचे कर्ज घेतले आहे, तर सुनेत्रा पवार यांनी सुळेंसह पती राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, शरद पवारांच्या पत्नी प्रतिभा पवार आणि सासू आशाताई पवार यांनाही कर्ज दिले असल्याचे उघड झाले आहे. विद्यमान खासदार सुप्रिया सुळे आणि त्यांचे कुटुंबीय अब्जाधीश असून, सुळे कुटुंबाची एकूण संपत्ती सुमारे १६६ कोटी ५१ लाख ८६ हजार ३४८ रुपयांच्या घरात पोहोचली आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत त्यांच्या उत्पन्नात एक कोटी आठ लाख ९७ हजार ३४८ रुपयांनी भर पडली आहे. सुळे कुटुंबीयांचे वार्षिक उत्पन्न सरासरी ५.६८ कोटी रुपये असून, सुळे यांनी सुनेत्रा पवार आणि त्यांचा मुलगा पार्थ पवार यांच्याकडून सन २०१९ मध्ये उसने घेतलेले ५५ लाख रुपये पाच वर्षांनंतरही फेडलेले नाहीत. पार्थ यांच्याकडून २० लाख रुपये, तर सुनेत्रा पवार यांच्याकडून ३५ लाख रुपये घेण्यात आले आहेत.

### भारताच्या निवडणुकांची दखल घेत गुगलचं नवं डुडल



**मुंबई :** विविध दिवसांचं औचित्य साधून गुगल ॲप नवनवीन डुडल तयार करत असतं. थोर व्यक्तींची जयंती, पुण्यतिथी, कधी मोठा सण किंवा एखाद्या देशाचं अननय्साधारण यश अशा अनेक गोष्टींना घेऊन गुगल मजेशीर तर कधी संदेश देणारे डुडल्स तयार केले जातात. आज भारतात सार्वत्रिक निवडणुका सुरु होत आहेत, त्याची दखल घेत गुगलने नवं डुडल तयार केलं आहे. गुगल ॲप सुरु केल्यानंतर हे डुडल तुम्हाला दिसेल. भारतात १९ एप्रिल २०२४ ते १ जून २०२४ या कालावधीत १८ व्या लोकसभेच्या ५४३ सदस्यांची निवड करण्यासाठी सात टप्प्यांत सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. ४ जून २०२४ रोजी याचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. यानिमित्त आज गुगलचं बोटाला शाई लावलेल्या मतदाराच्या हाताचं डुडल सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे. 'मतदान करा' असा संदेश देण्याचा प्रयत्न या डुडलमार्फत करण्यात आला आहे.

### ''तर आम्ही सहन करणार नाही' : तानाजी सावंत

**मुंबई:** सभा मतदारसंघामध्ये महायुतीकडून अर्जना पाटील या लोकसभेच्या मैदानात आहेत. अर्चना पाटील यांनी आज (१९ एप्रिल) उमेदवारी अर्ज भरला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह महायुतीचे नेते उपस्थित होते. यावेळी सभेत बोलताना शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि जिल्ह्याचे पालकमंत्री तानाजी सावंत यांनी अजित पवार यांच्यासमोर जाहीर नाराजी बोलून दाखवली. धाराशिव लोकसभा मतदारसंघ महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडे गेला आहे. यासंदर्भाने बोलताना तानाजी सावंत यांनी खंत बोलून दाखवली. ''शिवसेनेचा असाच एक एक मतदारसंघ जर कमी होत राहिला तर आम्ही सहन करणार नाही'', असा इशारा तानाजी सावंत यांनी दिला.''आज येथे अजित पवार आहेत. भाजपा आमदार राणा जगजितसिंह पाटील आहेत. थोडं परखड बोलतो. धाराशिवमध्ये महायुतीचा प्रचार हा जानेवारीमध्येच सुरु झाला आहे. २६ जानेवारीपासून धनंजय सावंत यांनी प्रचाराला सुरुवात केली होती. खरे तर हा मतदार पारंपारिक पद्धतीने शिवसेनेचा आहे. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या महायुतीच्या नेत्यांनी धाराशिव मतदारसंघ महायुतीमधील राष्ट्रवादीला सोडण्याचा निर्णय घेतला'', असे तानाजी सावंत म्हणाले. पुढे ते म्हणाले, ''ज्या ज्या वेळेस पुढच्या व्यासपीठावर येऊ, तेव्हा तेव्हा समोरच्याचा फडशा पाडल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही. पण हा नंतरचा भाग आहे. त्याआधी जर असाच पद्धतीने माझ्या शिवसेनेचा एक एक मतदारसंघ कमी होत राहिला तर हा शिवसैनिक आणि मी स्वत: हे सहन करणार नाही. हे आज या ठिकाणी सांगतो. याचे कारण हा मतदारसंघ पारंपारिक शिवसेनेचा आहे. ८ वेळा शिवसेनेचा खासदार येथून निवडून गेला आहे. त्यामुळे हा माझ्या तमाम शिवसैनिकांवर अन्याय आहे. मात्र, नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी हे दु:ख विसरुन शिवसैनिकांना विनंती आहे की, अर्चना पाटील यांना आपल्याला लीड द्यायचे आहे'',

## राजेश टोपेंना मोठा धक्का

# कट्टर समर्थकांचा अजितदादांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

**परभणी :**

परभणी लोकसभा मतदारसंघात मोठ्या घडामोडी घडत आहेत. अजित पवारांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते राजेश टोपे यांना मोठा धक्का दिला आहे. टोपे यांचे १८ कट्टर समर्थकांनी अजित पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश केला.

टोपे यांचे समर्थक असलेले जालना जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष महेंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली २ जिल्हा परिषद सदस्य अन् तीर्थपुरी नगर पंचायतच्या नगराध्यक्ष अलका चिमणे यांच्यासह ११ नगरसेवकांनी काल अजित पवार यांच्या उपस्थितीत धाराशिव येथे त्यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केलाय.

**टोपेंसह महाविकास आघाडीला मोठा धक्का**

यामुळे ऐन निवडणुकीत टोपे यांच्यासह महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. अजित पवार काल धाराशिव येथे होते. तेथेच हा पक्षप्रवेश पार पडलाय. यावेळी परभणीतील नेते राजेश विटेकर यांच्यासह आमदार विक्रम काळे, सतीश चव्हाण आदी उपस्थित होते.

**यांनी केला प्रवेश**

तीर्थपुरी नगर पंचायतीच्या नगराध्यक्षा अलका अण्णासाहेब चिमणे, सभापती घनश्याम चिमणे, सुधाकर सर्जेराव मापारे, तुळशीराम रंगनाथ वानखडे, बाळासाहेब बोबडे, सुभाष चिमणे, दीपक चिमणे, श्रीकृष्ण बोबडे, सुमण कुंडलिक कासार, लक्ष्मण चव्हाण, चंद्रकांत अंकुश बोबडे, शे जिलानी शे जाफर तर जालना जिल्हा परिषदेतील महेंद्र भाऊ पवार, जयमंगल जाधव, राज देशमुख जाधवराव, भास्करराव वराडे, मनोहर शिंदे यांचा समावेश आहे.



**अजितदादांचे शरद पवारांना प्रत्युत्तर**

बारामती लोकसभा मतदारसंघात प्रचारादरम्यान अजित पवारांनी मतदारांना कचाकचा मतदान करण्याचे आवाहन केले होते. यावरून शरद पवार यांनीही अजित पवारांना प्रत्युत्तर दिले. काही लोकांनी कसे मतदान करायचे हे तुम्हाला सांगितले. पण मी तसे सांगणार नाही. देणे-घेणे करून मते मागण्याची आमची भूमिका नसल्याचे शरद पवार यांनी म्हटले होते. आता अजित पवारांकडून शरद पवारांना प्रत्युत्तर देण्यात आले आहे. अजित पवार म्हणाले की, आम्ही कोणतेही प्रलोभन दिलेले नाही. उमेदवार हा विकास करण्याकरिता निवडून द्यायचा असतो. काही जणांच्या जाहीरनाम्यामध्ये आहे की, आम्ही निवडून आलो तर महिलांसाठी हे हे करू. त्यांनीदेखील सांगताना सांगितलं की, पटापटा अकाउंटमध्ये पैसे येतील, मग हे प्रलोभन नाही का? विकासकाम करायची संधी आम्हाला द्या आणि त्यासाठी ग्रामीण भागाच्या भाषेत मी बोललो, असे ते म्हणाले.



## नारायण राणे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**रत्नागिरी :**

रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे लोकप्रिय उमेदवार नारायण राणे यांनी प्रचंड शक्तिप्रदर्शन करत काल उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, उद्योगमंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार शेखर निकम, लोकसभा निवडणूक प्रमुख प्रमोद जठार, किरण सामंत आदी महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाइनद्वारे शुभेच्छा दिल्या. विदर्भात काल मतदान असल्याने येता आले नाही पण निवडणूक प्रचारादरम्यान रत्नागिरी-सिंधुदुर्गात येणार असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## मतदानाच्या पहिल्याच दिवशी मोदींचे मतदान करण्याचे आवाहन

**नवी दिल्ली :**

मागील काही महिन्यांपासून ज्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांनी कंबर कसली होती आणि पुढील पाच वर्षांसाठी देशाची सत्ता कोणाच्या हाती जाणार, हे ठरवणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानाला काल सुरुवात होत आहे.

लोकसभा निवडणुकीतील पहिल्या टप्प्यासाठी आज १९ राज्ये व २ केंद्रशासित प्रदेशांमधील १०२ लोकसभा मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. आजच्या मतदानासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून चोख व्यवस्था करण्यात आली आहे. मतदान हा सर्वसामान्य लोकांचा हक्क असून, प्रत्येकाने मतदान केलं पाहिजे यासाठी आयोगाकडून मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जात आहे.



अशातच आता देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील लोकांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे. महत्त्वाची बाब म्हणजे पंतप्रधान मोदींनी देशातील नागरिकांना सहा भाषांमधून मतदान करण्याचं आवाहन केलं आहे. या सहा भाषांमध्ये मराठीचाही समावेश करण्यात आला आहे. मोदींनी एक्सवर पोस्ट करत तरुणांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ट्विटमध्ये लिहिलं, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीला आजपासून सुरुवात! २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील १०२ जागांसाठी मतदान होत असल्याने, या जागांसाठी मतदान करणाऱ्या सर्वांनी विक्रमी संख्येनं मतदान करावं असं मी आवाहन करतो. विशेषतः तरुण आणि प्रथमच मतदान करणाऱ्या मतदारांना मोठ्या संख्येनं मतदान करण्याचं मी आवाहन करतो. शेवटी, प्रत्येक मत मोजले जाते आणि प्रत्येक आवाज महत्त्वाचा असतो! असं ट्विट मोदींनी केलं आहे. मोदींनी ट्विट करताना तरुण वर्गासह पहिल्यांदा मतदान करणाऱ्यांना मोठ्या संख्येने मतदान करण्याचं आवाहन केल्याचं दिसत आहे. तसेच प्रत्येक मत किती महत्त्वाचं आहे. याचं महत्त्व समजावून सांगण्याचाही पंतप्रधानांनी प्रयत्न केला आहे.

## उद्धव ठाकरे दलितविरोधी, वर्षा गायकवाडांचे तिकीट कापले, मिलिंद देवरांचा आरोप

**मुंबई :**

काँग्रेसच्या वर्षा गायकवाड या दलित असल्यामुळे उद्धव ठाकरे यांनी दक्षिण मध्य मुंबईची जागा त्यांना सोडण्यास नकार दिला, असा गंभीर आरोप शिंदे गटाचे राज्यसभा खासदार मिलिंद देवरा यांनी केला. दक्षिण मध्य मुंबई हा खुल्या प्रवर्गातील मतदारसंघ आहे. त्यामुळे येथून वर्षा गायकवाडांच्या रुपाने दलित चेहरा दिल्यास नुकसान होऊ शकते, असे उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस नेत्यांना सांगितल्याचा दावा देवरा यांनी केला. मिलिंद देवरा यांनी यासंदर्भात एक ट्विट केले आहे.

या ट्विटमध्ये देवरा यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर आरोप करताना म्हटले आहे की, दक्षिण मध्य मुंबईत वर्षा गायकवाड यांना तिकीट न देणे यातून काँग्रेस आणि उबाठा गटाची दलित विरोधी मानसिकता दिसून येते. उबाठा गट महाराष्ट्रात २१ जागांवर निवडणूक लढवत आहे. मात्र त्यात केवळ एका जागेवर उबाठा गटाने दलित उमेदवाराला संधी दिली आहे. आम्ही या निवडणुकीत तीन दलित उमेदवारांना संधी दिली आहे. महाविकास आघाडीत दलित उमेदवारांची प्रतारणा सुरू आहे. कारण काँग्रेस आणि उबाठामध्ये दलित समाजबांधवांना स्थान आणि मान नाही आणि खुल्या मतदारसंघातून दलित उमेदवार उभा करण्याची त्यांच्यात हिंमत नाही, असे मिलिंद देवरा यांनी म्हटले.



निवडणुकीत दलित समाजाची मते हवीत, पण या समाजाला नेतृत्वाची संधी द्यायची नाही, अशी दुटप्पी भूमिका उबाठा गटाची दिसून येते. माझ्याकडे माहिती आहे की उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसला असे कळविले की वर्षा गायकवाड यांना खुल्या जागेवर (दक्षिण-मध्य मुंबई) तिकीट दिले तर दलित असल्यामुळे त्यांचा पराभव होईल. एक सुशिक्षित, सक्षम आणि राजकारणात आपल्या कामगिरीने ठसा उमटवणाऱ्या वर्षा गायकवाड यांच्याबाबत जे राजकारण होत आहे ते दुर्दैवी आहे. अशा मानसिकतेचा मी निषेध करतो, असे मिलिंद देवरा यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे.



## जानकर-मोहिते पाटील तीस वर्षांनंतर एकाच व्यासपीठावर

**माळशिरस :**

तालुक्याच्या राजकारणात गेले ३० वर्षे कट्टर विरोधक ओळखले जाणारे उत्तम जानकर आणि मोहिते पाटील आज एकाच व्यासपीठावर आले होते. जानकर - मोहिते पाटील एकत्र आल्याने माढा लोकसभा मतदारसंघात महायुतीला मोठा धक्का बसला आहे. उत्तम जानकर हे माळशिरस तालुक्यातील धनगर समाजाचे नेते आहेत.मोहिते पाटील विरोधक म्हणून ते गेल्या ३० वर्षांपासून माळशिरस च्या राजकारणात सक्रिय आहेत. जानकर यांनी तीन वेळा मोहिते पाटील विरोधक म्हणून माळशिरस विधानसभेची निवडणूक लढवली.पंचायत समिती, जिल्हा परिषद, कृषी उत्पन्न बाजार समिती या निवडणुकांमध्येही मोहिते पाटील विरोधक म्हणून जानकर यांनी भूमिका बजावली आहे. दरम्यान माढा लोकसभा मतदारसंघातीतून भाजपने धैर्यशील मोहिते पाटील यांना तर उत्तम जानकर यांना सोलापुरातून उमेदवारी नाकारल्याने दोघेही भाजपमध्ये नाराज होते.

## जगातील सर्वांत कमी उंचीच्या महिलेने बजावला मतदानाचा हक्क

**मुंबई :**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी काल २१ राज्यांतील १०२ मतदारसंघांमध्ये मतदान प्रक्रिया पार पडली. यामध्ये महाराष्ट्रातील एकूण ५ मतदारसंघांचा समावेश होता. महाराष्ट्रातील नागपूरमध्ये काल लोकसभेसाठी मतदान पार पडले. जगातील सर्वात कमी उंचीची महिला ज्योती आमगेने नागपुरात मतदान केले. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नावाची नोंद झालेली ज्योतीने आपल्या कुटुंबीयांसोबत मतदानाचा हक्क बजावला. मतदान केल्यानंतर तिने नागरिकांनाही मतदान करण्याचे आवाहन केले. ज्योतीने जनतेला आवाहन करून मतदान करणे हे आपले कर्तव्य असल्याचं देखील सांगितलं.

मतदान करण्यासाठी ज्योती आमगे लाल रंगाच्या फ्रॉकमध्ये आली होती. मतदान करुन मतदान केंद्राबाहेर आल्यानंतर ज्योतीने आपल्या बोटावरील शाई दाखवत मीडियासमोर पोझ दिल्या. ज्योती किसनजी आमगेचा जन्म नागपूरमध्ये झाला. ज्योतीची उंची फक्त २ फूट आहे. तिचे वजन साडेपाच किलो इतकेच आहे. जगातील सर्वात कमी उंचीची महिला म्हणून तिची ओळख आहे. ज्योती आमगेच्या नावाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्यात आली आहे. तिने दोन वेळा विश्वविक्रम आपल्या नावावर केले आहेत.

ज्योती आमगेला कॉन्ड्रोप्लासिया नावाचा आजार झाला आहे. त्यामुळे एका विशिष्ट उंचीच्या पुढे तिची उंची वाढली नाही. कमी उंचीमुळे ज्योतीला खूप चिडवले गेले. पणनंतर ज्योतीला कमी उंचीमुळे खूप प्रसिद्धी मिळाली. ज्योती नागपूरमध्ये आपले आई, वडील, भाऊ आणि वहिनीसोबत राहते. ज्योतीने एका मुलाखतीमध्ये तिला लग्न करायचे नाही नसून अविवाहित राहायचे असल्याचे सांगितले होते.

ज्योती आमगेच्या आधी ब्रिजेट जॉर्डनने जगातील सर्वात कमी उंचीच्या महिलेचा मान पटकावला होता. २००९ मध्ये ज्योतीला जगातील सर्वात कमी उंचीची महिला ही पदवी मिळाली होती. ज्योती बिग बॉस सीझन ६ मध्ये दिसली होती. त्यानंतर ज्योतीला लोकांचे खूप प्रेम मिळाले. यासोबतच ती अमेरिकेत बनलेल्या प्रसिद्ध हॉरर स्टोरी 'फ्रीक शो'मध्येही दिसली आहे. ज्योती सध्या अभिनय आणि मॉडेलिंग करते.



उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



इगतपुरीला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांची पातळी घटली ▸▸ पान ३



www.gavakari.online ■ gavakari.in ■ gavkarinews.com

नाशिक, शनिवार, दि. २० एप्रिल २०२४

# 'सियावर रामचंद्र की जय'चा जयघोष

## ढोल-ताशांच्या गजरात श्रीराम व गरुड रथोत्सव उत्साहात



रथोत्सवात सहभागी झालेले लोकसभा उमेदवार राजाभाऊ वाजे.



रथोत्सवाचे सुरुवातीला पूजन करताना.



नाशिकचे खा. हेमंत गोडसे यांनी बालरामाला खांद्यावर उचलले.



रथोत्सवाच्या स्वागतासाठी रस्त्यांवर काढलेली रांगोळी.



नाशिक : श्रीराम व गरुड रथोत्सवाचे क्षणचित्र. (सर्व छायाचित्रे : रविकांत ताम्हणकर)

**पंचवटी : वार्ताहर**

नाशिकमधील सुमारे २५८ वर्षांची परंपरा असलेला पारंपरिक रामरथ यात्रेने शुक्रवार दि.१९ रोजी नाशिककरांच्या डोळ्यांची पारणे फिटले. सियावर रामचंद्र की जय... पवनसुत हनुमान की जय, जय सीता... राम सीता असा जयघोष करीत शेकडो वर्षांची परंपरा असलेली श्रीराम व गरुडरथ मिरवणूक रात्री उशिरापर्यंत रंगली. यामुळे शहरात उत्सवाचे वातावरण होते.

श्रीरामनवमी आणि त्यानंतर एकादशीस येणारा नाशिकचा ग्रामोत्सव चैत्र कामदा एकादशीस येणारा श्रीराम आणि गरुड रथोत्सव नाशिककरांसाठी मोठ्या श्रद्धेचा भाग आहे. शुक्रवार दि. १९ रोजी दुपारनंतर रथोत्सवाची जोरदार तयारी सुरू करण्यात आली. यंदाचे उत्सवाचे मानकरी असलेल्या राघवेंद्रबुवा पूजाधिकारी यांना पांढरा फेटा बांधण्यात आला. परंपरेनुसार असणारे मानकरी रवींद्र दीक्षित, नंदन दीक्षित यांना परंपरेनुसार असणारे मानकरी निमंत्रण देण्यात आले. प्रारंभी श्री काळाराम संस्थानचे अध्यक्ष न्यायाधीश मनीलकुमार लोकवाणी, यंदाचे उत्सव मानकरी राघवेंद्रबुवा पूजाधिकारी, संस्थानचे विश्वस्त मंदार जानोरकर, धनंजय पुजारी, मंगेश पुजारी, नरेश पुजारी, शांताराम अवसरे, शुभम मंत्री, डॉ. एकनाथ कुलकर्णी, अजय निकम यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीराम पंचायतनाची महापूजा करण्यात आली. पूजा झाल्यानंतर नारळ फोडून त्यानंतर आरती करून दास हनुमान मूर्ती मंदिराबाहेर काढण्यात आली. श्रीराम मूर्ती, चांदीच्या पादुका हातात घेऊन राघवेंद्रबुवा यांनी मंदिराला एक प्रदक्षिणा घालून मूर्ती चांदीच्या पालखीत ठेवली. त्यानंतर कहार मंडळींनी परंपरेनुसार पालखी पूर्व दरवाजाने गरुड रथापर्यंत आणली. त्या ठिकाणी पालखी येताच उपस्थित भाविकांनी श्रीरामाचा जयघोष केला. त्यानंतर महाआरती करून भोगमूर्ती श्रीराम रथामध्ये ठेवण्यात आल्या.

यावेळी रामरथ आणि गरुडरथ दोन्ही रथ समातंर उभे केले. आरतीनंतर गरुडरथ ७ वाजता तर रामरथ ७ वाजून २० मिनिटांनी पुढे निघाला. रथाच्या पुढे सनई चौघडा, ढोल-ताशांचे पथक होते तर मस्तकावर छत्री धारण केलेले यंदाचे मानकरी परंपरेनुसार रथाकडे तोंड करून उलट्या दिशेने मार्गक्रमण करत पुढे निघाले होते. यावेळी प्रभू रामचंद्रांच्या जयघोषाने अवघी पंचवटी रामनामात न्हाऊन निघाली होती. रथावर खा. हेमंत गोडसे, महाविकास आघाडीचे उमेदवार राजाभाऊ वाजे, आमदार ॲड. राहुल ढिकले, महंत सुधीरदास महाराज, माजी महापौर दशरथ पाटील, विनायक पांडे, कमलेश बोडके, लक्ष्मण सावजी, रमेश धोंगडे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, सहायक पोलीस आयुक्त डॉ. सीताराम कोल्हे, पंचवटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजेंद्र पाटील, वाहतूक शाखेचे वरिष्ठ निरीक्षक राकेश हांडे आदी उपस्थित होते. यावेळी माजी नगरसेवक, राजकीय पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते यांसह नाशिककर भाविकांनी रथाचे दर्शन घेण्यासाठी आणि रथ ओढण्यासाठी एकच गर्दी केली होती. यावेळी रथावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. रथासमोर भगवे ध्वज, पताकांसह सनई चौघडा, झांज, ढोल-ताशे वाजवून वातावरण भक्तिमय केले जात होते. तसेच ठिकठिकाणी फटाक्यांची आतषबाजी करून रथाचे स्वागत करण्यात येत होते. संपूर्ण रथ मार्गावर रांगोळ्या, ठिकठिकाणी भव्य कमानी उभारून परिसर मंगलमय करण्यात आला होता. रथमार्गावरील अनेक मंडळांनी महाप्रसादाचे आयोजन केले होते. संपूर्ण पंचवटी परिसर रामभक्तीने ओसंडून वाहत होता. कुठलीही दुर्घटना घडू नये यासाठी रथावरून नागरिकांना सूचनादेखील करण्यात येत होत्या. अनेक नागरिक हे आपल्या मोबाइल फोनमध्ये सेल्फी घेत व्हिडिओ आणि फोटो घेताना दिसत होते.

रथाच्या मार्गावर अनेक मंडळांनी स्वागत करण्यासाठी स्टेज उभारले होते. श्रीरामरथ जसजसा पुढे सरकत होता तसतशी गर्दीदेखील वाढत होती. रथाचे ठिकठिकाणी पूजन आणि आरती करण्यात येत होती. तसेच फुलांची उधळण केली जात होती. गरुडरथाचे रोकडोबा तालीम येथे आगमन झाल्यावर आरती करण्यात आली. त्यानंतर गरुडरथ शहराच्या दिशेने मार्गस्थ झाला तर श्रीरामरथ नदी पार करीत नसल्याने तो गौरी पटांगणात उभा राहिला. शहराची प्रदक्षिणा करून गरुडरथाचे गौरी पटांगणात आगमन झाले असता या ठिकाणी फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी करण्यात आली. दोन्ही रथांचे आगमन रामकुंड येथे झाल्यावर उत्सवमूर्तीची अमृत पूजा, पंचामृत अभ्यंगस्नान, अवभृत स्नान आणि महापूजा करण्यात आली. रथोत्सवासाठी काळाराम संस्थान, सरदार रास्ते आखाडा तालीम संघ, श्री अहिल्याराम व्यायामशाळा, रोकडोबा तालीम संघ, गुलालवाडी व्यायामशाळा, ओकाची तालीम संघ, मोहन मास्तर तालीम संघ, यशवंत व्यायामशाळेचे मलपटू आदी ठिकाणचे पहिलवान, पदाधिकारी, विश्वस्त आणि कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले. श्रीरामाचे दर्शन घेण्यासाठी वृद्ध यात्रेचा आनंद लुटण्यासाठी शहर परिसरातून लहान मुलांसह भाविकांनी विशेषतः महिला भाविकांनी गर्दी केली होती. दुपारपासूनच पंचवटीतील रस्ते भाविकांनी फुलून गेले होते. कापड बाजारात गरुडरथाचे आगमन होताच भांडी विक्रेत्यांनी घंटानाद केला.

### चोख बंदोबस्त

मिरवणूक मार्गावर पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी स्वतः जाऊन पाहणी केली तर उपायुक्त किरणकुमार चव्हाण, सहायक आयुक्त नितीन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पंचवटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड, वाहतूक शाखेचे वरिष्ठ निरीक्षक राकेश हांडे, ६ वरिष्ठ पोलीस निरीक्षक, १० सहायक पोलीस निरीक्षक, १५० पोलीस कर्मचारी, ३५ महिला पोलीस कर्मचारी, ६० होमगार्ड, राखीव दलाच्या दोन तुकड्या असा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

### रथावर राजकारण्यांची मांदियाळी

शहरातून निघणाऱ्या रामरथ व गरुडरथावर आरूढ होण्याची परंपरा यंदाही राजकारण्यांनी कायम ठेवली. लोकसभा निवडणूक असल्याने मिरवणुकीत राजकारण्यांची मोठी गर्दी झाली होती. विद्यमान खासदार हेमंत गोडसे, महाविकास आघाडीचे उमेदवार राजाभाऊ वाजे, आ. राहुल ढिकले, देवयानी फरांदे, माजी महापौर दशरथ पाटील, विनायक पांडे, रंजन ठाकरे, लक्ष्मण सावजी, बाळासाहेब पाठक, मनीष (शंभू) बागूल, मामा राजवाडे आदी रथावर आरूढ झाले होते. यावेळी गोडसे यांनी धनुष्यबाण घेतलेल्या एका मुलाला खांद्यावर उचलून घेत रामाचे धनुष्यबाण शिवसेना नाशकात कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला.

### गरुडरथाचे मार्गक्रमण

काळाराम मंदिर पूर्वदरवाजा नागचौक हत्ती पूल, जुना आडगाव नाका, गणेशवाडी, रोकडोबा मारुती, नेहरू चौक, वंदे मातरम् चौक, मेनरोड बोहोरपट्टी, सराफ बाजार, कापड बाजार, बालाजी कोट, कपूरथाळा मैदान, गाडगे महाराज पूल, म्हसोबा पटांगण, रामसेतू, सरदार चौक, अहिल्याराम व्यायाम शाळा, रामकुंड, अवभृत स्नान, पूजा विश्रांतीनंतर कपालेश्वर, मालविय चौक, शनिचौक, कार्तिकस्वामी उत्तर दरवाजा, काळाराम मंदिर असे होते.

---

# त्र्यंबकेश्वरमध्ये अन्न व औषध प्रशासनाचे छापे

## ५४ हजारांहून अधिक किमतीचा भेसळयुक्त मावा जप्त

**नाशिक : प्रतिनिधी**



त्र्यंबकेश्वर येथील मंदिराच्या आसपासच्या ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाने पेढा व स्पेशल बर्फी विक्रेत्यांकडे कारवाई केली. येथे भेसळयुक्त मावासदृश स्पेशल बर्फीपासून पेढा व कलाकंद बर्फी तयार करून विक्री होत असल्याचे आढळले. मे. भोलेनाथ स्वीटस्, मेनरोड, त्र्यंबकेश्वर येथून एकुण ७८ किलो कुंदा (लूज) किंमत ३७ हजार ४४० रुपये, नित्यानंद पेढा सेंटर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, त्र्यंबकेश्वर येथून स्वीट हलवा (शाम) २२ किलो किंमत ६ हजार ६०० रुपये तसेच हलवा (ग्वाल) १३ किलो किंमत ३ हजार ९०० रुपये, मे. भोलेहर प्रसाद पेढा प्रसाद भंडार, उत्तर दरवाजा, त्र्यंबकेश्वर येथून हलवा (ग्वाल) २२ किलो, किंमत ६ हजार ६०० रुपये असा एकूण किंमत ५४ हजार ४४० रुपयाचा कुंदा व हलवा या नावाने भेसळयुक्त पेढे व कलाकंद बर्फी तयार करण्यासाठी वापरात येणारा मावासदृश अन्नपदार्थाचा साठा जप्त केला. त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेच्या घंटागाडीमध्ये टाकून कचरा डेपोमध्ये नष्ट करण्यात आला आहे.

उन्हाळी सुट्यांच्या पार्श्वभूमीवर धार्मिक स्थळावर होणारी गर्दी लक्षात घेता भेसळयुक्त अन्नपदार्थांवर कार्यवाहीची मोहीम हाती घेतली आहे. अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी गोपाल कासार, योगेश देशमुख, प्रमोद पाटील अश्विनी पाटील यांनी अचानक छापे टाकून तपासणी केली असता या प्रकरणी घेतलेले नमुने अन्न विश्लेषकास पाठविण्यात येऊन अहवाल आल्यावर उल्लंघनाबाबत पुढील कार्यवाही घेण्यात येणार आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी गो. वि. कासार, योगेश देशमुख, पी. एस. पाटील, अ. उ. रासकर, ए. ए. पाटील, उ. रां. सूर्यवंशी, सा. सु. पटवर्धन, अन्न सुरक्षा अधिकारी धुळे कि. हि. बाविस्कर व अन्न सुरक्षा अधिकारी नंदुरबार आ. भा. पवार यांनी सहभाग घेतला. ही कारवाई सहआयुक्त सं. भा. नारागुडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहायक आयुक्त (अन्न) उ.सि. लोहकरे व म.मो. सानप यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

---

# गाडी लावण्याचा वाद हाणामारीतून चक्क विनयभंगापर्यंत

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

दुचाकी पुढे लावण्याच्या वादातून झालेल्या भांडणाचे पर्यवसान हाणामारीत आणि विनयभंगापर्यंत प्रकार अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला आहे. याप्रकरणी पीडित महिलेने अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, त्रिमूर्ती चौकानजीक असलेल्या शिवशक्ती चौकात एका महिलेसोबत त्याच परिसरात राहणाऱ्या मधुकर दराडे नामक व्यक्तीसोबत दुचाकी लावण्यावरून वाद झाला. त्यानंतर हा वाद हाणामारीतून चक्क विनयभंगापर्यंत गेला आहे. महिलेच्या घरात घुसून एकाने मारहाण करीत विनयभंग केल्याची घटना घडली. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मधुकर दराडे (रा. शिवशक्तीचौक, त्रिमूर्ती चौक) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. पीडितेच्या तक्रारीवरून गुरुवारी (दि.१८) ही घटना घडली. महिला घरात एकटी असताना संशयिताने घरात घुसून तिला शिवीगाळ व दमदाटी करीत मारहाण केली. या घटनेत महिलेचा विनयभंग करण्यात आला असून, अधिक तपास अंबड पोलीस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक उंडे करीत आहेत.

---

# वैभव देवरेने सावकारीत बळकावलेल्या संपत्तीचा शोध

## सटाणा, देवळ्यात पथक करणार तपास

**नाशिक : प्रतिनिधी**

खासगी सावकार वैभव देवरे याच्या काळ्या कारनाम्यांची लिस्ट समोर आल्यावर आता त्याने किती प्रॉपर्टी गिळली याचा तपास सुरू झाला आहे. त्याच्यावरील गुन्ह्यांची तीव्रता वाढली असून, त्या दृष्टीने तपास सुरू झाला आहे.

दरमहा दहा टक्के व्याजदराने कर्ज वाटप करून खासगी सावकार वैभव देवरे याने अव्वाच्या सव्वा दराने कर्जवसुली केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. कर्जदारांकडून १० पट अधिक वसुली केली. कर्जदारांच्या स्थावर मालमत्ता बळकावल्या. याप्रकरणी सुरुवातीस इंदिरानगर पोलिस ठाण्यात विजय खानकरी यांनी देवरेविरोधात खंडणीची फिर्याद दाखल केली. ३ लाख रुपयांचे कर्ज घेतल्यानंतर कर्जफेड करूनही वैभवने खानकरी यांना शिवीगाळ करीत १२ लाख रुपयांची मागणी केली. याप्रकरणी ११ एप्रिलपासून वैभव पोलिस कोठडीत असून, सावकारी केल्याप्रकरणी वैभव विरोधात पाच गुन्हे दाखल आहेत. त्यात खंडणी मागणे, जबरी चोरी, विनयभंग, खासगी सावकारी प्रकरणी कलम लावण्यात आले आहेत. संशयितांमध्ये वैभवसह त्याची पत्नी व सासरचे नातलग व मित्रांचा समावेश आहे. त्याने कर्जदारांच्या स्थावर मालमत्ता स्वत:सह इतरांच्या नावावर केल्याचे आढळून आले आहे. दरम्यान, या गुन्ह्याचा तपास खंडणीविरोधी पथकाकडून होत असून, त्याची बँक खाते गोठविण्यात आले आहेत. यासह त्याने कुणाला



पैसे दिले, कुणामार्फत घेतले याचा तपास सुरु आहे. यांसह जिल्हा उपनिबंधकांकडे वैभवसह संशयितांच्या नावावर असलेल्या स्थावर मालमत्तांची माहिती घेतली जात आहे. याआधीच वैभवच्या १५ बँक खात्यात आढळून आलेले २० लाख रुपये पोलिसांनी गोठवले आहेत. खंडणीविरोधी पथक आता नाशिक-सटाणा-देवळा असा प्रवास करून तपास करणार आहे.

---

# नाशिक शहरावर पाणीसंकट

## मनपाचा चर करण्याचा प्रस्ताव शासनाला मिळालाच नाही

**नाशिक : प्रतिनिधी**

मराठवाड्याची तहान भागविण्यासाठी गंगापूर व दारणा समूहातून तीन टीएमसी पाणी जायकवाडीला सोडण्यात आले. परिणामी मनपाने मागणी केलेल्या पाणी आरक्षणात मोठी कपात करण्यात आली. दरम्यान, मनपा प्रशासनाने चर खोदणे सर्वेक्षणासाठी दोन आठवड्यांपूर्वी पाठवलेला प्रस्ताव प्राप्त झाला नसल्याचा दावा शासनाच्या नगरविकास विभागाने केला आहे. त्यामुळे मनपा प्रशासनाला घाम फुटला असून, स्वतः अतिरिक्त आयुक्त याबाबत मंत्रालयात पाठपुरावा करणार आहेत. तसेच पुन्हा नवा प्रस्ताव नगरविकासला पाठवण्याची तयारी सुरू आहे.



आचारसंहिता असल्याने महापालिका प्रशासनाने चर खोदणे सर्वेक्षण परवानगीसाठी शासनाच्या नगरविकास विभागाला पत्र पाठवले. तसेच मेलही केला. पिण्याच्या पाण्याशी निगडित हा विषय असल्याने त्यास तत्काळ मंजुरी मिळेल, अशी मनपाची अपेक्षा होती. मात्र दोन आठवडे लोटले तरी परवानगी प्राप्त न झाल्याने मनपा प्रशासनाने नगरविकास विभागाशी संपर्क साधला. तेव्हा तुमचे पत्र व मेल मिळाले नसल्याचा दावा त्यांनी केला. या उत्तरामुळे मनपाची धांदल उडाली. चर सर्वेक्षणाला उशीर झाला तर पुढे चर खोदण्यास विलंब होईल व नाशिककरांवर पाणी कपात लागू करावी लागेल. यामुळे मनपा प्रशासनाची धाकधुक वाढली असून, नव्याने पत्रव्यवहार केला जाणार आहे. ५३०० दलघफू पाणी मंजूर करण्यात आले. येत्या ३१ जुलैपर्यंत शहराची तहान भागविण्यासाठी जलसंपदाने गंगापूर धरणातील ६०० दलघफू मृतजलसाठा उचलण्यास मंजुरी दिली आहे. मात्र धरणाची पातळी ५९८ मीटरच्या खाली गेल्यास धरणाच्या मध्य भागातून जॅकवेलपर्यंत पाणी आणण्यासाठी चर (इंटेक वेल) खोदावी लागणार आहे. उन्हाच्या वाढत्या झळांसोबतच नाशिककरांवर पाणी कपातीची टांगती तलवार लटकत आहे

> ❛ मनपाने शासनाकडे चर खोदणे सर्वेक्षणासाठी मंजुरी मिळण्यासाठी प्रस्ताव पाठवला, मात्र शासनाला मिळाला नाही. त्यामुळे या प्रकरणात अतिरिक्त आयुक्त पाठपुरावा करणार आहे.
>
> **- संजय अग्रवाल,**
> अधीक्षक अभियंता, मनपा



■ अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये जागतिक यकृत दिन साजरा ▶▶ पान ३

# नाशिक आज गांवकरी



■ शेअर बाजारात पडझड, सेन्सेक्स-निफ्टीची नकारात्मक सुरुवात ▶▶ पान ३

■ gavkarinews.com ■ नाशिक, शनिवार, दि. २० एप्रिल २०२४


# शहरात होणार शिवारनिहाय मॅपिंग

## महापालिकेचे उत्पन्न वाढणार; ड्रोनद्वारे सर्वेक्षण पूर्ण

**नाशिक : प्रतिनिधी**

**शहरातील सर्वच मालमत्तांची माहिती गोळा करण्यात येत आहे. यामध्ये प्रत्येक इमारतीला एक युनिक क्रमांक मिळणार आहे. तो क्रमांक संगणकात टाकल्यावर त्याची संपूर्ण माहिती मिळणार आहे. त्याचा फायदा मनपाला होऊन मनपाच्या उत्पन्नात वाढ होणार आहे. तसेच शहरात शिवारनिहाय मॅपिंगचे काम सुरू केले जाणार आहे.**

राज्य शासनाने २०१९ पासून सर्व महापालिकांना शहर विकास आराखडा तयार करताना जीआयएस (जिओग्राफिकल मॅपिंग सिस्टिम) मॅपिंग करणे बंधनकारक केले आहे. शासनाच्या सूचनेनुसार महापालिकेने भौगोलिक माहिती प्रणालीच्या आधारे शहरातील रस्त्यांचे जमीन योजना प्रमाणीकृत करण्याचा निर्णय घेतला.

त्यासाठी एका खासगी संस्थेला काम देण्यात आले. कंपनीने शहराच्या कानाकोपऱ्याचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण पूर्ण केले असून, आता प्रत्यक्ष जागेवर जाऊन सर्व्हे करण्यात येत आहे. मागच्या आठवड्यापासून या कामाला सुरुवात झाली असून, पुढील सुमारे चार महिने तरी हे काम चालणार आहे. या सर्वेक्षणात प्रत्येक मालमत्तेची माहिती गोळा होणार असल्याचे नगररचना विभागाकडून त्याची उलट तपासणी होऊन त्याला किती स्क्वेअर फुटाच्या बांधकामाची परवानगी दिली होती व प्रत्यक्षात किती बांधकाम झाले, याची चौकशी देखील होणार आहे. त्यामुळे शहरातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण, शासकीय जागांवर घेतलेला ताबा आदींची माहिती मनपाला मिळणार आहे.



त्यावर दंडात्मक कारवाईदेखील होणार आहे. त्याचप्रमाणे शहरात महापालिकेच्या मालकीच्या असलेल्या मिळकतींची सध्याची माहिती, मिळकतींचे स्वरूप, ताबा, करार यासह मिळकतीचा संपूर्ण इतिहासदेखील एका क्लिकवर मिळणार आहे. त्यासाठीची मनपाच्या नगररचना विभागाने संपूर्ण शहराचे खासगी कंपनीद्वारे जिओग्राफिकल मॅपिंगचा आधार घेतला आहे.

### प्रत्यक्ष जागेवर जाऊन मॅपिंग

नाशिक शहरातील मालमत्तांची माहिती एका क्लिकवर मिळणार असून, त्यासाठी ड्रोन सर्व्हे पूर्ण होऊन आता प्रत्यक्ष जागेवर जाऊन मॅपिंगचे काम सुरू झाले आहे. शहरात एकूण २५ शिवार आहे. त्यामुळे शिवारनिहाय कामाला सुरुवात होऊन सध्या मखमलाबाद व आगरटाकळी येथे दोन पथके काम करीत आहे.

शहरातील अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण याची माहिती आता एकाच क्लिकवर मिळणार आहे. यासाठी शहरात सर्व्हे केला जाणार आहे. यामुळे संबंधितावर कारवाई करणे सोपे होणार आहे.

- **हर्षल बाविस्कर,** संचालक, नगररचना



# सुभाषरोड परिसरात दूषित पाणी; नागरिकांचा ठिय्या

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

वारंवार तक्रार करूनही नाशिकरोडच्या बर्मा शीलवाडी, पवारवाडी, सुभाषरोड भागात अनेक दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांनी नाशिकरोड महापालिका विभागीय कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. वारंवार तक्रार करूनही पाणीपुरवठा अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करत महिलांनी विभागीय अधिकाऱ्यांना जाब विचारला.

दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, नागरिक आजारी पडत आहेत. दोन दिवसांत दूषित पाणीपुरवठा बंद होऊन शुद्ध पाणी न आल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा नागरिकांनी दिला. संबंधित विभागाच्या काही अधिकाऱ्यांनी नागरिकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला; परंतु महिला आक्रमक असल्याने त्यांनी विभागीय अधिकारी व पाणीपुरवठा विभागाला धारेवर धरले. रागिनी जाधव, प्रशांत क्षीरसागर, शोभा गायकवाड, ताराबाई साळवे, रत्ना चव्हाण, नम्रता क्षीरसागर, पूजा ढेगळे, अंजना पवार, मीना भडांगे, अनुराधा साळवे, अनिता भडांगे, स्वाती भडांगे, पुष्पा वानखेडे, सुलोचना उनवणे, मीना उबाळे, पुष्पा ढेगळे, वंदना उनवणे, प्रियंका पवार, सुनिता गांगुर्डे, अनिता भडांगे, कविता भडांगे, रंजना गवारे, चिरंजीव भालेराव, सुनील वानखेडे, वैभव भोटे, मीना उबाळे उपस्थित होते.

## महत्त्वाचे



### एनएमएमएस परीक्षेत मराठा हायस्कूलचे यश

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांच्यामार्फत २४ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या एनएमएमएस परीक्षेत मराठा हायस्कूलचे ६१ विद्यार्थी पास झाले असून, १६ विद्यार्थी केंद्र शासनाच्या इयत्ता ९ वी ते १२ पर्यंत १२००० रुपये शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेले आहे. यात मधुरा आडके (१२४ गुण), वैष्णवी शिंदे (१२२ गुण ), कार्तिकी निकम (११५ गुण ), रुद्र बच्छाव (११२ गुण), गौरी खुटे (१११ गुण ) या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. या यशाबद्दल मविप्र समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, नाशिक शहर तालुका संचालक ॲड. लक्ष्मणराव लांडगे, नाशिक ग्रामीणचे तालुका संचालक रमेश पिंगळे, चांदवड तालुका संचालक डॉ. सयाजीराव गायकवाड, प्रा. डॉ. भास्कर ढोके, शिक्षणाधिकारी प्रा. डॉ. अशोक पिंगळे, प्रा. डॉ. दौलत जाधव, आदींनी अभिनंदन केले आहे.

### ट्रस्ट प्रॅक्टिशनर्स असोसिएशनतर्फे विश्वस्त कार्यशाळा उत्साहात

**वडाळागाव : प्रतिनिधी**

ट्रस्ट प्रॅक्टिशनर्स असोसिएशन नाशिक यांच्या



वतीने एकदिवसीय विश्वस्त कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. धर्मादाय आयुक्त अमोघ कलोती, सहआयुक्त धर्मादाय कार्यालयातील न्यायिक अधिकारी टी. एस. अकाली, विवेक सोनुने, महावीर जोगी आदींच्या उपस्थितीत कार्यशाळा पार पाडली. कार्यक्रमात वक्फ मिळकत बचाव फाउंडेशन नाशिकचे ॲड. वसीम सय्यद व वक्फ मंडल औरंगाबाद पॅनलचे ॲड. फजल सय्यद यांनी धर्मादाय आयुक्त अमोघ कलोती यांचा सत्कार करून स्वागत केले. कार्यशाळेत नाशिक बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे, ॲड. अनिल गायकवाड, ॲड. एस. ए. सय्यद, ॲड. भाऊसाहेब गंभीरे आदींसह ट्रस्ट प्रॅक्टिशनर्स असोसिएशन नाशिकचे पदाधिकारी उपस्थित होते.

### मुंबई नाका पोलीस स्टेशन समोरच दोन गटांत हाणामारी

वडाळा गाव : पोलीस स्टेशन समोर दोन गट एकमेकांमध्ये भिडल्याने तुंबळ हाणामारी झाली. पोलीसांनी वेळीच धाव घेतल्याने अनर्थ टळला असून, याप्रकरणी मुंबईनाका पोलीस ठाण्यात एकमेकांमध्ये झुंज करतांना मिळून आलेल्या नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साहिल अस्लम पठाण, इम्रान अस्लाम पठाण (रा. दोघे वडाळागाव), दानिश खान मुस्ताक (रा. बागवानपुरा),सैजाद मेमुद काजी (रा. गंजमाळ),जुनैद खाजा मोंडे(रा. वडाळागाव),मुस्तफा अकउद्दीन बोहरी (रा. टाकळीरोड),अक्रम शमीम पठाण (रा. वडाळागाव),मोहम्मद रमीजएम खान (रा. बागवानपुरा) व हुसेन खुदबुद्दीन टिनवाला (रा. टाकळीरोड) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहे. संशयित बुधवारी (दि.१७) मुंबईनाका पोलीस ठाण्यात समोर अज्ञात कारणातून एकमेकांना झटापट करतांना मिळून आले. अंमलदार बोरसे यांनी फिर्याद दिली आहे. अधिक तपास जमादार शेख करीत आहेत.

### 'फ्रोझन शोल्डर चिकित्सा शिबिर'

**नाशिक : प्रतिनिधी**

आयुर्वेद सेवा संघ शतक महोत्सवानिमित्त आरोग्यशाळा रुग्णालय, गणेशवाडी, पंचवटी, नाशिक येथे दिनांक २२ एप्रिल ते २३ एप्रिल २०२४ या कालावधीमध्ये 'फ्रोझन शोल्डर चिकित्सा शिबिर' आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये खांदे दुखणे व जखडणे विकार या आजारांनी ग्रस्त रुग्णांनी पंचकर्म विभाग ओ. पी.डी. नं. २० येथे नाव नोंदणी, पुढील मार्गदर्शन व सल्ला सकाळी ९.३० ते संध्याकाळी ४.३० या वेळेमध्ये देण्यात येईल. तरी वरील लक्षणे असणाऱ्या रुग्णांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य वैद्य विनय सोनांबेकर, अधीक्षक वैद्य पंकज दीक्षित, विभागप्रमुख वैद्य सविता कुलकर्णी यांनी केली आहे.




# आनंदाने जगणे हा मानवाचा स्थायीभाव : महाजन

**नाशिक : प्रतिनिधी**

आनंदाने जगता येणे हा मानवाचा स्थायीभाव आहे. त्यामुळे आनंदप्राप्तीसाठी विनोद हा खूप महत्त्वाचा असतो. मुळात आपण दुःख कुरवाळण्यासाठी जन्माला आलेलोच नाही. तर आनंदात जगण्यासाठी जन्मलो आहोत, असे उद्‌गार ज्येष्ठ विनोदी लेखक आणि कवी नरेश महाजन यांनी काढले.

येथील गिरणा गौरव प्रतिष्ठानतर्फे सुरू असलेल्या 'पुस्तकावर बोलू काही' या उपक्रमात 'भलतं-सलतं' या साहित्यकृतीवर त्यांनी हुतात्मा स्मारकात संवाद साधला. सेवानिवृत्त मुख्याध्यापक अनिल खालकर अध्यक्षस्थानी होते.

महाजन पुढे म्हणाले की, गंभीरपणे जगलो की, लोक आपल्याला सभ्य समजतात. या विचारांतून आपण फार गंभीरपणे जगत असतो. वास्तविक त्याची काहीच गरज नसते. तुमचा भोवताल कसा आहे, त्यावर तुमचे व्यक्तिमत्त्व घडत असते. सुदृढ राहण्यासाठी मनमोकळं जगलो पाहिजे. आनंदी राहण्यासारखा उत्तम व्यायाम दुसरा नाही. सूक्ष्म विचार केल्यास आपण जेव्हा रडतो, त्यातूनसुद्धा आपल्याला आनंदच मिळवायचा असतो. याच विचारातून मी नेहमीच विनोदी लिहीत आलो असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले की, दुःख कवटाळण्यापेक्षा आनंदात जगता आले पाहिजे. त्यासाठी त्यांनी कोरोनाचे उदाहरण दिले. तसेच आपल्या काही वात्रटिकाही सादर केल्या. प्राचार्य यू. के. अहिरे आणि ज्येष्ठ साहित्यिक तु. सी. ढिकले या भाग्यवान श्रोत्यांना ग्रंथभेट देण्यात आली. सूत्रसंचालन मुक्ता चिंधडे यांनी केले, तर आभार रविकांत शार्दूल यांनी मानले. दरम्यान, या उपक्रमात येत्या मंगळवारी (दि.२३) ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक पुंजाजी मालुंजकर हे 'समर्पण' या साहित्यकृतीवर आपले विचार मांडणार आहेत.

# मनपासमोर भाजीविक्रेत्यांनी फेकला भाजीपाला

## अतिक्रमण निर्मूलन विभागाची कारवाई थांबवण्यासाठी आंदोलन

**नाशिक : प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळाचे सावट असून, अशा बिकट परिस्थितीत शेतकरी व शेतमाल विकणाऱ्या भाजीविक्रेत्यांवर महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाकडून अन्यायकारक कारवाई होत आहे. याविरोधात भाजीविक्रेता संघटनेने संताप व्यक्त करत मनपाच्या प्रवेशद्वारावर भाजीपाला फेकत निषेध नोंदवला.

दरम्यान सिडको, सातपूर, पंचवटी, नाशिकरोड या ठिकाणी भाजीविक्रेते याला हक्काचा व्यवसाय करण्यासाठी हॉकर्स झोन जागा मिळत नाही. तोपर्यंत अतिक्रमण विभागाने कारवाई थांबवावी, अशी मागणी संघटनेने केली. महापालिका अतिक्रमण विभागाकडून शहरातील भाजीविक्रेत्यांवर अन्याय होत असून, त्यांच्या रोजीरोटीवर बुलडोझर चालवले जात असल्याचा आरोप करत विक्रेत्यांनी मनपाच्या प्रवेशद्वारावर भाजीपाला टाकत निषेध नोंदवला. आम्हाला फेरीवाला झोनमध्ये स्थान देऊन अन्यायकारक कारवाई थांबवा, अन्यथा विष प्राशन करू, असा इशारा नवसंघर्ष संघटनेने निवेदनाद्वारे मनपा प्रशासनाला दिला. यावेळी संघटना अध्यक्ष समाधान अहिरे, नितीन मुर्तडक, सुरेश टर्ले, राजू घोरपडे, सतीश बनसोडे, संपत पाटील, सविता कराळे, मारुती वऱ्हाळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# निवडणुकीतून भुजबळ यांची माघार; येवल्यात जल्लोष

**येवला : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी मतदानाची प्रक्रिया सुरू असताना राज्याचे अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तथा येवल्याचे आमदार छगन भुजबळ यांनी नाशिक लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीतून उमेदवारी न करण्याचा निर्णय घेत माघार घेतल्याने येवला शहरातील संपर्क कार्यालयासमोर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करीत एकमेकांना पेढे भरून आनंद व्यक्त केला.

मंत्री छगन भुजबळ यांनी येवल्यातून उमेदवारी करावी म्हणून असा कार्यकर्त्यांचा आग्रह आहे. नाशिक लोकसभा निवडणुकीतून मंत्री भुजबळ यांनी माघार घेतल्याने कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष साहेबराव मढवई, संपर्क कार्यालयाचे बाळासाहेब लोखंडे, डॉ. चंद्रशेखर क्षत्रिय, नाना लोंढे, प्रसिद्धिप्रमुख संतोष खैरनार, ज्येष्ठ नेते विजय खैरनार, युवा नेते विकी बिवाल, महेश गादेकर, सचिन सोनवणे, नगरसेवक अमजद शेख, दीपक लोणारी, ज्येष्ठ नेते प्रवीण पहिलवान, गणेश गवळी, गणेश पंडित, मलिक मेंबर आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**येवला : नाशिक लोकसभा निवडणुकीतून मंत्री छगन भुजबळ यांनी माघार घेतल्याने येवल्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी जल्लोष साजरा केला. (छाया : विलास पगारे )**

# आ. देवयानी फरांदेंना धमकी देणाऱ्यावर कारवाई करा

## भाजपाचे पोलीस आयुक्त कर्णिक यांना निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**

**सोशल मीडियाच्या माध्यमातून आ. प्रा. देवयानी फरांदे यांना देण्यात येणाऱ्या धमक्या व जाहीर सभांतून करण्यात येत असणारी बदनामी थांबविण्यासाठी संबंधितांवर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन भाजपाच्या वतीने पोलीस आयुक्त यांना देण्यात आले.**

उपनगर भागात समाजकंटकांनी दि. ३ एप्रिल २०२४ रोजी धुमाकूळ घातला होता. विविध प्रकारच्या घोषणा देऊन सामाजिक वातावरण बिघडवून अनेक सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान करण्यात आलेले होते.

या समाजकंटकांवर कारवाई करण्याची मागणी आ. प्रा. देवयानी फरांदे यांनी केलेली होती. या समाजकंटकांवर कारवाई करण्याची मागणी केल्यानंतर सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली जात आहे. यावेळी आ.प्रा. देवयानी फरांदे यांना समाजमाध्यमातून धमकी देणाऱ्या व्यक्तींवर सक्त कारवाई करण्यात यावी व आ.प्रा. देवयानी फरांदे यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात यावी, अशी मागणी यावेळी विजय साने व शिष्टमंडळाने केली.



यावेळी भाजपा शिष्टमंडळामध्ये ज्येष्ठ नेते विजय साने, सुनील देसाई, वसंत उशीर, भास्कर घोडेकर, भगवान काकड, संध्याताई कुलकर्णी, ॲड. अजिंक्य साने, अमोल गांगुर्डे, मिलिंद भालेराव, चंद्रकांत थोरात, दीपाली कुलकर्णी, सचिन कुलकर्णी, यशवंत निकुळे, ॲड. श्याम बडोदे, बापू सोनवणे, अनिल ताजनपुरे, उदय जोशी, जितेंद्र चोरडिया, बबलू परदेशी, राम बडोदे, स्वाती भामरे, सुनील खोडे, गोपी राजपूत, अवधूत कुलकर्णी, शिवा जाधव, नितीन ठाकरे, संकेत खोडे, विजय गायखे, मुफद्दल पेंटर, ऋषिकेश शिरसाट, सागर शेलार, रवी पाटील, विजय बनसोडे, अमोल पाटील, सोनाली कुलकर्णी, अतुल क्षीरसागर, पार्थ मानकर, विनायक कस्तुरे, अनिता भामरे, नंदकिशोर भावसार, तेजश्री काठे, सुमन विश्वकर्मा, महेश भामरे, महेश सदावर्ते, प्रसाद धोपावकर, राजु धामणे, मीनल भोसले, संगीता जाधव, अमित धामणे, मोहन गायधणी, प्रतीक शुक्ल, सचिन मोरे, नंदू देसाई, नंदू कहार, दत्ता शिंदे, येवले, बेग ताई, अक्षय गांगुर्डे, शरद लोहार, विक्रांत गांगुर्डे आदींसह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# भुजबळ स्वयंचित



क्रिकेटमध्ये फलंदाजी फलंदाजाच्या बॅटचा यष्टीला स्पर्श झाला. किंवा फलंदाजाच्या शरीराचा यष्टीला स्पर्श झाला, तर फलंदाजाला स्वयंचित म्हणून घोषित केले जाते. इतकेच नव्हे, तर फलंदाजाची टोपी, हेल्मेट यष्टीवर फलंदाजी करताना पडले, तरी त्याला स्वयंचित केले जाते. लोकसभेच्या रिंगणातून बिनशर्त माघार घेऊन छगन भुजबळ स्वयंचित झाले आहेत. या मतदारसंघात शिवसेनेचे हेमंत गोडसे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे छगन भुजबळ यांच्यात उमेदवारीसाठी गेल्या १५ दिवसांत जबरदस्त चुरस पाहायला मिळत होती. दिल्लीहून सिग्नल मिळाल्यानंतर भुजबळ कामाला लागले होते, तर दुसरीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना साकडे घालण्यासाठी गोडसेंच्या ठाणे वाऱ्या वाढल्या होत्या. महायुतीची उमेदवारी जाहीर होत नसताना भुजबळ यांनी रामनवमीच्या दिवशी काळाराम मंदिरात दर्शन घेतले. त्याचवेळी गोडसेही तेथे अवतरले. गोडसे यांनी भुजबळांचे पाय धरुन आशीर्वाद मागितले. त्यानंतर महायुतीची उमेदवारी निदान मतदानाच्या आधी म्हणजे १२ मेपर्यंत, तरी जाहीर करावी, असे ते संतापाने म्हणाले होते. गोडसेंना उमेदवारी मिळाली, तर त्यांचा प्रचार करणार, अशी स्पष्ट भूमिका भुजबळ यांनी घेतली होती, तर भुजबळांना उमेदवारी मिळाली, तर त्यांचा प्रचार करणार, अशी भूमिका गोडसे यांनी घेतली होती. उमेदवारीसाठी नाव चर्चेत येऊन १५ दिवस होऊनही निर्णय होत नसल्याने भुजबळ यांनी यष्टीवर बॅट मारुन रिंगणातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. याआधीच त्यांनी आपल्या आपल्या हालचाली मंद करुन उमेदवारी मिळण्याची आशा सोडून दिली होती. भुजबळ यांच्यावर ही वेळ का आली आणि कोणी आणली? उमेदवारीसाठी गोडसे संघर्ष करत असताना अचानक ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला महायुतीत येण्याची शक्यता निर्माण झाली आणि भुजबळ यांचे नाव चर्चेत आले. साताऱ्याच्या जागेवर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा हक्क होता. पण, साताऱ्याची जागा भाजपाला उदयनराजे भोसले यांच्यासाठी हवी होती. त्या बदल्यात नाशिकची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला देण्याची तयारी भाजपाने केली होती. पण, तसे काही झाले नाही. भाजपाने साताऱ्याची जागा घेऊन उदयनराजे यांचे नाव जाहीरही केले. पण नाशिकची जागा शिवसेनेकडून घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसला मिळत नसल्याची चिन्हे दिसू लागताच भुजबळ यांनी बिनशर्त माघार घेतली असल्याचे दिसते. पण, त्यांना माघार का घ्यावी लागली? याचे उत्तर त्यांनीच मोदी, शहा, फडणवीस आणि अजित पवार यांचे नाव घेऊन अप्रत्यक्षरित्या शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिले. मूळात सुरुवातीला भुजबळ यांचे नाव चर्चेत नव्हतेच. पण, भाजपाने गोडसे यांच्या उमेदवारीला विरोध केल्यानंतर भाजपानेच भुजबळ यांचे नाव पुढे आणले. यामागे 'माधव' समीकरण असल्याचे बोलले जात होते. भुजबळ हे माळी असल्याने त्यांना नाशिकची उमेदवारी दिली, तर धनगर (महादेव जानकर-राष्ट्रीय समाज पार्टी-परभणी) वंजारी (पंकजा मुंडे-भाजपा-बीड) 'माधव' समीकरण मजबूत होणार होते. त्यासाठी दिल्लीहून भाजपाचे चाणक्य अमित शहा यांनी सूत्रे हलविली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीचा मेसेज भुजबळ यांना कळविला होता. भुजबळ यांनी पत्रकार परिषदेत हाच मुद्दा सांगितला. पण, उमेदवारी जाहीर होण्यासाठी कमालीचा उशीर होत असल्याने भुजबळ यांचा उत्साह मावळत गेला आणि त्यांनी उमेदवारीच्या स्पर्धेतून स्वतःला बाद करवून घेतले. यामुळे भाजपाचे 'माधव' समीकरण बिघडले आहे. पण, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी उशीर करुन भुजबळांना शर्यतीतून माघार घेण्यास भाग पाडले, असे एकंदरीत दिसत आहे. नाशिकच्या जागेसाठी दिल्ली पातळीवर हालचाली घडल्या. आपल्याला महायुतीच्या दिग्गजांकडून नाशिकच्या जागेसाठी आग्रह करण्यात आला असं छगन भुजबळ म्हणाले. चर्चेच्या बऱ्याच फेऱ्या झाल्यानंतरही उमेदवार अधिकृतपणे जाहीर झाला नाही. त्यामुळे मी माघार घेतली. हे असे भुजबळांचे पत्रकार परिषदेतील विधान बरेच काही सांगून जाणारे आहे. त्यांनी दिग्गजांची नावेही घेतली. आपले नाव पुढे कसे आले हेही भुजबळांनी सांगितले. होळीच्या दिवशी अजित पवार यांचा निरोप आला. त्यामुळे देवगिरी बंगल्यावर गेलो. तेथे अजित पवार, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे बसले होते. त्यावेळी त्यांनी ते म्हणाले, आम्ही आत्ताच सहा वाजता दिल्लीवरुन आलो. दिल्लीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस, अजित पवार यांच्यात बैठक पार पडली. अजित पवारांनी त्यावेळी ही भूमिका मांडली होती की, नाशिकमध्ये आमदार आमचे आहेत त्यामुळे लोकसभेची जागा मिळावी. त्यावेळी अमित शाह यांनी विचारलं तुमचा उमेदवार कोण असेल? तर अजित पवार म्हणाले समीर भुजबळ. पण, त्यांनी नाही सांगितले की, अमित शहा म्हणाले तिथे छगन भुजबळ उभे राहतील. असे कथन स्वतः भुजबळ यांनी केले. नाशिकच्या जागेवर एकनाथ शिंदे यांचा दावा असताना त्यांची समजूत काढण्याचा शब्दही अमित शहा यांनी दिला होता. दुसऱ्या दिवशी नेत्यांची भेट घेतली असता, तुम्हालाच (भुजबळ) लढायचे असल्याचे सांगण्यात आले, असेही कथन त्यांनी केले. इतके सारे ठरले असतानाही भुजबळ यांना माघार घ्यावी लागली, याचा अर्थ अमित शहा यांनाच भुजबळ यांचे नाव मागे घ्यावे लागले, असा अर्थ निघतो. महाराष्ट्रात राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बाबतीत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे काही उमेदवार ठरविण्याचा अधिकार भाजपाने आपल्याकडे घेतला, असे दिसून आले आहे. भुजबळांची उमेदवारी अमित शहा यांनी निश्चित करुनही त्यांच्यावर माघार घेण्याची नामुष्की आली. नाशिक, सातारा, पालघर, रत्नागिरी-सिंधुदुर्ग या जागावरुन महायुतीत धूसफूस वाढत होती. जागांची अदलाबदल करण्याची चर्चा होत होती. भाजपाने सातारा आणि रत्नागिरी-सिंधुदुर्ग हे दोन मतदारसंघ ताब्यात घेतले. आता ठाणे आणि पालघरही ताब्यात घेण्याचे प्रयत्न आहेत. नाशिक शिवसेनेला जाणार, असे जवळपास स्पष्ट झाले आहे. भुजबळांनी मैदान सोडल्याने गोडसे यांना आनंद झाला असला, तरी शिवसेनेने त्यांच्या नावाची घोषणा काल रात्री उशिरापर्यंत केलेली नव्हती. भुजबळ स्वयंचित होऊनही गोडसेंना प्रतिक्षाच करावी लागत आहे. भुजबळांनी माघार घेऊनही नाशिकचा जागेचा महायुतीत निर्णय लागलेला नाही. त्यासाठी आणखी थोडी प्रतिक्षा करणे क्रमप्राप्त आहे.

## विचारधन




### सत्समागम म्हणजे संत सांगतील त्याप्रमाणे वागणे

कोणत्याही मंगल कार्यात सर्वांआधी गणपतीचे आवाहन करतात आणि सगळे कार्य संपले की, सर्वांचे शेवटी त्याचे विसर्जन करतात. त्याप्रमाणे अनुसंधानानेच पोथीला सुरुवात करावी आणि अनुसंधानानेच पोथीची समाप्ती करावी. लौकिक कार्यामध्ये गणपतीचे विसर्जन झाल्यावर आपण शिल्लक उरतो, पण अनुसंधानाचे विसर्जन करताना आपणही त्यात नाहीसे व्हावे. जसे ठेवायचे असेल तसे ठेवा, पण आपला विसर पडू देऊ नका, एवढी भीक घालावी, अशी गुरूच्या चरणी प्रार्थना करावी. भगवंताला विसरून भजन करू नका. भगवंताची आठवण ठेवून भाजी जरी आणली तरी त्याचे श्रेय जास्त आहे. जगाच्या लाजेला भिऊन भगवंताला अंतर देऊ नये. 'मी कोण' याचा विचार करावा, आणि तो करण्यासाठी, 'मी नाही कोणाचा' हे बघावे. मी आप्तेष्टांचा, बायको-मुलांचा, आईबापांचा तर नाहीच, पण मी देहाचा आणि मनाचाही नाही; असे करता करता जो राहील तो मी. खरे समाधान एकपणात आहे, अद्वैतात आहे. म्हणून, द्वैताचा जनक जो अभिमान तो कमी कसा होईल हे बघावे. याकरिता, मी कर्ता नसून देव कर्ता आहे असे मानावे, सर्वांभूती भगवद्भाव पाहावा, सत्समागम करावा. म्हणजे सत्याचा समागम. सत्पुरुषाच्या वचनावर विश्वास ठेवून त्याप्रमाणे वृत्ती बनविणे हा खरा सत्समागम आहे. संतांवर अनन्य श्रद्धा ठेवा. त्यांच्या चालीने चाला. त्यांच्या समागमात दैन्य मानू नका. जे तुमची एकसारखी विषयातली नडच भागवतील ते संत नव्हेत. खरे संत विषयाची आसक्ती कमी करतात; अशा संताला शरण जावे. निर्विषय चित्त संतांनाच करता येते. संत हे ईश्वरदर्शनाची तळमळ उत्पन्न करतात. तळमळ उत्पन्न करून देणे हीच संतांची कामगिरी. संतांची भाषा तळमळीची असते, म्हणून ती तळमळ उत्पन्न करते. संत सांगतील त्याप्रमाणे वागावे. जग संतांशिवाय असणेच शक्य नाही. जे देहात दिसले पण वस्तुतः देहातीत राहिले ते संतच होत. आम्हांला त्यांना ओळखता येत नाही याला काय करावे ? नामाच्या योगानेच संत ओळखता येतात, जोडता येतात आणि टिकवता येतात. जो भगवंताचे नाम घेईल त्याला संत भेटेल, आणि तो त्याला भगवंताची प्राप्ती करून देईल. त्याचे कुठे अडणार नाही. पण जो नुसत्या शब्दज्ञानाच्या मागे लागेल त्याला आसक्ती सुटणार नाही, आणि त्याचे जीवन सार्थकी लागणार नाही.

# वर्धमानांचा ब्रह्मचर्य हा आवडता विषय!

**दिगंबरा परंपरेनुसार महावीर हे बाल ब्रह्मचारी होते. भगवान महावीरांना लग्न करायचे नव्हते, कारण ब्रह्मचर्य हा त्यांचा आवडता विषय होता. सुखांमध्ये रस नव्हता. पण त्याच्या आई-वडिलांना लग्न करायचे होते. दिगंबरा परंपरेनुसार त्यांनी नकार दिला.**



भगवान महावीर हे वीर, अतिवीर, सन्मती आणि वर्धमान म्हणूनही ओळखले जाणारे, जैन धर्माचे चोवीसावे तीर्थंकर होते. त्यांनी जैन धर्माचे पुनरुत्थान केले. त्यांनी पूर्व-वैदिक काळातील पूर्वीच्या तीर्थंकरांच्या आध्यात्मिक, दार्शनिक आणि नैतिक शिकवणींचा विस्तार केला. जैन परंपरेत असे मानले जाते की, ६व्या शतकाच्या पूर्वार्धात महावीरांचा जन्म आजच्या बिहार, भारतमधील कुंडलपूर येथे राजा सिद्धार्थ व राणी त्रिशलामाता यांच्या पोटी क्षत्रिय कुटुंबात झाला. वयाच्या ३०व्या वर्षी त्यांनी सर्व ऐहिक संपत्ती, संसार व राजपाट याचा त्याग केला. आध्यात्मिक जागृतीचा प्रसार व आत्मकल्याण करण्यासाठी जैन दीक्षा घेऊन ते एक तपस्वी बनले. महावीरांनी १२ वर्षांपर्यंत महान तप आणि आत्मध्यान केले. त्यानंतर त्यांनी केवलज्ञान-सर्वज्ञता प्राप्त केले. ३० वर्षे भारतभर त्यांनी जैन तत्त्वज्ञानाचा प्रचार केला आणि ६ वे शतक इ.स.पू.मध्ये मोक्षप्राप्ती- महावीरांचे ७२ वर्षांच्या वयात निर्वाण झाले. केवल ज्ञान प्राप्त केल्यानंतर महावीरांनी असे शिकवले की अहिंसा, सत्य, अस्तेय- चोरी न करणे, अपरिग्रह व ब्रह्मचर्य ही पंचमहाव्रते आध्यात्मिक मुक्तीसाठी आवश्यक आहेत. त्यांनी अनेकान्तवाद- अनेक बाजूंनी केलेले सापेक्ष कथन व स्याद्वाद यांचे सिद्धांत शिकवले. महावीरांची शिकवण इंद्रभूति गौतम- त्यांचे मुख्य शिष्य यांनी जैन आगम म्हणून संकलित केली. जैन आचार्यांनी प्रसारित केलेले ग्रंथ १९व्या शतकात- जेव्हा ते प्रथम लिहून ठेवले गेले होते. मोठ्या प्रमाणावर गमावले गेले आहेत. महावीरांनी शिकवलेल्या आगमाच्या उर्वरित आवृत्त्या काही जैन धर्माचे आधार ग्रंथ आहेत. भगवान महावीर ध्यानधारणेच्या अवस्थेत व सिंहांकित चिन्हासह अशा त्यांच्या मूर्ती भारतातील जैन तीर्थक्षेत्री आढळून येतात. चैत्र शुद्ध त्रयोदशी हा त्यांचा जन्मदिवस महावीर जयंती म्हणून साजरा केला जातो आणि त्यांचे निर्वाणपर्व जैन अनुयायी दीपावली म्हणून साजरे करतात.

दीप + आवली म्हणजे दिव्यांची (ज्ञानरूपी दिवा) आवली (माळ) अर्थात त्यांच्या उपदेशाने दिव्य अशा मोक्षप्राप्तीसाठी आवश्यक अशा ज्ञानाची परंपरा निर्माण झाली. तेव्हापासून ज्ञानांचे अखंड दिप तेवत राहोत अशा भावनेने दीपावली साजरी करण्याची प्रथा सुरू झाली. त्यांचे अंतिम निर्वाणस्थळ पावापुरी येथे आहे. भगवान महावीर यांचा जन्म चैत्र शुक्ल तेरस रोजी वैशाली प्रजासत्ताकातील कुंडग्राम येथे ५९९ वर्षांपूर्वी इक्ष्वाकू वंशातील क्षत्रिय राजा सिद्धार्थ आणि राणी त्रिशाला यांच्या पोटी झाला. धर्मग्रंथानुसार त्यांच्या जन्मानंतर राज्यातील प्रगतीमुळे त्यांचे नाव वर्धमान ठेवण्यात आले. जैन ग्रंथ उत्तर पुराणात वर्धमान, वीर, अतिवीर, महावीर आणि सन्मती अशा पाच नावांचा उल्लेख आहे. या सर्व नावांशी संबंधित एक कथा आहे. जैन ग्रंथानुसार २३वे तीर्थंकर पार्श्वनाथ यांना निर्वाण-मोक्ष मिळाल्यानंतर १८८ वर्षांनी त्यांचा जन्म झाला. दिगंबरा परंपरेनुसार महावीर हे बाल ब्रह्मचारी होते. भगवान महावीरांना लग्न करायचे नव्हते. कारण ब्रह्मचर्य हा त्यांचा आवडता विषय होता. त्याला सुखांमध्ये रस नव्हता. पण त्याच्या आई-वडिलांना लग्न करायचे होते. दिगंबरा परंपरेनुसार त्यांनी नकार दिला. भगवान महावीरांचा साधना कालावधी १२ वर्षांचा होता. ज्या श्वेतांबर पंथात साधू शुभ्र वस्त्रे परिधान करतात, त्यानुसार महावीर दीक्षा घेतल्यानंतर काही काळ नग्न राहिले आणि त्यांना दिगंबर अवस्थेतच ज्ञान प्राप्त झाले. त्यांच्या संपूर्ण साधना काळात महावीरांनी कठोर तपश्चर्या केली आणि मौन बाळगले. या वर्षांमध्ये त्याच्यावर अनेक उपसर्ग देखील होते, ज्याचा उल्लेख अनेक प्राचीन जैन ग्रंथांमध्ये आढळतो. जैन ग्रंथानुसार ज्ञानप्राप्तीनंतरच भगवान महावीरांनी उपदेश केला. त्यांचे ११ गंधर- मुख्य शिष्य होते. ज्यापैकी पहिली इंद्रभूती होती. जैन धर्मग्रंथ उत्तर पुराणानुसार महावीर स्वामींनी सात तत्त्वे, सहा पदार्थ, जग आणि मोक्षाची कारणे

**महावीर जयंती विशेष**

**श्रीकृष्णदास निरंकारी- बापू**

आणि त्यांची फळे यांचे वर्णन समवसरणात नया इत्यादीद्वारे केले होते.

भगवान महावीरांची शिकवण:

१) सत्य- सत्याबद्दल भगवान महावीर स्वामी म्हणतात, हे मानवा! तुम्ही सत्यालाच खरे सार मानता. जो ज्ञानी सत्याचे पालन करतो, तो मृत्यूला पोहतो आणि पार करतो. २) अहिंसा- या जगातील सर्व त्रस प्राण्यांची (एक, दोन, तीन, चार आणि पाच इंद्रिय) हिंसा करू नका, त्यांना त्यांच्या मार्गावर जाण्यापासून रोखू नका. त्यांच्याबद्दल आपल्या अंतःकरणात करुणेची भावना ठेवा. त्यांचे संरक्षण करा. हाच अहिंसेचा संदेश भगवान महावीर आपल्या शिकवणीतून देतात. ३) आचौर्य- दुसऱ्याच्या वस्तू न देता स्वीकारणे याला जैन ग्रंथात चोरी म्हणतात. ४) अपरिग्रह- भगवान महावीर स्वामीत्वावर म्हणतात, जो माणूस स्वतः सजीव किंवा निर्जीव वस्तू गोळा करतो, इतरांकडून असा संग्रह करतो किंवा इतरांना ते गोळा करण्याची परवानगी देतो, तो कधीही दुःखापासून मुक्त होऊ शकत नाही. हाच संदेश भगवान महावीरांना अपरिग्रहाद्वारे जगाला द्यायचा आहे. ५) ब्रह्मचर्य- महावीर स्वामी ब्रह्मचर्य बद्दल त्यांचे अत्यंत अमूल्य उपदेश देतात की ब्रह्मचर्य हे परिपूर्ण तपस्या, नियम, ज्ञान, तत्त्वज्ञान, चारित्र्य, संयम आणि नम्रता यांचे मूळ आहे. तपस्यामध्ये ब्रह्मचर्य हे श्रेष्ठ तप आहे. जे पुरुष स्त्रियांशी संबंध ठेवत नाहीत, ते मोक्षमार्गाकडे वाटचाल करतात. जैन ऋषी, आर्यिका त्यांचे पूर्ण पालन करतात, म्हणूनच त्यांचे महान व्रत आणि श्रावक, श्राविका एकाच देशात त्यांचे पालन करतात, म्हणून त्यांना अनुव्रत म्हणतात.

जैन ग्रंथांमध्ये दहा धर्मांचे वर्णन आहे. या दहा धर्मांचे दहा दिवस पर्युषण उत्सवात चिंतन केले जाते, ज्याला दहा चिन्हे देखील म्हणतात. क्षमेबद्दल भगवान महावीर म्हणतात- मी सर्व प्राणिमात्रांकडून क्षमा मागतो. मी जगातील सर्व प्राणिमात्रांशी मैत्रीपूर्ण आहे. माझे कोणाशीही वैर नाही. मी प्रामाणिक मनाने धर्मात स्थिर झालो आहे. सर्व प्राणिमात्रांना मी सर्व पापांची क्षमा मागतो. सर्व सजीवांनी माझ्याविरुद्ध केलेले अपराध मी क्षमा करतो. ते असेही म्हणतात, माझ्या मनात जी काही पापी वृत्ती मी संकल्पित केली आहे, जी काही पापी प्रवृत्ती मी शब्दांतून प्रकट केली आहे आणि माझ्या शरीरात जी काही पापी वृत्ती आहे, त्या सर्व पापी प्रवृत्तींचा नाश होऊ दे. माझी सर्व पापे खोटी होवोत. धर्म हा सर्वोत्तम चांगला आहे. धर्म म्हणजे अहिंसा, संयम आणि तप. महावीरजी म्हणतात, जो सद्गुरू आत्मा असतो, ज्याच्या मनात सदैव धर्म असतो, त्याला देवही नमस्कार करतात. भगवान महावीरांनी आपल्या प्रवचनात धर्म, सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह, क्षमा यांवर सर्वाधिक भर दिला. त्याग आणि संयम, प्रेम आणि करुणा, नम्रता आणि सदाचार हे त्यांच्या प्रवचनांचे सार होत. दुसऱ्या शतकातील प्रभावशाली दिगंबरा ऋषी आचार्य समंतभद्र यांनी तीर्थंकर महावीरांच्या तीर्थयात्रेला सर्वोदय म्हटले होते. सध्याच्या अशांत, दहशतवादी, भ्रष्ट आणि हिंसक वातावरणात महावीरांची अहिंसाच शांतता देऊ शकते. महावीरांची अहिंसा केवळ प्रत्यक्ष हत्येलाच हिंसा मानत नाही, तर मनात कोणाबद्दल वाईट विचार येणे हीसुद्धा हिंसा आहे. सध्याच्या युगात जोपर्यंत आर्थिक विषमता आहे तोपर्यंत समाजवाद ही प्रचलित घोषणा सार्थ ठरणार नाही. एकीकडे अमाप पैसा, दुसरीकडे टंचाई. ही विषमतेची पोकळी केवळ भगवान महावीरांचे अपरिग्रह तत्त्वच भरून काढू शकते. अपरिग्रहाचे तत्त्व कमी संसाधनांमध्ये अधिक समाधानावर भर देते. हे आवश्यकतेपेक्षा जास्त ठेवण्यास संमती देत नाही. त्यामुळे सर्वांना मिळेल आणि भरपूर मिळेल. निर्दोषतेच्या भावनेचा प्रचार आणि पालन केले की चोरी, लुटमारीची भीती राहणार नाही. संपूर्ण जगात मानसिक आणि आर्थिक शांतता प्रस्थापित होईल. चारित्र्य आणि संस्कृती नसताना साधे, साधे आणि सन्माननीय जीवन जगणे कठीण होईल. भगवान महावीरांनी आपल्याला फक्त अमृत कलशच सांगितलेला नाही, तर तो पिण्याची पद्धतही सांगितली आहे. इतक्या वर्षांनंतरही भगवान महावीरांच्या नावाचे स्मरण तितक्याच श्रद्धेने आणि भक्तीने केले जाते, याचे मूळ कारण म्हणजे महावीरांनी या जगाला मुक्तीचा संदेश तर दिलाच. शिवाय मुक्तीचा सोपा आणि खरा मार्गही सांगितला. भगवान महावीरांनी आध्यात्मिक आणि शाश्वत आनंद मिळविण्यासाठी अहिंसेचा धर्म उपदेश केला.भगवान महावीरांना जयंतीनिमित्त कोटी कोटी विनम्र दंडवत प्रणाम.

# सामाजिक विषवल्लींना ठेचायलाच हवे!



श्रीराम हे समस्त हिंदूंचे आराध्य दैवत आहे. नुकतीच श्रीरामनवमी भारतासह जगभरात ज्या ज्या ठिकाणी हिंदू आहेत त्या ठिकाणी उत्साहाने साजरी करण्यात आली. श्रीरामनवमीनिमित्त दरवर्षी श्रीरामाच्या प्रतिमेची मिरवणूक काढली जाते. यासाठी पोलीस प्रशासन तसेच रस्ते वाहतूक विभागाची रीतसर परवानगीही घेतली जाते. या मिरवणुकांत श्रीरामभक्त उत्साहाने सहभागी होतात. या मिरवणुकांमुळे रहदारीला अडथळा निर्माण होणार नाही तसेच कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबतही खबरदारी घेतली जाते. असे असताना दरवर्षी श्रीरामनवमीच्या दिवशी मिरवणुकांवर कुठेनाकुठे

**कटाक्ष**

**जगन घाणेकर**

**९६६४५५९७८०**

समाजकंटकांकडून आक्रमण केले जाते. यंदाही बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यातील बेलडांगा शहरातील शक्तीपूर येथे मशिदीजवळ रामनवमीची मिरवणूक आल्यानंतर समाजकंटकांकडून मिरवणुकीवर आक्रमण करण्यात आले. येथे छतांवरून दगडफेक करण्यात आली. गावठी बॉम्ब फोडण्यात आले. माणिक्याहार आणि मेदिनीपूरच्या इग्रा येथेही श्रीरामनवमी मिरवणुकीवर आक्रमण करण्यात आले. तिन्ही ठिकाणी झालेल्या हिंसाचारात १८ जण घायाळ झाले आहेत. ज्यामध्ये २ अल्पवयीन मुले, १ महिला आणि काही पोलीस कर्मचारी यांचा समावेश आहे. माणिक्याहार परिसरात या दरम्यान काही हिंदूंच्या घरांना लक्ष्य करून आगी लावण्यात आल्या. या परिसरात हिंदूंच्या उत्सवांवर आणि मिरवणुकांवर दरवर्षी अडथळे आणले जातात. असे असताना पोलीस प्रशासन पुरेशी खबरदारी का घेत नाही ? हिंदूंचे उत्सव आले की बंगालमध्ये कुठे ना कुठे हिंसाचार झाल्याच्या बातम्या वाचनात येतात. ही स्थिती पाहिल्यावर पश्चिम बंगाल नक्की भारताचा भाग आहे कि बांगलादेशचा असाही प्रश्न पडतो. भारतात पंथनिरपेक्ष लोकशाही राजवट आहे. त्यामुळे इथे समस्त पंथांचे लोक गुण्यागोविंदाने आणि आनंदाने नांदतात, त्यांचे सण-उत्सव उत्साहाने साजरे करतात. एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होतात. देशाच्या काही ठराविक भागांत मात्र दरवर्षी हिंदूंच्या सणांना जाणीवपूर्वक लक्ष करून जातीय सलोखा बिघडवण्याचे काम काही समाजद्रोही मंडळींकडून केले जाते. सामाजिक शांतता बिघडवणाऱ्या अशा विषवल्लींना वेळीच ठेचायला हवे!

# उत्क्रांतीवादाचा जनक : चार्ल्स डार्विन

उत्क्रांतीदाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा काल म्हणजे १९ एप्रिल रोजी स्मृतिदिन होता. चार्ल्स डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरीत्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला. त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती. तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासन्तास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ. ग्रांट यांच्याशी ओळख झाली. डॉ. ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीव शास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर

**कटाक्ष**

**श्याम ठाणेदार**

**९९२२५४६२९५**

आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र त्यांचे नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली. डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला. १९ एप्रिल १८८२ रोजी त्यांचे निधन झाले.

## जनमनाचे प्रतिध्वनी



### तापमान रोखा हिरवाई वाढवा!

नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक धरणे असूनही पावसाळ्यात पाऊस भरपूर पडो वा कमी पडो, धरणातील जलसाठा उन्हाळा सुरू होताच वाढत्या तापमानामुळे झपाट्याने कमी होत जातो. परिणामी, ग्रामीण विभागातील गावे, आदिवासी वाड्या, वस्त्या, दुर्गम भाग येथे उन्हाळ्यात पाणीटंचाई जाणवू लागते. आजमितीस जिल्ह्यातील पाणीटंचाईने बाधित अशा ७६३ गावे वाड्या-वस्त्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा होतो. हे प्रमाण चिंताग्रस्त आहे पुढे ते वाढू देखील शकते. काही शहरांतही पाणी टंचाईच्या झळा जाणवत आहे.नद्या व धरणे यांची पाणी साठवण क्षमता वाढविण्यासाठी पात्रातील गाळ काढणे, पावसाचे वाहून जाणारे पाणी अडविणे,नदीजोड प्रकल्प राबविणे व सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे वाढते तापमान रोखण्यासाठी अधिकाधिक हिरवाई निर्माण करणेही उपाययोजना आहे. हरित क्षेत्र विकासकामांसाठी दिवसागणिक कमी होत आहे हे पाणीटंचाईचे मूळ आहे.

**- विजय रघुनाथ भदाणे**

### मुलांचे सुट्टीत हस्ताक्षर सुधारावे



आजकाल मोबाइल व लॅपटॉपच्या दुनियेत मुलांच्या हस्ताक्षराकडे कोणाचेच लक्ष नाही. सुमारे तीस चाळीस वर्षांपूवी मुलांना शाळेत बोरू व वहीवर हस्ताक्षराचे धडे जिरवावे लागत. त्यासाठी शिक्षक मेहनत करीत असत. शाळेत हस्ताक्षर स्पर्धा असे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर चांगले असे. चांगल्या हस्ताक्षरामुळे पेपर तपासताना परीक्षकांना सोयीचे जाते व त्याला अधिक गुणसुद्धा मिळू शकतात. आता मुलांना उन्हाळ्याच्या सुट्या लागल्या आहेत. या सुट्टीत पालकांनी मुलांचे हस्ताक्षर सुधारण्याचा प्रयत्न करावा. मुलांना अक्षर घडविण्याचे प्रॅक्टिस सुलेखन वहीच्या सहाय्याने करावे. असे केल्यास सुट्टीत मुलांचे हस्ताक्षर सुधारण्यास मदत होईल. याशिवाय त्यांना हस्ताक्षराचे महत्त्व सुद्धा पटेल व भविष्यात ते अधिक चांगले लक्ष देऊ शकतील.

चांगले हस्ताक्षर हा एक दागिना आहे असे म्हटले जाते. त्याची जपणूक करणे हे विद्यार्थ्यांच्या बरोबर पालकांची सुद्धा जबाबदारी आहे. लेखक व पु. काळे, ग. दि. माडगूळकर यांची अक्षरे डौलदार असत व त्यामुळे पाहणारांचे त्याकडे लक्ष जात असे.

**- शांताराम वाघ, पुणे**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय :'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### सोन्याच्या दरात वाढ, चांदीही चकाकली

**मुंबई :** मागच्या दोन महिन्यांपासून सोनं-चांदीच्या दरात सातत्याने वाढ होताना दिसून येत आहे. लग्नसराईचा काळ असल्यामुळे खरेदीदारांचा अधिकचा कल हा धातुंच्या किमतीवर पाहायला मिळाला आहे. एप्रिल महिना सुरु झाल्यापासून सोन्याच्या दराने विक्रमी उच्चांक ओलांडला. पहिल्या पंधरा दिवसात सोन्याच्या भावात १५०० रुपयांनी वाढ झाली. गुढीपाडव्यापूर्वी सोन्याच्या दराने ७२ हजारांचा टप्पा ओलांडला होता तर दोन दिवसांपूर्वी सोनं ७५ हजारांवर येऊन ठेपले. जळगावसारख्या शहरात सराफ बाजारात सोन्याच्या भावात वाढ झाली आहे. २४ कॅरेटनुसार जीएसटीसह सोन्याचा भाव हा ७५ हजार ३६० रुपये तर चांदी ८६ हजार ५०० रुपये इतकी झाली आहे. सोन्या-चांदीच्या वाढत्या भावामुळे सराफ बाजारातील व्यापारांना टेन्शन आले. यामुळे आर्थिक फटक्यांचा सामना करावा लागत आहे. येत्या काही दिवसात भाव अजून वाढण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे.

### ‘ब्रिजस्टोन इंडिया’तर्फे टुरांझा लाँच

**नवी दिल्ली :** ‘ब्रिजस्टोन इंडिया’तर्फे आज प्रवासी वाहन विभागासाठी न्यू जनरेशन टायर ब्रिजस्टोन टुरांझा ६i लाँच करण्यात आले. टुरांझा ६ळ हा पॅसेंजर रेडियल बिझनेसमध्ये पूर्वी जाहीर केलेल्या विस्ताराचा परिणाम आहे. विशेषतः भारतीय रस्त्यांसाठी विकसित करण्यात आलेले हे टायर, उत्कृष्ट इंधन कार्यक्षमता आणि वेअर लाइफसह प्रीमियम कम्फर्ट राइड अनुभव प्रदान करतात. टायरमध्ये असणारी ही वैशिष्ट्ये या उत्पादनाला ब्रिजस्टोनच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेली एक उत्कृष्ट प्रीमियम ऑफर ठरते. ब्रिजस्टोन टुरांझा ६आय हे १४ इंच ते २० इंचापर्यंतच्या ३६ एसकेयू (स्टॉक कीपिंग युनिट्स) मध्ये उपलब्ध आहे. एसयूव्ही, सेदान, हॅचबॅक आणि सीयूव्ही यांचा समावेश असलेली गुणवत्तापूर्ण वाहने या टायरची लक्ष्य आहेत. या लॉन्चसह, ब्रिजस्टोनने आपले जागतिक मालकीचे ENLITEN तंत्रज्ञान भारतात आणले असून बाजारपेठेच्या वाढत्या नवीन गरजांनुसार एक अद्वितीय मूल्य प्रस्ताव उपलब्ध करून हटके कस्टमाइजेशन पर्याय सादर केला आहे. तसेच हे टायर भारतीय ग्राहकांच्या दृष्टीने आवश्यक असलेले मूलभूत कामगिरी मापदंड देखील वृद्धिंगत करतात. टुरांझा ६आय, ENLITEN तंत्रज्ञानासह, इंधन कार्यक्षमता आणि वियर लाइफ वाढविताना, एक गुळगुळीत आणि बऱ्यापैकी प्रवासाद्वारे सर्वोत्कृष्ट आरामदायी प्रवासाचा अनुभव प्रदान करते. यामुळे टुरांझा ६आय हे विवेकी वापरकर्त्यांसाठी रस्त्यावरील सर्वात आरामदायी आसन बनते.

### येस बँक घोटाळा प्रकरणात राणा कपूर यांना जामीन मंजूर

**मुंबई :** येस बँक घोटाळा प्रकरणातील मुख्य आरोपी राणा कपूर यांना विशेष न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. तब्बल चार वर्षांनी त्यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. राणा कपूर हे येस बँकेचे सह-संस्थापक आहेत. येस बँकेशी संबंधित असलेल्या ४६६ कोटी ५१ लाखांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणात राणा कपूर यांना अटक करण्यात आली होती. मात्र आत विशेष न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला असून ते आता लवकरच तुरुंगाबाहेर येणार आहेत. येस बँकेच्या ३ हजार ७०० कोटींच्या घोटाळ्याप्रकरणी सीबीआय आणि ईडीकडून तपास केला जात आहे. आर्थिक अनियमितता आणि वारेमाप बेहिशेबी कर्जवाटप यामुळे रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) येस बँकेवर ५ मार्च २०२१ पासून निर्बंध लागू केले होते. त्यानंतर टप्याटप्याने ते निर्बंध शिथिल केले गेले आणि येस बँकेचे सर्व व्यवहार पूर्ववत करण्यात आले. मात्र, बड्या उद्योगांना दिलेली अनेक कर्जे बुडीत खात्यात गेल्यानं बँकेची आर्थिक स्थिती अतिशय कमकुवत झाली आहे. हा घोटाळा उघड झाल्यानंतर येस बँकेचे संस्थापक राणा कपूर यांना अटक करण्यात आली होती. त्यानंतर त्यांची पत्नी बिंदूसह मुली रोशनी आणि राधा कपूर खन्ना यांनाही अटक करण्यात आली. मुंबई सत्र न्यायालयातील सीबीआयच्या विशेष न्यायालयानं १८ सप्टेंबर २०२१ रोजी त्यांचा जामीन अर्ज फेटाळून लावत त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडीत सुनावली.

# शेअर बाजारात पडझड, सेन्सेक्स-निफ्टीची नकारात्मक सुरुवात

**मुंबई :**

इस्रायल-इराण युद्धाचा परिणाम आशियातील शेअर बाजारावर काही प्रमाणात पाहायला मिळत आहे. सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये काल सकाळी बाजार सुरू होताच त्यात पडझड पाहायला मिळाली.

लोकसभा निवडणुकांचा पहिला टप्पा आजपासून सुरू होत आहे. देशात लोकसभा निवडणुका होत असताना दुसरीकडे इस्रायल-इराण युद्धाचे पडसाद भारतीय शेअर बाजावरही उमटले आहेत. सेन्सेक्स आणि निफ्टीची आज सकाळची सुरुवात पडझडीने झाली. बाजार सुरू होताच सेन्सेक्स ७१,९०० च्या खाली तर निफ्टी २१,९०० च्या खाली आला. बाजारात स्मॉल कॅप आणि मिड कॅप शेअर्समध्ये मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याचेही चित्र दिसले. निफ्टीमध्ये कोणत्याही क्षेत्राचा इंडेक्स आज हिरवा नाही. तर बीएसईमध्ये लिस्टेड असलेल्या कंपन्यांचे बाजारातील भांडवल सकाळी बाजार खुलताच ३.७१ लाख कोटींनी कमी झाल्याचे दिसले.

सध्या जागतिक पातळीवर घडत असलेल्या घडामोडींमुळे भांडवली बाजारात तणाव आहे. गेल्या काही दिवसांपासून भारतीय शेअर बाजार आणि मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात घसरण झाल्याचे पाहायला मिळतेय. या काळात गुंतवणूकदारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र सध्या ब्रोकरेज फर्म मोतीलाल ओस्वालने टाटा उद्योग समूहाच्या एका उद्योगात पैसे गुंतवण्याचा सल्ला दिला आहे. या उद्योगात शॉर्ट टर्मसाठी पैसे गुंतवल्यास चांगला परतावा मिळण्याचा अंदाज मोतीलाल ओस्वाल यांनी व्यक्त केलाय.



भांडवली बाजार चालू झाल्यानंतर प्रमुख निर्देशांकांत घसरण झाल्याचे पाहायला मिळाले. मात्र मोतीलाल ओस्वाल यांनी टाटाच्या ट्रेण्ट या रिटेल कंपनीत पैसे गुंतवण्याचा सल्ला दिला आहे. ट्रेण्टच्या स्टॉकमध्ये २ ते ३ दिवस गुंतवणूक केल्यास तुम्हाला चांगला परतावा मिळू शकतो, असे मोतीलाल ओस्वालचे म्हणणे आहे. ट्रेण्ट कंपनीच्या स्टॉकने गेल्या सहा महिन्यांत १०० टक्के रिटर्न्स दिले आहेत.

सकाळी बाजार उघडल्यानंतर बीएसई सेन्सेक्समध्ये ६०८.५० अंकाची (०.८४ टक्के) घसरण दिसली. तर अर्ध्या तासानंतर म्हणजे १० वाजण्याच्या सुमारास यात थोडी सुधारणा होऊन घसरण ३५० अंकापर्यंत (०.४८ टक्के) आली. तर निफ्टीमध्ये सकाळी बाजार उघडल्यानंतर १८२ अकांची घसरण पाहायला मिळाली. त्यामुळे निफ्टी निर्देशांक २२ हजारांच्या खाली आला. १० वाजण्याच्या सुमारस यात थोडी सुधारणा होऊन निफ्टी निर्देशांक २१,८७७ वर स्थिरावला.

**गुंतवणूकदारांच्या संपत्तीमध्ये ३.७१ लाख कोटींची घसरण**

१८ एप्रिल रोजी बाजार बंद होत असताना बीएसईमध्ये लिस्टेड असलेल्या कंपन्यांचे एकूण मूल्य ३,९२,८९,०४८.३१ कोटी एवढे होते. त्यात १९ एप्रिल रोजी ३.७१ लाख कोटींची घसरण होऊन हे मूल्य ३,८९,१७,४०८.५१ एवढे झाले.

**क्षेत्रीय निर्देशांकांची स्थिती काय**

एनएसईच्या २,२१४ शेअर्सपैकी ५३ शेअर्समध्ये लोअर सर्किटला आदळले, तर ४० शेअर्समध्ये अप्पर सर्किट दिसत असून, १५ शेअर्स नीचांकी किमतीवर घसरले आहेत. त्याचप्रमाणे बँक निफ्टी शुक्रवारी, जवळपास ३०० टक्क्यांनी घसरला, तर मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक १५० अंकांपर्यंत घसरले आहेत. याशिवाय आज निफ्टीच्या सर्व सेक्टरमध्ये मोठी घसरण झाली असून ऑटो ते आयटी, हेल्थकेअर आणि ऑइलपर्यंत १ टक्क्यांहून अधिक घसरण पाहायला मिळाली.

# लॅण्ड रोव्हरच्या कार स्वस्त होणार?

## टाटा मोटर्स मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत



**मुंबई :**

जग्वार लॅण्ड रोव्हरच्या गाड्या या नेहमीच चर्चेच्या विषय ठरतात. या कंपनीकडून तयार केल्या जाणाऱ्या या गाड्या आलिशान असतात. याच कारणामुळे लोक या कंपनीच्या गाड्या घेणं पसंद करतात. या गाड्यांची निर्मिती भारतात होत नसल्यामुळे त्या चांगल्याच महाग असतात. मात्र सध्या या गाड्यांची भारतातील किंमत कमी होण्याची शक्यता आहे. टाटा मोटर्सच्या एका निर्णयामुळे जाग्वारच्या गाड्या स्वस्त होण्याची शक्यता आहे.

रॉयटर्सने दिलेल्या माहितीनुसार देशातील दिग्गज ऑटो मॅन्यूफॅक्चरिंग कंपनी टाटा मोटर्स लवकरच मोठी घोषणा करू शकते. ही कंपनी तमिळनाडूच्या आपल्या नव्या प्लॅन्टमध्ये जग्वार लॅण्ड रोव्हर कंपनीच्या इलेक्ट्रिक कार तयार करू शकते. तशी योजना टाटा मोटर्सकडून आखली जात आहे. सध्यातरी या कंपनीने तयार केलेल्या कार भारतात आयात केल्या जातात. ही मूळची ब्रिटिश कंपनी आहे. मात्र टाटा कंपनीने ही कंपनी २००८ साली अधिगृहित केलेली आहे. टाटा मोटर्सकडून तमिळनाडूत जग्वार कारची निर्मिती करण्यात आली, तर भविष्यात या कंपनीच्या कार स्वस्त होण्याची शक्यता आहे.

**तमिळनाडूत तयार होणार जाग्वारच्या लॅण्ड रोव्हर**


टाटा मोटर्सकडून तमिळनाडूमध्ये एक मोठा प्लॅन्ट उभारण्यात येत आहे. या प्लॅन्टमध्ये नेमकं कशाची निर्मिती केली जाणार, हे अद्याप कंपनीने स्पष्ट केलेले नाही. मात्र येथे जग्वार लॅण्ड रोव्हर कंपनीच्या कारची निर्मिती केली जाऊ शकते. टाटा मोटर्सकडून हा प्लॅन्ट उभारण्यासाठी तब्बल १ अब्ज डॉलर्स रुपये खर्च केले जात आहेत.

**२००८ साली जेएलआर कंपनीचे अधिग्रहण**

टाटा मोटर्सने २००८ साली जग्वार लॅण्ड रोव्हर ही कंपनी तब्यात घेतली होती. जग्वार कंपनीचे सुटे भाग भारतात आयात केले जातात. त्यानंतर पुण्यातील एका प्लॅन्टमध्ये या कारचे सुटे भाग एकत्र केले जातात आणि कारची निर्मिती केली जाते. दरम्यान, टाटा मोटर्सने तमिळनाडूत या कारची निर्मिती केल्यास रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. तसेच येथे जग्वार लॅण्ड रोव्हरच्या कारची किंमत कमी होईल.

### नेस्लेला ८,१३७ कोटी बाजार भांडवलाची झळ

**मुंबई :** नेस्ले कंपनीने विकसनशील देशांमध्ये लहान मुलांसाठीच्या दुग्धजन्य पदार्थांत साखर जास्त वापरल्याचा दावा करण्यात आला आहे. याचा फटका नेस्ले इंडिया कंपनीला शुक्रवारी भांडवली बाजारात बसला. कंपनीच्या समभागात घसरण झाल्याने तिचे बाजार भांडवल ८ हजार १३७ कोटी रुपयांनी कमी झाले. मुंबई शेअर बाजारात नेस्ले इंडियाच्या समभागात आज ३.३१ टक्क्यांनी घसरण होऊन तो २ हजार ४६२ रुपयांवर बंद झाला. बाजारात नेस्लेच्या समभागात आज सर्वाधिक घसरण नोंदविण्यात आली. याच वेळी राष्ट्रीय शेअर बाजारात कंपनीचा समभाग २.९४ टक्क्यांनी घसरून २ हजार ४७१ रुपयांवर बंद झाला. कंपनीचा समभाग गडगडल्याने तिचे बाजार भांडवल ८ हजार १३७ कोटी रुपयांनी कमी होऊन २ लाख ३७ हजार ४४७ कोटी रुपयांवर आले. नेस्ले कंपनीने विकसनशील देशामध्ये साखरेचे प्रमाण जास्त असलेली उत्पादने विकल्याचा दावा करण्यात आला आहे. स्वित्झर्लंडमधील पब्लिक आय स्वयंसेवी संस्था आणि इंटरनॅशनल बेबी फूड अ‍ॅक्शन नेटवर्क यांनी हा दावा केला आहे.




# गुगलचा पुन्हा कर्मचाऱ्यांना नारळ

## भारतातील कामावर होणार परिणाम

**नवी दिल्ली :**

गुगलने पुन्हा एकदा कर्मचाऱ्यांना कपात केले आहे. मिळालेल्या वृत्तानुसार कंपनीने बुधवारी सांगितले की, खर्चात कपात करण्यासाठी कर्मचाऱ्यांची संख्या कमी केली जात आहे.

कर्मचारी कपातीमुळे कर्मचाऱ्यांच्या संख्येबाबत अद्याप कोणतीही माहिती दिलेली नाही. कर्मचारी कपातीमुळे काही लोकांना भारत, शिकागो, अटलांटा आणि डब्लिनसह गुंतवणूक करत असलेल्या ठिकाणी हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे.

यंदा टेक आणि मीडिया कंपन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपात करण्यात आले, त्यामुळे यापुढेही कर्मचारी कपात होण्याची भीती आहे. बुधवारी प्रसिद्ध झालेल्या बिझनेस इनसाइडरच्या अहवालानुसार, गुगलच्या रिअल इस्टेट आणि वित्त विभागातील अनेक कर्मचाऱ्यांना या कपातीचा फटका बसला आहे. अहवालात असे म्हटले आहे की, कर्मचारी गुगल ट्रेझरी, बिझनेस सर्व्हिसेस आणि रेव्हेन्यू कॅश ऑपरेशन्समधील आहेत.

यापूर्वी गुगलनेजानेवारी महिन्यातही शेकडो कर्मचाऱ्यांना काढून टाकले होते. यामध्ये इंजिनीअरिंग, हार्डवेअर आणि सपोर्ट टीमचा अधिक समावेश होता. कंपनीने मध्ये त्यांची गुंतवणूक अधिक प्रमाणात वाढवली आहे. गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांनी या वर्षाच्या सुरुवातीला कर्मचाऱ्यांना नोकऱ्या कपातीबाबत चेतावणी दिली होती.ाढ; वाचा आजचे नवे दर गुगलने मागच्या वर्षभरात १२ हजार लोकांना कामावरुन कपात केले होते. यामध्ये हार्डवेअर, जाहिरात विक्री, खरेदी, नकाशे, धोरण, अभियांत्रिकी आणि सारख्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

## ‘रात के ढाई बजे’ गाण्यातील प्रियांका चोप्राच्या लूकशी साधर्म्य

# नेहा हरसोराचा मराठमोळ्या नववधूचा लूक!

**मुंबई :**

प्रेक्षकांसमोर दर्जेदार मालिका सादर करण्याची परंपरा सुरू ठेवत, ‘स्टार प्लस’ वाहिनीने आजवर स्पर्श न केलेल्या आणखी एका विषयाला हात घातला आहे आणि ‘उडने की आशा’ ही नवी मालिका पेश केली आहे. या मालिकेत कंवर ढिल्लन (सचिन) आणि नेहा हरसोरा (सायली) यांनी प्रमुख भूमिका वठवल्या असून सचिन आणि सायली यांच्या प्रेमाची गाथा आणि नातेसंबंधांची गुंतागुंत या मालिकेतून सादर केली जात आहे.

या मालिकेला मराठमोळी पार्श्वभूमी लाभली आहे. ‘स्टार प्लस’ वाहिनीवर सादर होणाऱ्या ‘उडने की आशा’ या मालिकेत एका पत्नीच्या भावभावनांच्या कल्लोळाचे चित्रण करण्यात आले आहे. ती तिच्या बेफिकीर पतीचे रूपांतर जबाबदार व्यक्तीत कसे करते आणि याचा काही प्रमाणात संपूर्ण कुटुंबावर कसा परिणाम होतो, यावर बेतलेले हे नाट्य प्रेक्षकांना छोट्या पडद्यावर खिळवून ठेवत आहे. कंवर ढिल्लन यांनी सचिनची भूमिका साकारली आहे, जो एक टॅक्सी ड्रायव्हर आहे, तर नेहा हरसोराने ‘उडने की आशा’ या मालिकेत सायली या फुलविक्रेतीची भूमिका साकारली आहे.

‘उडने की आशा’ या शोसाठी निर्मात्यांनी अलीकडेच एक वेधक प्रोमो प्रदर्शित केला आहे, ज्यात प्रेक्षकांना सचिन आणि सायली यांच्या लग्नाची झलक दाखवण्यात आली आहे, जे गुंतागुंतीच्या परिस्थितीत घडते. सचिन आणि सायलीचे लग्न हे एक साधेसुधे मराठमोळे पद्धतीने होणार आहे, ज्यात मोठी नाट्यमयता आणि अनेक वळणे आहेत. अभिनेत्री प्रियांका चोप्रा प्रसिद्ध बॉलीवूड गाणे ‘रात के ढाई बजे’मध्ये दिसते, तशी नऊवारी साडी सायलीने परिधान केलेली दिसेल आणि




यात कुणालाही तिळमात्र शंका नाही, की सायली आणि प्रियांका चोप्रा यांचा लूक अगदी सारखा आहे. सायलीला वधूच्या रूपात पाहणे प्रेक्षकांसाठी खरोखरच एक दृश्यात्मक मेजवानी ठरेल. तिला बघताना आपल्या सर्वांना अभिनेत्री प्रियांका चोप्राची नक्की आठवण होईल. प्रियांकाने या गाण्यातील तिच्या उपस्थितीने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत, सायली छोट्या पडद्यावरही पुन्हा तीच मोहिनी निर्माण करेल.

या संदर्भात बोलताना ‘स्टार प्लस’ वाहिनीवरील ‘उडने की आशा’ या मालिकेतील सायलीने ऊर्फ नेहा हरसोराने सांगितले, उडने की आशा’ या मालिकेतील आगामी लग्नसोहळ्यात, प्रेक्षकांना अद्भुत नाट्य बघायला मिळेल. मालिकेतील नाट्य अनेक वळणे घेत असून सचिन आणि सायलीच्या आयुष्याचे दार ठोठावणार आहे. या मालिकेत मी सायली या मराठमोळ्या मुलीची व्यक्तिरेखा साकारली आहे. मला मराठमोळ्या वधूची व्यक्तिरेखा साकारताना खूप छान वाटले. सायलीच्या लग्नसोहळ्यातील वधूच्या वेषातून अभिनेत्री प्रियांका चोप्राने साकारलेल्या ‘रात के ढाई बजे’ गाण्यातल्या लग्नाच्या वेषाची झलक दिसते आणि आपण त्या आठवणीत रमायला लागतो. ‘रात के ढाई बजे’ या गाण्यातील प्रियांका चोप्रा आणि ‘उडने की आशा’ या मालिकेतील सायली या दोघींनीही नऊवारी साडी परिधान केली आहे. मला लग्नसोहळ्यातील मराठमोळे विधी करताना आनंद वाटला आणि मला लग्नसोहळ्यात केल्या जाणाऱ्या विधींची माहितीही झाली. सचिन आणि सायलीच्या आयुष्यात उलगडत जाणारे नाट्य आणि ते दोघे अनपेक्षित परिस्थितीला कसे सामोरे जातात हे जरूर पाहा. राहुल कुमार तिवारी निर्मित, ‘उडने की आशा’ ‘स्टार प्लस’ वाहिनीवर सोमवार ते रविवार रात्री ९ वाजता प्रसारित होत आहे.



# अशोकाच्या विद्यार्थ्यांची महाबळेश्वरच्या मॅप्रो फूड्स कंपनीला औद्योगिक भेट

**नाशिक : प्रतिनिधी**

शिकत असताना अभ्यासक्रमातील तंत्राचा औद्योगिक क्षेत्रात प्रत्यक्ष कसा वापर केल्या जातो हे जाणून घेण्यासाठी शैक्षणिक संस्था विविध औद्योगिक भेटीचे आयोजन करत असतात. त्याचाच एक भाग म्हणून अशोका बिझनेस स्कूलने एमबीए द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी महाबळेश्वर येथील मॅप्रो फूड्स कंपनीला औद्योगिक भेट आयोजित केली होती. या भेटीमुळे त्या कंपनीची अन्न प्रशासन कार्यपद्धती, कामाचे वातावरण, आणि तेथील व्यवस्थापन या विषयी माहिती विद्यार्थ्यांना प्राप्त झाली. संपूर्ण उत्पादन प्रक्रिया, तेथील तंत्रज्ञान उपकरणाची माहिती, आणि घ्यावयाची काळजी, या सर्व बाबत तेथील कर्मचारी वर्गाने छान आणि सखोल माहिती दिली.

प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन कामकाजाचे स्वरूप समजून घेतले तर ते अधिक चांगल्या प्रकारे अकलन होते.आणि ते चिरकाल स्मरणात राहते याचा अनुभव आल्याने विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले. या माहितीचा उपयोग त्यांना महत्त्वाचा ठरणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रम मार्गदर्शकतत्त्वानुसार ही भेट महत्त्वाची ठरते. एका छान औद्योगिक कंपनीला भेट देता आली म्हणून अशोका एज्युकेशन फाउंडेशनचे प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी कंपनीचे आभार मानले. सदरच्या औद्योगिक भेटीचे संपूर्ण नियोजन डॉ. नैनिश मुथा यांनी केले.द्वितीय वर्षातील ७३ विद्यार्थ्यांची ही भेट डॉ. हेमंत वंजारे, डॉ. वृषाली आहिरे, प्रा. पूजा कुशारे यांच्या प्रत्यक्ष सहभागाने यशस्वी पार पडली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी महाबळेश्वर येथील प्रेक्षणीय स्थळांना भेट दिली.

# अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये जागतिक यकृत दिन साजरा

**नाशिक : प्रतिनिधी**

जागतिक यकृत दिन २०२४ च्या निमित्ताने अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल सामान्य लोकांसाठी चांगल्या आरोग्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जागतिक यकृत दिन साजरा करण्यात आला. देशातील मोठ्या संख्येने लोक नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीजने ग्रस्त आहेत. ज्यामुळे सिरोसिस आणि शेवटी यकृत प्रत्यारोपण किंवा मृत्यू देखील होतो. यकृताच्या समस्यांचे निदान आणि व्यवस्थापन करण्यासाठी नियमित तपासणीद्वारे यकृताच्या आजारांचा वेळेवर उपचार घेणं महत्त्वाचे आहे. सध्या यकृताचे आजार सामान्यतः सर्व वयोगटातील लोकांमध्ये दिसून येतात. नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज (एनएएफएलडी), नॉन-अल्कोहोलिक स्टीटोहेपेटायटिस (एनएएसएच), एंड-स्टेज क्रॉनिक लिव्हर डिसीज, सिरोसिस, लिव्हर फेल्युअर, तीव्र आणि क्रॉनिक हिपॅटायटीस, यकृताचा कर्करोग, पित्त नलिकाचा कर्करोग मोठ्या संख्येने लोक आढळून येत आहेत. . पण, N-FLD ही आजकाल लोकांमध्ये दिसणारी एक सामान्य समस्या आहे. विविध तपासणी साधनांच्या सहाय्याने रुग्णांवर योग्य उपचार करणे ही काळाची गरज आहे. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नाशिकने आता एक पाऊल पुढे येऊन लवकर निदान व उपचार होतील या अनुषंगाने या अद्ययावत असे गॅस्ट्रोएंटरोलॉजी डिपार्टमेंट सुरू केले आहे. या प्रसंगी पोट व यकृत तज्ज्ञ डॉ. तुषार संकलेचा म्हणाले, नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज (एनएएफएलडी) हा मेटाबॉलिक सिंड्रोम असलेल्यांमध्ये वारंवार यकृताचा आजार होत आहे. अलीकडील अभ्यासामध्ये असे निर्दर्शनास आले आहे की, भारतातील ३५% लोकसंख्या एनएएफएलडीने त्रस्त आहे. एनएएफएलडीच्या गुंतागुंत म्हणजे फायब्रोसिस, सिरोसिस आणि हेपॅटोसेल्युलर कार्सिनोमा. एनएएफएलडीमुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, एक्स्ट्राहेपॅटिक निओप्लाझिया आणि इतर अवयवांचे नुकसान देखील होते, जसे की मूत्रपिंड. एनएएफएलडीला मेटाबॉलिक सिंड्रोमचा एक घटक मानला जातो, ज्यामध्ये लठ्ठपणा, इन्सुलिन प्रतिरोध किंवा टाइप २ मधुमेह मेलिटस, उच्च रक्तदाब आणि डिस्लिपिडेमिया यांचा समावेश होतो. रोगाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर असलेल्या एनएएफएलडी रुग्णांना नॉन-अल्कोहोलिक स्टीटोहेपेटायटीस आणि सिरोसिसचा त्रास होतो. पुढील दशकात, फायब्रोसिस असलेल्या रुग्णांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता तर आहेच परंतु फायब्रोसिस असलेल्या NASH रुग्णांची संख्या २०३० पर्यंत दुप्पट होण्याची शक्यता आहे. पुढे ते म्हणाले, एचबीए, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, डिस्लिपिडेमिया आणि मधुमेह अशा लोकांना यकृताच्या समस्यांचा धोका जास्त असतो. वेळीच उपाययोजना केल्यास यकृताच्या आजारांवर प्रतिबंध घालणे सोपे जाते. या प्रसंगी हॉस्पिटल्समधील डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नाशिक : पोट व यकृत विकार तज्ज्ञ डॉ. तुषार संकलेचा, सेंटर हेड अनुप त्रिपाठी, डॉ. किशोर टिळे, स्मिता दहिवाल, डॉ. सायली उबाळे, डॉ. आरती चव्हाण आदी.**

## आखाडा

### राज ठाकरे १८ वर्षांनंतर धनुष्यबाणाला मतदान करणार; राहुल शेवाळेंचा दावा

मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केल्याचे पाहायला मिळाले. अशातच आता महायुतीचे उमेदवार राहुल शेवाळे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची शिवतीर्थवर भेट घेतली. यावेळी आमदार सदा सरवणकर, मनसे नेते संदीप देशपांडे, माजी आमदार तुकाराम काते आणि इतर नेते उपस्थित होते. दरम्यान, मुंबई दक्षिण मध्यमधून महायुतीकडून राहुल शेवाळे हे उमेदवार आहेत. तर मनसेच्या स्थापनेनंतर जवळपास १८ वर्षांनंतर राज ठाकरे हे पहिल्यांदाच धनुष्यबाण चिन्हाला आपले मत देतील, असे राहुल शेवाळे म्हणाले. तर राज ठाकरे धनुष्यबाणाला मतदान करणार याचा आनंद आणि ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट असल्याचंही राहुल शेवाळे म्हणाले. मनसेच्या ८० हजार मतांचा फायदा येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत होणार असल्याचा विश्वासही शेवाळेंनी व्यक्त केला. राज ठाकरेंच्या भेटीनंतर राहुल शेवाळेंनी अशी प्रतिक्रिया दिली. तसेच १७ मेच्या महायुतीच्या सभेत राज सर्वांना मार्गदर्शन करून महायुतीच्या उमेदवारांना आशीर्वाद देतील, असेही शेवाळेंनी म्हटले.

### गॉगल लावून मतदानकेंद्रात येणाऱ्या महिला अधिकाऱ्याचा फोटो व्हायरल



लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीची सुरुवात गेल्या कैक दिवसांपासून झालेली होती. ज्यानंतर आता देशात खऱ्या अर्थानं लोकशाहीचा उत्सव सुरू झाला आहे. देशात सध्या पहिल्या टप्प्यातील मतदानाला सुरुवात झालेली असतानाच आता याच मतदान प्रक्रियेचे काही पैलू सर्वांसमोर येत आहेत. थोडक्यात राजकीय वर्तुळात ग्लॅमरची जोडही मिळताना दिसत आहे. विश्वास बसत नाहीये? मागील काही दिवसांपासून सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या एका महिला अधिकाऱ्यांचा फोटो पाहून यावर अनेकांचाच विश्वास बसत आहे. उत्तर प्रदेशातील सरहानपूर येथे निवडणुकीदरम्यान सोपवण्यात आलेलं कार्य पूर्ण करण्यासाठी म्हणून या महिला अधिकारी तेथील मतदान केंद्रावर रुजू झाल्या. ईशा अरोरा, असं त्यांचं नाव. सध्याच्या घडीला ईशा गंगोह विधानसभा क्षेत्रातील महंगी गावात निवडणूक अधिकारी म्हणून जबाबदारी बजावताना दिसत आहेत. एक अधिकारी असण्यासोबतच एक महिला मतदार म्हणूनही ईशा यांनी माध्यमांशी संवाद साधताना सध्याच्या घडीला निवडणूक आयोगाकडून सर्वतोपरी व्यवस्था करण्यात आली असून, कुठंही कोणाचीही गैरसोय होत नसल्याचं वक्तव्य केलं. ईशा अरोरा भारतीय स्टेट बँकेत सेवेला असून, त्या गंगोह येथे प्रथम निवडणूक अधिकारी म्हणून सेवेत रुजू झाल्या आहेत. ईशा अरोरा यांचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर अनेकांनाच २०१९ मधील पिवळ्या साडीतील महिला निवडणूक अधिकाऱ्यांची आठवण झाली.




### बाहुबलींची माघार

बाहुबलींनी घेताच हो माघार
महायुतीचा करणार म्हणे प्रचार
'आप्पां'नाही मिळाला आधार
'गोड'से स्वप्न होणार साकार?
मतदार आता कोणाला तारणार
कोण आपला सरदार हे ठरवणार

■ सर्किट

### शालजोडे

पक्षातील नाराज उचलतात शेवटी
निकराचे बंडखोरीचं पाऊल
अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक
लढविण्याची करतात घोषणा
पक्षश्रेष्ठी हतबल होत काढतात मार्ग
भाऊ, दादा करत त्यांच्या दाढ्या कुरवाळत
आश्वासनाने मिटवतात पेल्यातील वादळ!


■ विजय भदाणे

# नाशिक लोकसभेवरून महायुतीत ट्विस्ट पे ट्विस्ट

**नाशिक : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून, नाशिक लोकसभा निवडणुकीसाठी २० मे रोजी मतदान होणार आहे. महाविकास आघाडीकडून प्रचाराला जोरदार सुरुवात झाली आहे. मात्र, महायुतीकडून अद्याप उमेदवार जाहीर होऊ शकला नसताना आता नाशिक लोकसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांचे नाव चर्चेत असताना अचानकपणे काल छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषद घेत आपण लोकसभा निवडणूक लढवणार नसल्याचे जाहीर केले. हे जाहीर करत असतानाच आपण लोकसभा निवडणूक लढवावी हा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा आग्रह होता, हे सांगायला ते विसरले नाहीत. त्यामुळे सुरुवातीपासूनच नाशिकच्या जागेवरून महायुतीत सुरू असलेले ट्विस्ट पे ट्विस्ट अद्याप सुरू आहेत. निवडणुकीला अवघा एक महिन्याचा कालावधी बाकी असताना अद्याप उमेदवार न जाहीर होऊ शकल्याने कार्यकर्त्यांमध्ये अवस्थता पसरली आहे.

महायुतीतील तिन्हीही पक्ष नाशिक लोकसभेच्या जागेसाठी आग्रही असल्याचे सुरुवातीपासूनच चित्र होते. सध्या नाशिक लोकसभेत शिवसेना शिंदे गटाचे हेमंत गोडसे विद्यमान खासदार असून, नाशिकला भाजपाचे तीन आमदार आणि गेल्या पंचवार्षिकमध्ये महानगरपालिकेत सत्ता असल्याने भाजपाकडूनही या जागेचा आग्रह सुरू होता, मात्र अचानकपणे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांचे नाव समोर आल्याने नाशिकची जागा महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट लढवणार अशी अटकळ बांधण्यात येत होती. मात्र, असे असले तरी शिंदे शिवसेनेने नाशिकच्या जागेचा आग्रह कायम ठेवल्याचे चित्र आहे. शिवसेनेकडून विद्यमान खा. हेमंत गोडसे, पालकमंत्री दादा भुसे, महानगरप्रमुख अजय बोरस्ते, महासचिव भाऊसाहेब चौधरी यांची नावेही चर्चेत आली होती. भाजपाकडून आ. राहुल ढिकले, आ. सीमा हिरे यांच्या नावाचीही चर्चा सुरू होती. तर आता विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांनाच महायुतीकडून नाशिकची उमेदवारी मिळणार असल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. पण गेल्या महिनाभरात महायुतीकडून नाशिकच्या उमेदवारीवरून सुरू असणारे ट्विस्ट आणि यू टर्न थांबायचे नाव घेत नाहीत. त्यामुळे आता खरंच खा. गोडसेंना उमेदवारी जाहीर होणार की पुन्हा ट्विस्ट येत धक्कातंत्राचा वापर करत नवीन चेहऱ्याला संधी मिळणार यासाठी अजून काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे.



## भुजबळांची माघार अन् तर्कवितर्कांना उधाण

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्याचे अन्न व नागरी ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ यांनी नशिक लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारीच्या स्पर्धेतून माघार घेतल्याचे जाहीर केले. मात्र, भुजबळांनी अचानकपणे निवडणूक लढवणार नसल्याने जाहीर केल्यानंतर अनेक तर्कवितर्क लावले जात असून, मराठा समाजाच्या विरोधामुळे माघार की खा. गोडसेंच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्यामुळे माघार घेतली, अशी चर्चा आता रंगू लागली आहे.

नाशिक लोकसभेसाठी महायुतीकडून छगन भुजबळांच्या नावाची चर्चा सुरू झाल्यानंतर मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांनी भुजबळांना उमेदवारी दिली तर मराठा समाज महायुतीला मतदान करणार नाही, अशी भूमिका घेतली होती. कारण मराठा समाजाचे आरक्षणासाठी आंदोलन सुरू असताना, ओबीसीतून मराठ्यांना आरक्षण देण्यास भुजबळांनी विरोध दर्शवला होता, त्यामुळे भुजबळ आणि मनोज जरांगे यांच्यात वाक्युद्ध रंगले होते. त्यामुळे भुजबळांना उमेदवारी दिली तर महायुतीला फटका बसण्याची शक्यता भाजपाच्या चाणक्यांना वाटली. त्यामुळे उमेदवारी देण्यावरून महायुतीत पुन्हा खलबते झाल्यानंतर भुजबळांचा पत्ता कट झाल्याचा अंदाज वर्तवला जाऊ लागला आहे. त्याचप्रमाणे खा. गोडसे यांच्याच नावावर महायुतीकडून शिक्कामोर्तब झाल्याची चर्चाही दोन दिवसांपासून रंगली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर भुजबळांनी पत्रकार परिषद घेत माघार घेतली असण्याची शक्यता आहे.

भाजपाकडून चारशे पारचा नारा देण्यात आला आहे. त्यामुळे एका एका जागेवर उमेदवार देण्यावरून भाजपाकडून सखोल अभ्यास करण्यात येत असून, प्रत्येक फॅक्टरचा विचार करून उमेदवारी देण्यात येत आहे. छगन भुजबळ यांचे नाशिक शहरात मोठे वर्चस्व आहे, या आधी २००९ ते २०१४ या कालावधीत त्यांचे पुतणे समीर भुजबळ नाशिकचे खासदार होते. त्याचप्रमामणे नाशिक शहरात ओबीसी समाजाचे मोठे मतदान आहे. या सर्व पार्श्वभूमीवर भुजबळांना नाशिकची उमेदवारी देण्याचा अमित शहा यांचा आग्रह होता, मात्र त्यानंतर शिंदे शिवसेना नाशिकची जागा सोडण्यास असलेला विरोध आणि सकल मराठा समाजाचा भुजबळांच्या उमेदवारीला असलेला विरोध यामुळे भुजबळांचा पत्ता कट झाल्याने माघार घेण्याची भूमिका घेतली असावी, अशी चर्चा आता रंगू लागली आहे.

## नवनीत राणांवर केलेल्या टिपणीवर संजय राऊत ठाम

**सांगली :**

राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी अमरावती लोकसभा मतदारसंघातील भाजप उमेदवार नवनीत कौर राणा यांना 'नटी' संबोधल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता. संजय राऊत हे सांगली दौऱ्यावर आले. यावेळी काँग्रेसचे आमदार विक्रम सावंत आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची त्यांनी भेट घेतली. ठाकरेंच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची चर्चा करताना संजय राऊतंनी आता नटीला नटी म्हणणार नाही तर काय म्हणणार? असा पुनरुच्चार केला.

आता नटीला नटी म्हणणार नाही तर काय म्हणणार? नटीच म्हणणार ना.... ती डान्सर आहे... आता आम्ही गणपत पाटलांना प्रेमाने नाच्या म्हणतोच की... ॲक्टर्स म्हणायला मला इंग्लिश येत नाही अशी टिपण्णीही संजय राऊत यांनी केली. अमरावतीमध्ये संजय राऊत यांनी नवनीत राणा यांच्यावर टिपणी केल्यामुळे त्यांच्यावर टीका होत असतानाच त्यांनी पुन्हा एकदा



त्यांनी असं वक्तव्य केल्याने वादाला तोंड फुटणार आहे. मी अत्यंत पार्लमेंटरी शब्दांचा उपयोग करतो, मराठी भाषा कोणी शिकवायला नको, मी चाळीस वर्षे बाळासाहेब यांच्या सोबत काम केलेला माणूस आहे,मी पत्रकार आहे संपादक आहे, त्यामुळे मला मराठी भाषा कोणी शिकवू नये, असंही राऊत म्हणाले.

नवनीत राणा यांच्याबाबत संजय राऊत यांनी ज्या भाषेचा वापर केला आहे हा समस्त महिलांचा अपमान तर आहेच पण हा कला क्षेत्राचा सुद्धा अपमान आहे! अर्थात संजय राऊतांसारख्या लोकांकडून असलीच भाषा येणार! महाराष्ट्र नवनिर्माण सेना याचा तीव्र निषेध करत आहे.... संजय राऊत गेंड्याच्या कातडीचे असल्यामुळे ते दिलगिरी वगैरे व्यक्त करतील याची अपेक्षाच नाही ! असे ट्वीट महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रवक्ते योगेश खैरे यांनी केलं आहे.

याआधीसुद्धा कॅमेऱ्यासमोर शिवीगाळ करणं असे प्रकार त्यांनी केलेच आहेत. राजकारणाचा स्तर अशाच वाचाळवीरांमुळे घसरत चालला आहे. सुप्रिया सुळेंबाबत एक मंत्री असंच वादग्रस्त बोलले होते त्यावेळी देखील राज ठाकरे यांनी त्याचा निषेधच केला होता हे इथं आवर्जून सांगावं लागेल !! अशी पुष्टीही मनसेने जोडली आहे. तुम्हाला बाई खुणावेल ती पडद्यावरची नटी आहे. बाई तुम्हाला प्रेमाने बोलावेल पण तुम्ही मोहाला बळी पडू नका. आपण सावध राहिलं पाहिजे. डोळा मारला की जायचं नाही.

आता आपला विचार बळवंत वानखेडे हाच आहे. ज्या बाईने मातोश्रीचा अवमान केला आणि मातोश्रीत घुसण्याचा प्रयत्न केला तिचा पराभव करणं हे आमचं प्रथम काम आहे असं संजय राऊत म्हणाले होते. ही लढाई देशाची आहे. ही लढाई बळवंत वानखेडे विरोधात नाची अशी नाही. आमची लढाई बबली सोबत नाही. ही लढाई मोदी विरुद्ध महाराष्ट्र, मोदी विरुद्ध उद्धव ठाकरे, शरद पवार, राहुल गांधी अशी आहे अशी टीका संजय राऊत यांनी नाव न घेता नवनीत राणांवर केली होती.



## बोहल्यावर चढण्यापूर्वी नवरदेवाने बजावला मतदानाचा हक्क

देशासह महाराष्ट्रातही लोकसभेच्या पहिल्या टप्प्यातील लोकसभा निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. काल विदर्भात मतदान होत आहे. पहिल्या टप्प्यात आज पूर्व विदर्भातील नागपूर, रामटेक, भंडारा - गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर मतदारसंघात मतदान होत आहे.

काल पहिल्या टप्प्यात मतदान करण्यास पात्र असणाऱ्या मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये तरुण, वयस्कर आणि प्रौढांसह दिव्यांग मतदार आपले मतदान करत आहेत. अशातच रामटेकमधील एका तरुण मतदाराची सर्वत्र चर्चा होत असून, त्यांनं सर्वांचे लक्ष वेधून घेतलं आहे. रामटेकमध्ये एका नवरदेवाने बोहल्यावर चढण्यापूर्वी त्याचा मतदानाचा हक्क बजावला आहे. अंगावर शेरवानी, डोक्यावर पगडी, कपाळाला मुंडावळ्या बांधून लग्नाच्या वरातीसाठी घोड्यावर बसण्यापूर्वी नवरदेवाने आपलं कर्तव्य बजावले. स्वप्नील डांगरे असे या चर्चा होणाऱ्या तरूणाचे नाव असून लग्नमंडपात जाण्यापूर्वी तो मतदान केंद्रावर दाखल झाला आणि मत दिलं. योग्य लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी आपण मतदान केलं पाहिजे, असे यावेळी स्वप्नीलने सांगितले.

## सुनील तटकरेंपेक्षा पत्नी श्रीमंत!

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी रायगड लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी निवडणूक आयोगाला सादर केलेल्या शपथपत्रात त्यांनी आपल्याकडे १४ कोटी ५७ लाख ५७ हजारांची मालमत्ता असल्याचे जाहीर केले आहे.

शेती हा प्रमुख व्यवसाय असलेल्या तटकरे आणि त्यांच्या पत्नीकडे २०१९ मध्ये १२ कोटी ६४ लाख ८५ हजारांची एकूण मालमत्ता होती. यात पाच वर्षांत १ कोटी ९२ लाख ८२ हजारांची वाढ होऊन ती २०२४ मध्ये १४ कोटी ५७ लाख ८२ हजार झाली आहे. सुनील तटकरे यांनी निवडणूक आयोगाला सादर केलेल्या शपथपत्रात स्वतःकडे ४ कोटी १७ लाख १४ हजार जंगम मालमत्ता तर पत्नी वरदा सुनील तटकरे यांच्याकडे १ कोटी २२ लाख ५७ हजार रुपयांची जंगम मालमत्ता असल्याचे नमूद केले आहे. तर स्वतःकडे ४ कोटी ४५ लाख ७९ हजार रुपयांची, तर पत्नीकडे ४ कोटी ७२ लाख १७ हजार रुपयांची स्थावर मालमत्ता असल्याचे जाहीर केले आहे. म्हणजेच तटकरे यांच्या तुलनेत त्यांच्या पत्नी वरदा यांच्याकडे जास्त स्थावर मालमत्ता असल्याचे जाहीर केले आहे.



महत्वाची बाब म्हणजे गेल्या पाच वर्षात वरदा तटकरेंच्या संपत्तीत जास्त वाढ झाली असल्याचे दिसून येते. तटकरे यांनी त्यांच्यावर १ लाख १४ हजार ५२० रुपयांचे दायित्व असल्याचेही नमूद केले आहे. दरम्यान तटकरे यांचा मुलगा अनिकेत तटकरे यांनीही आपला डमी उमेदवारी अर्ज काल निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर केला.

या वेळी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्याने एकूण ३८ कोटी ०५ लाख ४२ हजार रुपयांची मालमत्ता असल्याचे जाहीर केले आहे. यात स्वतःकडे १७ कोटी २९ लाख ६३ हजार तर पत्नी वेदांती तटकरे यांच्याकडे ६ कोटी ३१ लाख ३४ हजार जंगम मालमत्ता असल्याचे जाहीर केले आहे.

## उदयनराजेंकडे नऊ आलिशान मोटारी

निवडणुकीच्या प्रतिज्ञापत्रातून उमेदवारांच्या संपत्तीचे आकडे सध्या कुतूहलाचे विषय ठरत असताना साताऱ्यातून भाजपचे उमेदवार असलेले खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या संपत्तीत चक्क २१ कोटी रुपयांची घट झाल्याचे समोर आले आहे. उदयनराजे यांनी अर्ज दाखल करताना दिलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये १७२ कोटी ९४ लाखांची मालमत्ता दाखवली आहे. मागील निवडणुकीत त्यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये त्यांची मालमत्ता १९३ कोटी रुपयांची असल्याचे नोंदवण्यात आले होते.

उदयनराजे यांनी सातारा लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातून त्यांची संपत्तीही समोर आली. उदयनराजेंकडे १७२ कोटी ९४ लाखांची स्थावर मालमत्ता आहे. यामध्ये



प्रमुख मालमत्ता ही वारसाप्राप्त असून, ती एक अब्ज ३४ कोटी ९३ लाख रुपये एवढी आहे. यापूर्वीच्या निवडणुकीतही त्यांची वारसाप्राप्त मालमत्ता ही एवढीच दाखवण्यात आलेली होती. काल दाखल केलेल्या या विवरणपत्रात उदयनराजेंकडे एक कोटी ९० लाख रुपयांच्या नऊ आलिशान मोटारी आहेत. उदयनराजेंकडे दोन कोटी सात लाख ७४ हजारांचे दागिने तर दमयंतीराजेंकडे ८५ लाख २८ हजार रुपयांचे दागिने आहेत. उदयनराजे यांच्याकडे पाच लाख ८५ हजार ७१७ रुपये रोख रक्कम तर दमयंती राजे यांच्याकडे पाच लाख २७ लाख ३५ हजार रुपयांची रोख रक्कम आहे. उदयनराजे यांच्याकडे पाच कोटी ८५ लाख तर दमयंतीराजे यांच्या पाच कोटी सत्तावीस लाखांच्या ठेवी आहेत. दरम्यान उदयनराजे यांच्यावर आठ कोटी ४५ लाख ५७ हजार रुपयांचे कर्ज असल्याचेही या प्रतिज्ञापत्रामध्ये म्हटले आहे. उदयनराजे यांच्याविरुद्ध आंदोलनाचे सातारा शहर व शाहुपुरी पोलीस ठाण्यात प्रत्येकी दोन गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये अद्याप दोषारोपपत्र सादर झालेले नाही.

## आमच्या आग्रहामुळेच भुजबळांची माघार : शिरसाठ

आगामी लोकसभेसाठी नाशिकची जागा अजित पवार गटाकडून छगन भुजबळ लढवणार हे जवळपास निश्चित झाले होते. पण आपण माघार घेत असल्याचे त्यांनी पत्रकार परिषद घेत जाहीर केले. याला काही अवधी उलटत नाही तोपर्यंत शिंदे गटाकडून मोठा दावा करण्यात आला आहे. नाशिकच्या जागेची आम्ही मागणी केली होती आणि आमचा आग्रह पण होता. त्या संदर्भात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चादेखील झाल्या. कदाचित त्यामुळे काल भुजबळ साहेबांनी स्वतःहून माघार घेतली, असे शिरसाठ म्हणाले. राज्यात असलेल्या उष्णतेमुळे मतदानाचा टक्का कमी झाल्याचे ते म्हणाले. तसेच आम्ही भुजबळांचे मनापासून आभार मानतो. याचा अर्थ असा आहे की, ती जागा शिवसेनेची आणि शिवसेना ती जागा लढणार असे शिरसाठ म्हणाले. नाशिकच्या जागेसाठी आमचा आग्रह होता. मुख्यमंत्री, फडणवीस असा, अजितदादा असतील त्यांच्याशी चर्चा झाल्या असतील. नाशिकची जागा आजच विजयी झाली असे म्हणायला हरकत नाही, असे शिरसाठ म्हणाले.

संभाजीनगरची जागादेखील शिवसेनेचीच आहे. आजच संध्याकाळपर्यंत नावाची घोषणा केली जाईल. आज तिढा सुटून नावाची घोषणा होईल. कोणाचे नाव येईल ते सांगण्या मुख्यमंत्र्यांना अधिकार पण आजच नाव घोषित होईल असे त्यांनी सांगितले. नारायण राणे यांचा सन्मान ठेवून सर्वांनी एकमताने विचार करून ती जागा त्यांना दिली आहे. त्यांनी जो संकल्प केला आहे तो पूर्ण होईल, असे ते म्हणाले.

महिलांना नाची म्हणणाऱ्या नाच्यांना दुसरा धंदा उरलेला नाही. नवनीत राणा याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार करतीलच. आमचा पक्ष हा महिलांचा सन्मान करणारा आहे. पक्षाचा पराभव समोर दिसल्याने संजय राऊत बेताल वक्तव्य करत असल्याचा टोला शिरसाठांनी लगावला. हीच वाक्य दुसऱ्या किंवा विरोधातून कुणी बोललं असतं तर थयथयाट केला असता, असेही ते म्हणाले.

राज ठाकरेंच्या सभा महत्त्वाच्या ठिकाणी होणार आहेत. त्यांना संभाजीनगरसाठी सभा घ्यावी यासाठी मी स्वतः त्यांना सांगितले आहे. मनसेने पाठिंबा दिल्याने सर्व कार्यकर्ते एकत्र प्रचार करताय, अशी माहितीदेखील शिरसाठ यांनी दिली.

